लघु संशोधन प्रबंध

‘‘तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा एक चिकित्सक अभ्यास.’’

कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यास

लघु संशोधन प्रबंध सादर

संशोधक /सादरकर्ते

डॉ. बंडू जयसिंग कदम

(एम. ए.,एम. फील.,पीएच.डी., पी जी डी सी जी)

सहाय्यक प्राध्यापक,

अर्थशास्त्र विभाग,

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,

तासगाव,ता. तासगाव, जि. सांगली.

२०१९

प्रतिज्ञापत्र

'तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा एक चिकित्सक अभ्यास' या विषयावरील लघु संशोधन प्रबंध मी कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर लिहिला आहे. हा लघु संशोधन प्रकल्प अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणासही पदवीसाठी अथवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक

संशोधक

डॉ. बंडू जयसिंग कदम.

प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, डॉ. बंडू जयसिंग कदम यांनी 'तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा एक चिकित्सक अभ्यास' या विषयावरील लघु संशोधन प्रकल्पाचे लेखन समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे. डॉ. बंडू जयसिंग कदम यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररितीने हा लघु संशोधन प्रकल्प लिहिलेला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य पदवी व परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक

मार्गदर्शक

डॉ. भारती पाटील

समन्वयक,

कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ऋणनिर्देश

कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे **'तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा एक चिकित्सक अभ्यास'** हा लघु संशोधन प्रकल्प सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. हा लघु संशोधन प्रकल्प माझ्या प्रेमळ आई—वडीलांच्या आशिर्वादाचे व सर्व गुरुवर्यांच्या प्रेरणेचे मूर्त रुप आहे. या करिता अंत:करणाची भावना व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणून मी आभार प्रदर्शनाचा अवलंब केलेला आहे. कोणतेही महत्वाचे कार्य करावयाचे झाल्यास त्यास सर्वाच्या सहकार्याची जोड आवश्यक असते. सहकार्याशिवाय कोणतेही काम परिपूर्ण होत नाही. हा लघु संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ज्यांचे सहकार्य व मदत मिळाली त्यासर्वांचा ऋणी आहे हे आभार व्यक्त करणेसाठी केलेला हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

हा संशोधन प्रकल्प श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक डॉ. बापूजी साळूंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये सादर करण्याचे मला भाग्य लाभले. आमच्या संस्थेच्या संस्थापक डॉ. बापूजी साळूंखे, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या आशिर्वादामूळे हे कार्य शक्य झाले आहे. त्याच प्रमाणे आमच्या संस्थेचे अध्यक्ष नामदार चंद्रकांतदादा पाटील (दादा), कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव सौ. शुभांगीताई गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, सहसचिव प्राचार्य डॉ. वाय. ए. भोसले यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

या संशोधनकार्यात संशोधक मार्गदर्शक डॉ. भारती पाटील (समन्वयक, कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांनी माझ्यावर कृपाकटाक्ष ठेवला. त्यांचे मनपूर्वक मी आभार मानतो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर कुंभार यांच्या बहूमुल्य मार्गदर्शनामुळे आणि आशिर्वादामूळे हे संशोधनकाम पूर्ण करु शकलो. त्यांनी माझ्या साठी दिलेला बहुमुल्य वेळ व वेळोवेळी केलेल्या महत्वपूर्ण सूचना यामूळेच हा लघु संशोधन प्रकल्प पूर्ण होऊ शकला. त्यांचे ऋण मी कोणत्याच शब्द गुच्छाने फेडू शकत नाही. म्हणून मी त्यांचे आभार मानतो व त्यांच्या ऋणात राहणे मी माझे भाग्य समजतो.

माझ्या संशोधनकार्यास ज्यांनी गती दिली ते गुरुवर्य व ज्येष्ठ अर्थतज्ञ मा. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळे लघु संशोधन प्रबंधाचे काम पूर्ण झाले. ज्यांनी माझ्या संशोधन कार्यास खऱ्या अर्थाने प्रेरणा दिली ते माझे गुरुवर्य प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील (माजी अधिष्ठाता,सामाजिक शास्त्रे,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर,प्राचार्य शिक्षणमहर्षी बापूजी साळूंखे महाविद्यालय कराड) यांच्या सहकार्यामूळेच व वारंवार केलेल्या मार्गदर्शनामूळे माझे संशोधनाचे हे कार्य पूर्ण झाले. त्यांच्या व्यासंगी व निरपेक्ष मार्गदर्शनामूळे मला लाभ मिळाला. त्यांचा मी मनस्वी ऋणी राहीन.

आमच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख आणि उपप्राचार्य प्रा.के.एस.पाटील यांनी वेळोवेळी केलेल्या मदतीमुळे हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला. त्याचे आभार मानने हे माझे परम कर्तव्य समजतो. त्याचप्रमाणे प्रा. जे. ए. यादव, प्रा.के.एन.पाटील, डॉ. शहाजी पाटील,प्रा. अजितकुमार पाचोरे,डॉ.बी.टी.कणसे,प्रा.मिलिंद पाटील, डॉ. अमोल सोनवणे, प्रा.नितिन वाघमारे, प्रा. आण्णसाहेब बागल, प्रा.एम.डी. पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

त्याचप्रमाणे डॉ. उषादेवी साळुंखे (वाणिज्य विभाग प्रमुख, काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले, पाटण) आणि श्रीवर्धन दादासाहेब सुर्यवंशी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

संशोधन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी माझ्या पाठीशी नेहमी सावली प्रमाणे उभी राहणारी माझी अर्धागणी सौ. अश्विनी कदम हीचे सहकार्य लाभले.चि. गिरीराज अमर शिंदे (इस्लामपूर) याचेही सहकार्य लाभले. आई व तात्या यांच्या आशिर्वादामुळेच हा प्रकल्प पूर्णत्वास गेला. त्याचप्रमाणे माझ्या संशोधन कार्यामध्ये प्रा. एकता दिलीप जाधव (मोठी भगिणी) यांचा आशिर्वाद नेहमी मला प्रोत्साहीत करत होता. त्याचप्रमाणे हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ज्यांचे सहकार्य लाभले मी त्यांचे मनपूर्वक आभार मानतो. पूर्ण प्रबंधाच्या टायपिंगची जबाबदारी श्री नंदकुमार देसाई यांनी करुन दिली त्यांचे मनपूर्वक आभार.

(डॉ. बंडू जयसिंग कदम)

अनुक्रमणिका

प्रकरण	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
	प्रतिज्ञापत्र	I
	प्रमाणपत्र	II
	ऋणनिर्देश	III
	तक्त्यांची यादी	IX
	आलेखांची यादी	XI
पहिले	**प्रस्तावना आणि संशोधनपद्धती**	१ते२६
१.१	प्रस्तावना	१
१.२	विविध कालखंडातील स्त्री जीवन	२
१.३	स्त्रियांचा सामाजिक दर्जा	१३
१.४	एकल स्त्रिया	१४
१.५	संशोधन समस्या विधान	१५
१.६	अभ्यासाची व्याप्ती	१५
१.७	अभ्यासाचे महत्व	१६
१.८	अभ्यासाची उद्दिष्टे	१७
१.९	अभ्यासाची गृहितके	१८
१.१०	संशोधन पध्दती व तथ्य संकलन	१८
१.११	अभ्यासाचा कालावधी	२१
१.१२	अभ्यासाच्या मर्यादा	२१
१.१३	प्रकरण रचना	२१

१.१४	उपसंहार	२३
१.१५	संदर्भ	२३
दुसरे	**संबंधित साहित्याचा आढावा**	२७ ते ४३
२.१	प्रास्ताविक	२७
२.२	संबंधित साहित्याचा आढावा घेण्याचा हेतू	२७
२.३	संबंधित संशोधनाच्या आढाव्याचे महत्त्व	२८
२.४	संबंधित साहित्याचा आढावा	२९
२.५	प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण	३९
२.६	उपसंहार	३९
२.७	संदर्भ	३९
तिसरे	**तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती**	४४ ते ५५
३.१	प्रस्तावना	४४
३.२	भारतातील एकल स्त्रियांची स्थिती	४४
३.३	राज्यनिहाय एकल स्त्रियांचे प्रमाण	४७
३.४	सांगली जिल्हयातील एकल स्त्रियांचे प्रमाण	४८
३.५	तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती	४९
३.६	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे प्रमाण	५५
३.७	उपसंहार	५५
चौथे	**तथ्याचे निर्वाचन**	५६ ते १३३
४.१	प्रस्तावना	५६
४.२	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांची माहिती	५६

४.३	उद्दिष्टे चाचणी	१२८
४.४	गृहितके चाचणी	१३०
४.५	उपसंहार	१३३
पाचवे	**निष्कर्ष आणि शिफारशी**	१३४ ते १४७
५.१	प्रस्तावना	१३४
५.२	निष्कर्ष	१३४
५.३	शिफारशी	१४१
५.४	उपसंहार	१४७
	संदर्भसूची	
	परिशिष्ट	

तक्त्याची यादी

अ.न.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
१.१	तासगाव तालुक्यातील लोकसंख्यानिहाय एकल स्त्रियांची संख्या	२०
३.१	भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्यानुसार वर्गीकरण	४५
३.२	भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण	४५
३.३	भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्येनुसार तपशील (२०११)	४६
३.४	भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्यानुसार तपशील (२०११)	४६
३.५	राज्यनिहाय एकल स्त्रियांचे प्रमाण (२०११)	४७
३.६	तासगाव तालुक्यातील लोकसंख्यानुसार वर्गीकरण	५२
३.७	तासगाव तालुक्यातील ग्रामीण व शहरी स्त्रियांचे वर्गीकरण	५३
३.८	तासगाव तालुक्यातील स्त्रियांचे प्रमाण	५४
३.९	तासगाव तालुक्यातील स्त्रियांचे साक्षरता प्रमाण	५४
४.१	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियाचे गावनिहाय वर्गीकरण	५७
४.२	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रायांचे वयोगटानुसार वर्गीकरण	५८
४.३	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रायांचे धर्मानुसार वर्गीकरण	६०
४.४	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रायांचे जातनिहाय वर्गीकरण	६१
४.५	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रायांच्या वैवाहिकस्थिती वर्गीकरण	६३
४.६	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रायांच्या शैक्षणिक स्थितीचे वर्गीकरण	६४
४.७	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रायांच्या शैक्षणिक पात्रतेचे विभाजन	६५
४.८	शासकीय कागदपत्रे असणा—या एकल स्त्रियाचा तपशील	६७
४.९	एकल स्त्रियांकडे भ्रमण ध्वनी असलेला तपशील	६८
४.१०	एकल स्त्रियांच्या एकटेपणाचे स्वरुप	७०
४.११	एकल स्त्रियांच्या एकटेपणाविषयीची मते	७१
४.१२	एकल स्त्रियांच्याविषयीची कुटूंबातील व्यक्तींची मते	७३
४.१३	एकाकी जीवन जगताना सभोवतालचे वातावरण	७५
४.१४	एकल स्त्रियांची पूर्वीची कुटूंब पद्धती	७६
४.१५	एकल स्त्रियांची पूर्वीची कौटुंबिक पार्श्वभूमी	७८
४.१६	एकल स्त्रिया स्वंयपाकासाठी वापरत असणा—या साधनांचा	७९

	तपशील	
४.१७	पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता	८१
४.१८	एकल स्त्रियांची निवारा व्यवस्था	८२
४.१९	सभोवतालच्या परिसरातील सामाजिक समस्या	८३
४.२०	एकल स्त्रियांना उपलब्ध होणा—या आरोग्य विषयक सुविधा	८५
४.२१	एकल स्त्रियांच्या कुटूंब कर्ता म्हणून समस्या	८६
४.२२	एकल स्त्रियांना भेडसावणा—या समस्या	८८
४.२३	एकल स्त्रियांचे मनोबल वाढवण्यासाठी साहाय्यभूत घटक	९०
४.२४	एकल स्त्रियांच्या कौटुंबिक स्थितीचे वर्णन	९२
४.२५	एकटेपणा जगण्यापाठीमागील कारणमीमंसा	९४
४.२६	एकल स्त्रियांचा नोकरीविषयक तपशील	९५
४.२७	एकल स्त्रियांचा नोकरीविषयक तपशील	९७
४.२८	एकल स्त्रियांचा नोकरीची वेळ	९८
४.२९	एकल स्त्रियां रिकामा वेळ कोणाबरोबर व्यथित करतात	९९
४.३०	एकल स्त्रियां रिकामा वेळेचा उपयोग	१०१
४.३१	एकल स्त्रियांबददल कुंटुबाकडून अपेक्षा	१०३
४.३२	विविध संस्थेतील एकल स्त्रियांचे सभासदत्व	१०४
४.३३	एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्न	१०६
४.३४	एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्नाचे विविध मार्ग	१०७
४.३५	एकल स्त्रियांची दैनंदिन गरजाची पुर्तता	१०९
४.३६	एकल स्त्रियांची दैनंदिन गरजाची पुर्तता करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब	११०
४.३७	एकल स्त्रियांचे बचत गटाचे सभासदत्व	११२
४.३८	एकल स्त्रियांना मिळणा—या आर्थिक पाठबळाचा तपशील	११३
४.३९	एकल स्त्रियांना मिळणा—या रोजगाराचे स्वरूप	११४
४.४०	शासकीय योजनेचे लाभार्थी	११६
४.४१	शारीरिक समस्या	११८
४.४२	मानसिक समस्या	१२०
४.४३	सामाजिक समस्या	१२२
४.४४	आर्थिक समस्या	१२४
४.४५	समस्येवरती उपाययोजना	१२६
४.४६	उद्दिष्टे चाचणी	१२८
४.४७	गृहितकाची चाचणी	१३०
४.४८	गृहितकाची चाचणी	१३०
४.४९	गृहितकाची चाचणी	१३१
४.५०	गृहितकाची चाचणी	१३१
४.५१	गृहितकाची चाचणी	१३२

आलेखांची यादी

अ.न.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
४.१	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे वयोगटानुसार वर्गीकरण	५९
४.२	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे धर्मानुसार वर्गीकरण	६०
४.३	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे जातनिहाय वर्गीकरण	६२
४.४	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या वैवाहिकस्थिती वर्गीकरण	६३
४.५	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या शैक्षणिक स्थितीचे वर्गीकरण	६४
४.६	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या शैक्षणिक पात्रतेचे विभाजन	६६
४.७	शासकीय कागदपत्रे असणा—या एकल स्त्रियाचा तपशील	६८
४.८	एकल स्त्रियांकडे भ्रमण ध्वनी असलेला तपशील	७०
४.९	एकल स्त्रियांच्या एकटेपणाचे स्वरुप	७२
४.१०	एकल स्त्रियांच्या एकटेपणाविषयीची मते	७३
४.११	एकल स्त्रियांची पूर्वीची कुटूंब पद्धती	७७
४.१२	एकल स्त्रियांची पूर्वीची कौटुंबिक पार्श्वभूमी	७८
४.१३	एकल स्त्रिया स्वंयपाकासाठी वापरत असणा—या साधनांचा तपशील	८०
४.१४	पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता	८१
४.१५	एकल स्त्रियांची निवारा व्यवस्था	८२
४.१६	सभोवतालच्या परिसरातील सामाजिक समस्या	८४
४.१७	एकल स्त्रियांना उपलब्ध होणा—या आरोग्य विषयक सुविधा	८५
४.१८	एकल स्त्रियांच्या कुटूंब कर्ता म्हणून समस्या	८७
४.१९	एकल स्त्रियांना भेडसावणा—या समस्या	८९
४.२०	एकल स्त्रियांचे मनोबल वाढवण्यासाठी साहाय्यभूत घटक	९१
४.२१	एकल स्त्रियांचा नोकरीविषयक मत	९६
४.२२	एकल स्त्रियांचा नोकरीविषयक तपशील	९७
४.२३	एकल स्त्रियांचा नोकरीची वेळ	९८
४.२४	एकल स्त्रियां रिकामा वेळ कोणाबरोबर व्यथित करतात	१००
४.२५	एकल स्त्रियां रिकामा वेळेचा उपयोग	१०१
४.२६	एकल स्त्रियांबददल कुंटुबाकडून अपेक्षा	१०३

४.२७	विविध संस्थेतील एकल स्त्रियांचे सभासदत्व	१०५
४.२८	एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्न	१०६
४.२९	एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्नाचे विविध मार्ग	१०८
४.३०	एकल स्त्रियांची दैनंदिन गरजाची पुर्तता	१०९
४.३१	एकल स्त्रियांची दैनंदिन गरजाची पुर्तता करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब	१११
४.३२	एकल स्त्रियांचे बचत गटाचे सभासदत्व	११२
४.३३	एकल स्त्रियांना मिळणा—या आर्थिक पाठबळाचा तपशील	११३
४.३४	एकल स्त्रियांना मिळणा—या रोजगाराचे स्वरूप	११५
४.३५	शासकीय योजनेचे लाभार्थी	११६

प्रकरण पहिले

प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

१.१ प्रस्तावना

१.२ विविध कालखंडातील स्त्री जीवन

१.३ स्त्रियांचा सामाजिक दर्जा

१.४ एकल स्त्रिया

१.५ संशोधन समस्या विधान

१.६ अभ्यासाचे महत्व

१.८ अभ्यासाची उद्दिष्टे

१.१० अभ्यासाची गृहितके

१.१० संशोधन पध्दती व तथ्य संकलन

१.११ अभ्यासाचा कालावधी

१.१२ अभ्यासाच्या मर्यादा

१.१३ प्रकरण रचना

१.१४ उपसंहार

१.१५ संदर्भ

प्रकरण पहिले

प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

१.१ प्रस्तावना

'यंत्र नार्यस्तु, पुज्यते, रमन्ते दत्र देवता' भारतीय संस्कृतीत समाजात महिलांना पूजनीय स्थान दिल्याने आणि देवता म्हणून वंदन केल्याने आपण आपले कर्तव्य पार पाडतो अशी मानसिकता दिसते. महिलांना सांस्कृतिक सन्मान दिला जात असला तरीही प्रत्यक्षात सामाजिक दृष्टया स्त्रि.पूरुष समानतेची बांधिलकी मानण्याची वचनबध्दता अस्तित्वात व आंमलात येतेच असे नाही. परिणामी महिलांना आपल्या स्वांतत्र्य,सन्मान आणि स्वहितासाठी आजच्या युगात संघर्ष करावा लागतो असे चित्र पाहावयास मिळते. अनेक आघाडयांच्यावर असमानतेची आव्हाने पेलावी लागत आहेत. महिला ही करियरिस्ट असो वा गृहिणी ,सुशिक्षित असो अशिक्षित, ग्रामीण असो शहरी ज्या त्या परिस्थिती आणि वातावरणानुसार भिन्न तीव्रतेची पण समान सुत्र असलेली आव्हाने पेलावी लागतात. पुरुषप्रधान संस्कतीमध्ये स्त्रियांना आजही अनेक आव्हानांना तोंड दयावे लागते हे सत्य आपनास स्विकारावे लागत आहे. स्त्रियांच्या संदर्भातील असणा—या समस्यांमध्ये दिवसेंदिवस वाढच पहावयास मिळते. महिलांचे घटते प्रमाण, स्त्री—भृण हत्या, विनयभंग यासारख्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे.

विकासामधील एक महत्वपूर्ण घटक म्हणून स्त्रियांच्याकडे पाहिले जात आहे. पण ही नाण्याची एक बाजू आहे. दुस—या बाजूला समाजामध्ये विधवा, घटस्फोटित,

निराधार, परितक्त्या स्त्रिया विकासापासून वंचित पाहावयास मिळतात. त्यांच्या समस्यामध्ये दिवसेदिवस वाढच होत आहे. यामध्ये आणखी एक घटक प्रकर्षाने पाहावयास मिळतो तो म्हणजे एकल स्त्रिया होय. एकल समस्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. समाजामध्ये हीन दर्जा त्यांना दिला जातो. प्रस्तुत अभ्यासामध्ये वंचित घटकांमधील तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा मागावो घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

१.२ विविध कालखंडातील स्त्री जीवन –

वैदिक ते स्वातंत्र्योत्तर काळ या कालावधीत भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रीच्या एकंदरीत जीवनपद्धती कशा प्रकारे चढउतार होत गेले याचा मागोवा घेतला तर असे जाणवते की,[१] वैदिक व उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा दर्जा बराच वरचा होता. कालांतराने तिचे अधिकार हिरावून घेतले गेले. मध्ययुगात तर तिची अवस्था दयनीय झाली. या काळात तिच्यावर अनेक बंधने लादली गेली. खरेतर वैदिक काळापासून स्त्रीला शक्तीची प्रतीक मानण्याची परंपरा सुरु झाली. म्हणून स्त्रीची लक्ष्मी, दुर्गा,सरस्वती या विविध रुपात आराधना करण्याची परंपरा आजतागायत चालू आहे. तिच्याअभावी पुरुष हा अपूर्ण मानला जातो. कुटूंबात स्त्रीला अर्धांगिनी म्हणून काही बाबतीत बरोबरीचा दर्जा दिला सहज अनुमान निघते.[२] एकंदरीत अनादिकाळापासूनच्या समाजजीवनाचा मागोवा घेतला तर असे लक्षात येते की, या समाजात स्त्रीला दुय्यम दर्जा दिलेला आहे. दुय्यम दर्जा स्वीकारलेली स्त्री ही खरोखरच समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने जीवन जगत आलेली असेल हे तर्क सुसंगत वाटत नाहीत. म्हणजे ती अनेकविध बंधनातच अडकलेली होती असे अनुमान निघते. अर्थात,

वेगवेगळया कालखंडात ही बंधने कशी नि कोणत्या स्वरुपाची होती यांचा मागोवा घेणे आवश्यक वाटते. सोयीच्या दृष्टीने भारतीय समाजाच्या इतिहासाचे सर्वसाधारणपणे

१. वैदिक काळ २. सूत्रे माहकाव्य व प्रारंभिक स्मृतीकाळ ३. उत्तरकालीन स्मृतीकाळ ४. मध्ययुगीन कालखंड ५. ब्रिटिश राजवटीचा कालखंड आणि ६. स्वातंत्र्योत्तर कालखंड असे एकूण सहा कालखंड मानले जातात.

१.वैदिक कालखंड :

इ. स. पूर्व ६०० पर्यंतचा कालखंड समला जातो. या कालखंडात तुलनात्मकदृष्टया स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचे व गौरवाचे स्थान होते असे काही विचारवंत आग्रहपूर्वक सांगतात. स्त्रियांना उपनयन संस्काराचा हक्क प्राप्त झालेला होता. त्या पुरुषांप्रमाणेच विविध कला व विद्या यांचे अध्ययन करु शकत होत्या. मुलींचे विवाह १६—१७ व्या वर्षी होत होते. सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक यासारख्या अनेकविध कार्यक्रमांमध्ये स्त्रिया —पुरुषांच्या बरोबरीने भाग घेऊ शकत असत.[३]

शिवाय याच काळात मुलींचे उपनयन मुलांइतकेच नियमितपणाने आणि योग्य वेळीच होत होते. ब्राह्मचर्य आणि शिक्षण मुलांइतकेच मुलींना आवश्यक आहे असे मानले जात होते. स्त्री व पुरुष या दोघांकरिताही विवाह हा महत्त्वपूर्ण व पवित्र संस्कार मानला गेला होता.[४] या काळात सती प्रथा नव्हती. विधवांना पुनर्विवाह करण्यची परवानगी होती. एवढेच नाहीतर त्यांना विवाह विच्छेदनाचाही अधिकार होता.

एवढेच नाहीतर स्त्रीला सम्राज्ञी मानून पुरुष निर्माण करणारी मातासुद्धा मानले जाई. स्त्रीविना पुरुषाची प्रतिष्ठा नाही. स्त्री ही कुटूंब,समाज आणि राष्ट्र यांना स्वर्ग बनवते.[५] यावरुन असे अनुमान निघते की, या काळात स्त्री बरीच स्वतंत्र होती. तिचा दर्जा बराच उंचावलेला होता. वैदिक काळातील स्त्री ही पुरुषांप्रमाणेच सर्व क्षेत्रात काम करण्यास योग्य होती. तिच्या उन्नती होऊ शकते असे सूत्रीकरण बनले गेले होते म्हणजे राष्ट्रच्या आणि समाजाच्या उन्नतीसाठी एक आवश्यक अंग म्हणूनच स्त्रीकडे बघितले जाई.[६]

मात्र स्त्रीविषयक स्वातंत्र्याच्या धरसोड प्रवृत्तीमुळे या कालखंडाच्या उत्तरार्धात स्त्रीवर थोडीफार बंधने टाकण्यात आली होती. त्यातुनच स्त्री शिक्षणाची प्रथा हळूहळू कमी होऊ लागली. तथापि, या काळात पुरुष सतत युद्धात गुंतलेले असल्याने कृषी, युद्धसामग्री निर्मिती व इतर अर्धोत्पादन कार्यात स्त्रिया या मोठया प्रमाणात भाग घेत असत. धर्मविचारानुसार स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले गेले होते. स्त्रीशिवाय पुरुषास अधिकार नव्हता.[७] या कालखंडात नाही म्हटले तरी स्त्रियांची एकंदरीत वैयक्तिक आणि सामाजिक परिस्थिती बऱ्यापैकी होती. म्हणजे ती अगदीच दैयनीय नव्हती असे लक्षात येते. कारण स्त्री ही अर्थोत्पादनाच्या बाबतीत पुरुषाची सहचारीणी म्हणून जीवन जगत असे.[८]

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने सहभाग होता. हे सत्य मान्य केले गेले आहे. कारण असे जर नसते तर ती पहिली कृषीवल मानली गेली नसती व कृषी उत्पादन करु शकली नसती. एवढेच नाही तर युद्धसामग्रीच्या निर्मितीलासुद्धा तिचा हातभार लागला नसता. कुटुंब, शेती, पशुपालन, युद्धसामग्री निर्मिती, धर्मविषयक

आणि सामाजिक कार्य या प्रत्येक क्षेत्रात स्त्री जशी जीवन जगली तशीच अर्थोत्पादनातसुद्धा ती आघाडीवर होती. तिचे हे कार्य एक प्रकारचे उद्योगसदृश्य स्वरुपाचे होते असे ठाम अनुमान निघते.

१. सूत्रे महाकाव्य व प्रारंभिक स्मृतिकाळ :

इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा कालखंड स्त्री दर्जा बाबतचा संक्रमणाचा कालखंड समजला जातो. आधीच्या प्रमाणेच याही कालखंडात स्त्रीला पूज्य मानून आदराने व प्रेमाने वागविले जाई. जेथे स्त्रियांचा आदर केला जातो तेथे देवदेवतांचा वास असतो असे उद्‌गार भीष्माचार्यांनी काढले होते. दुसऱ्या एका ठिकाणी याच भीष्माचार्यांचे स्त्रीसंबंधी विचार वेगळे आहेत. ते म्हणतात की, स्वभावात: स्त्री ही स्वार्थी आहे. ती स्वार्थावर विजय मिळवू शकत नाही म्हणून तिला पुरुषाचे संरक्षण आवश्यक आहे.[९]

याच कालखंडात स्त्रीचे विवाहसमयीचे वय कमी होऊन तिच्या उपनयन संस्कारावर प्रतिबंध करण्यात आला. किंबहुना विवाह हाच स्त्रियांचा उपनयन संस्कार असल्याने त्यांना वेगळया उपनयनाची आवश्यकता नाही, अशी घोषणा इ.स.पूर्व तीनशेच्या सुमारास केली गेली. म.म. काणे म्हणतात, मनुस्मृतीच्या काळात स्त्रियांची उपनयनाची प्रथा बंद केली होती. एवढेच नाहीतर मनुस्मृती प्रमाणे याज्ञवल्क्य स्मृतीनेही स्त्रियांचे विवाहाखेरीज बाकीचे संस्कार आमंत्रक करावेत असे सांगितले होते. म्हणजेच स्त्रियांच्या बाबतीत केवळ विवाह हाच समंत्रक आणि बाकी जातकर्म हे सर्व अमंत्रक मानले गेल्याने तिचा दर्जा खालावला गेला असे म्हणता येईल. उपनयन हा संस्कार काढून घेण्यामागचा उद्देश हा की, स्त्रीने परपुरुषाच्या संगतीत येऊ नये

असाच वाटतो.[१०] शिवाय हळुवारपणे तिला शिक्षणापासून वंचित करुन पुरुषांचा आश्रित करण्याकडे कल दिसून येतो. एकंदरीत स्त्री ही दुय्यम मानून तिच्याविषयी पाहिजे तेव्हा आणि पाहिजे तशी बंधने लादली जात होती हे लक्षात येते.[११]

याचाच अर्थ असा की, स्मृतीकाळात स्त्रियांच्या दर्जाला पुरुषी द्रष्ट लागली. मुलींचे व्रतबंध नाकारण्यात आले. वेदमंत्रांचा अधिकार गेल्यावर इतर धार्मिक कृत्यातील तिचा सहभाग हा फक्त 'मम' म्हणण्यापुरताच मर्यादित करण्यात आला. यावरुन असे अनुमान केले जावू शकते की, स्त्रियांचे सर्वसाधारण धार्मिक, सामाजिक तसेच वैवाहिक अधिकार जरी काढून घेतले तरीही तिचा आर्थिक सहभाग किंवा आर्थोत्पादनातील कार्य कमी झालेले अथवा नष्ट झाल्याचे उल्लेख आढळून येत नाहीत. स्त्रींचा वैदिक काळात जसा अर्थोत्पादनात सहभाग होता तसाच तो स्मृतीकाळातही असायला पाहिजे. किंबहुना तिला बौद्धिक कामातून वगळून कष्टाच्या कामात जास्त सक्रिय होण्याची संभावना टाळता येत नाही.[१२]

१.उत्तरकालीन स्मृतीकाळ :

इ.स. ६०० ते १००० हा कालावधी उत्तरकालीन स्मृतीकाळाचा कालखंड समजला जातो. या कालखंडात स्त्रियांच्या स्थानाविषयी विचार केला असता असे दिसून येते की, हा कालखंड स्त्रियांच्या दृष्टीने धार्मिक आणि सामाजिक संकीर्णतेचा काळ समजला जातो. या काळात स्त्रियांचा दर्जा फारच खालावत गेलेला दिसतो. समाजाचे आदर्श, साहित्यास प्रभावित करणारी स्वामिनी म्हणून वावरणारी स्त्री परतंत्र, पराधीन व असहाय ठरली. स्त्री ही शूद्रवत मानली जाऊ लागली. वयाच्या आठ ते दहा वर्षाच्या कालावधीत विवाह करावा असा प्रघात सुरु झाला. स्त्री शिक्षण

जवळजवळ संपुष्टात आले होते. याचाच अर्थ असा की, या अगोदरच्या कालखंडात जे काही उपनयन थोडयाफार प्रमाणात शिल्लक होते ते संपुष्टात तर आलेच, शिवाय स्त्रियांना एकेकाळी जी जुजबी शिक्षण देण्याची व्यवस्था होती तीहीनष्ट होत गेली. मुलींच्या विवाहाचे वय सोळा–सतरा वर्षांच्या वयावरुन अर्ध्यावर येऊन पोहोचले होते. याचा अर्थ असा की, याच कालखंडात हिंदू धर्माने स्त्रियांना विविध प्रकारची अपमानस्पद वचने लावलेली आहेत.[१३] उदा. जसे स्त्रियांना विविध प्रकारची अपमानास्पद वचने लावलेली आहेत. उदा. जसे स्त्रियांचा स्वभाव उपजतच पापी आणि नानाप्रकारच्या दुर्गुणांनी युक्त असतो. यासंबंधी एका श्लोकात असेही म्हटले आहे की जर एखाद्याला हजार जिभा असतील तर त्याला शंभराहून अधिक वर्षांचे आयुष्य लाभलेले असेल आणि त्याने जर या हजार जिभांनी आयुष्यभर दुसरे कोणतेही काम न करता फक्त स्त्रियांचे दोष सांगण्याचे काम केले तरीदेखील सर्व दोष सांगून होण्यापूर्वीच त्याला हे जग सोडावे लागेल एवढे दोष त्यांच्यात आहेत की ते कधीच संपणारे नाहीत. खोटेपणा, विचार न करता निर्णय घेणे, कपट, मुर्खपणा, अतिशय अधाशी वृत्ती, अशुद्धता आणि निर्दयता हे स्त्रियांचे 'स्वभावज' दोष होत.[१४]

मन,बुद्ध,शरीर,स्वभाव,आचार,विचार इत्यादी प्रकारची व्यक्तिमत्वाची जितकी म्हणून अंगे असतील तितक्या सर्व बाबतीत स्त्रिया दोषयुक्त असतात, असे भर्तृहरी म्हणतो (४३७). अशा तऱ्हेची आणि यांच्यापेक्षाही हीन दर्जा दाखविणारी व तिला तिचे व्यक्तिमत्त्वच नाही अशा प्रकारची वचने अनेक ठिकाणी आढळून येतात.[१५]

याच काळात स्त्रियांचे वेदाध्ययन आणि यज्ञयागादी करण्याचा हक्कही नाकारण्यात आला होता. ऋतुस्त्राव व प्रसूती या दोन गोष्टींमूळे विटाळ होतो त्यामुळेच स्त्रियांना धार्मिक विधीत सहभागी होता येत नाही असेही म्हटले आहे.[१६]

अर्थात, या कालखंडात स्त्रियांचे जेवढे म्हणून सामाजिक, धार्मीक, आणि इतर जे प्रतिष्ठेचे अधिकार होते ते सर्व काढून टाकण्यात आलेले असले तरी आर्थिक क्रियातील तिचा सहभाग मात्र नकारला गेला नाही. येथेही उत्पादन क्रियेत तिचा भरपूर वापर करुन घेतला. परंतु उत्पन्नावरील तिचा अधिकार मात्र नाकारण्यात आला. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रीला वंचित करण्यात आले होते.

जैन धर्मात तिला मानाचे स्थान असल्याचे अनेक उदाहरणावरुन निदर्शनास आलेले आहे. हिंदू धर्मियात स्त्रियांची जी स्थिती होती तिच्या पेक्षा बऱ्याच अंशी वरच्या दर्जाची स्थिती जैन धर्मिय मानत असलेले दिसते.[१७] तुलनात्मक दृष्टया जैन धर्मियात विचार व दृष्टीकोन खूप उदार होता. या काळात स्त्रियांना अनेक बाबतीत व्यक्तीमत्व विकास होण्यास मार्ग खुलाकरुन तसा विकास उन्नती, प्रगती स्त्रियांनी साधलेली दिसून येते. परंतु याही बाबतीत जैन धर्मालाही मर्यादा होती कारण हा जैन धर्माचा स्त्रि विषयक विशाल आणि उदात्त दृष्टीकोन बाकी धर्मातील लोकांना सहन होणारा व आवडणारा नव्हता. जैन धर्मा प्रमाणेच बौद्ध धर्मात गौतम बुद्धाचा स्त्रीविषयक दृष्टीकोन संमीश्र होता.[१८] बौद्धधर्मात स्त्रीयांना अनेक अधिकार, हक्क व कर्तव्य बहाल केल्याची उदाहरणे आहेत. या काळात स्त्रीच्या कर्तबगारीला पुरेपुर चालना मिळत असे व ती अनेक क्षेत्रात कार्य करत असे. त्याच बरोबर सामाजिक दृष्टीकोन ही स्त्री – पुरुषाकरीता अनेक बाबतीत समान असल्याने दिसून येते.[१९]

म्हणूनच ऱ्हीस डेव्हिस म्हणतो की, बौद्ध धर्मामुळे आणि बौद्ध धर्मातच स्त्रीने प्रगतीचा उच्चांक गाठलेला होता.[२०]

तात्पर्य, जैन व बौद्ध धर्मांनी स्त्रियांना संन्यास घेण्याचेही स्वातंत्र्य दिले गेले होते त्यावरुन हे लक्षात येते की, या काळात स्त्रियांबद्दलचा दृष्टीकोन स्मृतीकालीन हिंदू धर्माप्रमाणे संकुचित नव्हता.

एकंदरीत असे म्हणता येईल की, एकीकडे याच काळात जैन व बौद्ध धर्माने स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ मानून सर्व अधिकार प्राप्त करुन दिले. एवढेच नाहीतर अर्थोत्पादनातही तिला पूर्णपणे बरोबरीच्या नात्याने सामावून घेतले होते. त्यांना शिक्षणाचाही अधिकारही मिळत असल्याने या काळात स्त्रिया मोठया प्रमाणात लेखिका, धर्मप्रचारक व शिक्षिका होऊ शकल्या. याउलट हिंदू धर्माचा स्त्रियांबद्दलचा दृष्टीकोन अगदी विपरीत असल्याचे जाणवते. कारण हिंदू धर्माने जे अधिकार स्त्रीला दिलेले होते तेही या काळात कमी करुन तिला अनेक बाबतीत दोषी ठरविले. तिला घरात गृहीनी म्हणून बंदिस्त ठेवण्यावर भर दिलेला आढळतो.[२१]

मध्ययुगीन कालखंड :

हा ११०० ते १७०० चा कालखंड मुस्लिम राजवटीचा समजला जातो. आठव्या शतकात मोहंमद बीन कासीम या अरबाने भारतातील सिंध प्रांतावर सर्वप्रथम यशस्वी आक्रमण केले. येथून पुढे ४०० वर्षे सतत आक्रमणे होत राहिली. या कालखंडात पारंपारिक भारतीय हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मीय स्थिर समाजजीवनाचे उद्ध्वस्तीकरण घडून आले.

हिंदू, बौद्ध आणि जैनतीनही धर्म विचारांचा पगडा असलेल्या स्थिर भारतीय समाजात मुसलमानांच्या आक्रमणामुळे अस्थिरता निर्माण झाली.[२२] अर्थात, संपूर्ण भारतीय समाजजीवनात मुस्लिम आक्रमणाचा प्रभाव पडला नसला तरी काही भागावर त्याचा परिणाम घडून आला. जातीव्यवस्थेत विभागलेल्या समाजजीवनातील कनिष्ठ जातीच्या अनेक लोकांनी मुस्लिम धर्म अंगीकारला. मुसलमानांची बेबंदशाही, धर्मांतरीत मुस्लिमांची हिंदू समाजावरील सूडाची भावना या धुमचक्रीत संपत्तीप्रमाणेच हिंदू स्त्रियांचीही लूट करण्यात आली. एकीकडे स्त्रियांचे काढून घेतलेले सर्व धार्मिक नि सामाजिक अधिकार आणि दुसरीकडे मुस्लिमांचे आक्रमण यात तिची जीवघेणी ससेहोलपट झाली.या काळात स्त्रियांचे जीवन अत्यंत दयनीय बनले. स्मृतीपुराण काळात रुढझालेले निर्बंध या काळात अधिक कठोर बनत गेल्याने स्त्रीचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा खूपच खालच्या पातळीवर आला. उच्च वर्णीयांमध्ये पडदा आणि बालविवाह पद्धती मोठया प्रमाणात रुढझाल्या होत्या.[२३] या कालखंडातसुद्धा पुरुषप्रधानतेची घट्ट पकड असल्यामुळे समाजातील स्त्रीचे स्थान दुरवस्थेचेच होते. या काळात स्त्रियांवर जास्तीत जास्त गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न केला गेला होता. मुस्लिमांसहित भारतीय समाजातील सर्व प्रमुख धर्मीय लोकांनी स्त्रीचे सर्व अधिकार हिरावून घेतले होते. कष्ट करुन जगणे आणि संततीला जन्म देऊन तिचे संगोपन करणे एवढेच तिचे समाजातील निर्जिव स्थान अबाधित ठेवण्यात आले होते.

असे जर नसते तर बाराशे ते पंधराशे या सुलतानशाहीच्या कालखंडात बालविवाहाला चालना मिळाली नसती आणि विधवा विवाहावर बंधने घालण्यात आलीही नसती. स्त्रिजास्तीत जास्त सुरक्षित रहावी म्हणून पडदा पद्धतीचा अंमलही

करण्यात आला होता. आक्रमणे,बेबंदशाही, धर्मांतरीत संकटप्रसंगी आपले स्त्रीत्व टिकून रहावे म्हणून काही स्त्रियांनी आपणहून सती जाण्याचा मार्ग स्वीकारला आणि पुढे ती प्रथा धर्माच्या नावाखाली स्त्रियांकरिता जाचक ठरली. याच कालखंडात जनानखाना पद्धतीच्या उदात्तीकरणावर भर दिला गेला असावा असे अनुमान काढता येते. [२४] याचाच अर्थ असा की, स्त्रीच्या दर्जाची अवनती होऊन तो दर्जा खूपच घसरला. विविध प्रथांच्या अतिरेकामुळे स्त्रीचे पूर्वीचे स्वातंत्र्य आणि हक्क संपुष्टात तर आलेच, त्याशिवाय तिच्या दर्जात कमालीची घसरण घडून आली. अर्थातच सुलतानशाहीत स्त्रियांची सामाजिक आणि धार्मिक अवस्था जशीघसरली गेली तशीच तिच्या आर्थिक दर्जातसुद्धा घसरण झाली. सुलतानशाहीचा हा सिलसिला पुढेही मोगलाच्या काळात टिकून राहिलेला दिसतो.[२५]

सुलतानशाहीचा अस्त आणि इंग्रजांचा उदय यामधला कालखंड हा मोगलशाहीचा कालखंड समजला जातो. या काळातील सम्राट अकबर हा मोगलशाहीतील एक आदर्श राजा समजला जातो. सम्राट अकबरानी स्त्रियांबाबत उदार धोरण स्वीकारुन काही सुधारणा करण्याचा प्रयत्न केला होता. बालविवाह ,सतीप्रथा बंद करावी .व स्त्रीने मुक्तपणे जीवन जगावे असे त्याचे विचार होते. वेश्यांनी स्वतंत्र वस्ती करुन रहावे यासाठीही त्याने प्रयत्न केलेत. परंतु हे त्याचे स्त्रीविषयक उदारमतवादी विचार सनातनी लोकांना मानवणारे नव्हते.

अकबरानंतर मोगलशाहीत स्त्रीच्या अधोगतीत सातत्याने भर पडत गेली. कनिष्ठ जातीप्रमाणेच स्त्रीससुद्धा कष्टकऱ्याचे जीवन जगावे लागले. तसेच अर्थोत्पादनात तिचा सहभाग नगण्य समजण्यात आला. शेतीव्यवसाय, पशुपालन, गृहद्योग इत्यादी

व्यवसायात ती पुरुषांची गुलाम—वजा बटीक म्हणून जीवन जगली. मराठेशाहीतसुद्धा जवळपास स्त्रियांची हीच स्थिती होती. सामाजिक आणि राजकीय परिस्थिती या क्षेत्रात मुस्लिमांनी हिंदूंच्या राज्यात थोडाफार फरक घडवून आणला असला तरी आर्थिक आणि धार्मिक बाबतीत स्त्री सारख्याच पातळीवर जीवन जगत होती; मराठेशाहीत आणि पुढे पेशवाईत राजघराणातील अगदी मोजक्याच स्त्रियांनी आपली राजकीय कारकीर्द कमी अधिक प्रमाणात गाजवली असली तरी इतर स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक नि धार्मिक क्षेत्रात कुठल्याही प्रकारचा फरक पडलेला नव्हता.[२६] तथापि, मध्ययुगात भक्ती आंदोलनाचे स्त्रियांच्या धार्मिक व सामाजिक उन्नतीस चालना देण्याचे कार्य केले असल्याने परंपरेनुसार स्त्रिया जास्तीत जास्त धार्मिक कार्यात गुंतल्या गेल्या. जवळपास सर्व संतांनी समाजातील सर्व जातींच्या स्त्री—पुरुषांना समानतेचे शिक्षण दिले होते. इ.स. पूर्व सहाव्या, सातव्या शतकात जैन व बौद्ध धर्माने जे सामाजिक आंदोलन घडवून आणले होते तशाच प्रकारचे आंदोलन या काळातील संतांनी भक्तिमार्गाच्या माध्यमातून सुरु केले होते. एवढे सर्व प्रकारचे प्रयत्न होऊनही स्त्रीचा दर्जा उंचावला तर नाहीच; पण ती अधिकाधिक पुरुषाची बटीक होत गेली.

१.३ स्त्रियांचा सामाजिक दर्जा

वेदकाळातील स्त्रियांचा दर्जा उच्च होता असे कळते. वेदकाळात स्त्रियांना पुरुषाप्रमाणे स्थान होते. स्त्री ही सर्वश्रेष्ठ गुरु समजली जात होती. त्याच प्रमाणे अर्थवेदात स्त्री पुर्नविवाहाचा स्पष्ट उल्लेख होता बालविवाहाची प्रथा नव्हती. मुलींचे १६व्या वर्षानंतर विवाह होत असल्याने मुलींच्या शिक्षणाला योग्य कालावधी उपलढध होता. मुलींना पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. थोडक्यात वेदकाळात स्त्री—पुरुष यात

फरक नव्हता. हे सारे खरे असले तरी स्त्रियांवर अन्याय होतच नव्हते असे नाही. त्याकाळात ही पुत्र जन्माला यावा म्हणून मंत्र व विधी होत असत. पण आजच्या एवढे स्त्रियांचे दुय्यम स्थान नव्हते.

नंतरच्या काळात मानसिकता बदलत गेली. सुत्रकाळात स्त्रियांचा समाजातील दर्जा खालावला आणि लोकांचा या सुमारास संख्याधिक्यामुळे स्थलांतर करण्याची वेळ आली त्यांची संस्कती हळूहळू बदलू लागली पुरुष वर्गाचे महत्व वाढू लागले. स्त्री दुय्यम कमी दर्जाच्या समजल्या जाऊ लागली. स्त्रियांचे स्वातंत्र्यलोप पावले त्यांच्या भरण पोषणाची जबाबदारीही पुरुषांनी स्वीकारली व स्त्री हीनत्व सिध्द करणा—या चाली आर्य समाजात निर्माण झाल्या पुढे मनुने पुरुषाला आई, बहिण, मुलगी यांच्या पासून सावध रहायला सुचवले होते. दुर्गुणांची केवळ खान अशा स्त्रीवरकोणाचे तरी दडपण असने आवश्यक आहे. असे मनु म्हणतो. स्त्रियांच्या कपाळी पारतंत्र्याचा शिक्का कायमचा बसत गेला. १९ व्या शतकात भारतावर इंग्रजांचे राज्य आले हिंदी जनता परकीय सत्तेच्या अधिपत्याखाली जीवन जगू लागली. त्याचा परिणाम स्त्रियांवर झाला.

भारत स्वातंत्र्यानंतर स्त्रीला घटनेने समान संधी दिली म्हणून कोणत्याही अधिकारपदावर यायला तिला अडचण राहिली नाही. तरीही त्यांच्या दर्जात मात्र फारसा फरक पडला नाही. स्त्रियांच्या दर्जा संदर्भात राणी हिक्टोरीयाा कारकिर्दीतील प्रख्यात उदारमतवादी कवी लॉर्ड टेनिसन यांनी म्हटले आहे.

‘पुरुषाला जग आणि बाईला चुल,

पुरुषासाठी समशेर आणि बाईसाठी सुई,

पुरुष चालणार बुध्दीने आणि बाई जगणार भावनेने

बाकी सारे गौडबंगाल.'

यावरुन स्त्रियांचा दर्जा लक्षात येतो.

२० वे शतक संपले तरीही स्त्री पुरुष समानता नाही स्त्रियांना अजूनही दुय्यम स्थान दिले जाते. अशी स्थिती सर्वसाधारण स्त्रियांची असेल तर समाजात असणा—या घटस्फोटीत, निराधार परितक्त्या, एकल स्त्रियांच्या समस्या फारच भयानक आहेत हे वास्तव सत्य स्विकारावे लागते.

१.४ एकल स्त्रिया

आज समाजामध्ये वंचित स्त्रिया पहावयास मिळतात यामध्ये घटस्फोटीत, निराधार, परितक्त्याअसतात त्यापैकी एक म्हणजे एकल स्त्रिया होय. **'एकल स्त्रिया म्हणजे एकटे पणाने जीवन व्यतीत करणा—या स्त्रिया होय'.** समाजामध्ये वेगवेगळया कारणामुळे त्यांना एकटे जीवन व्यथित करावे लागते. मनामध्येगाव, गोतावळा, घर, नाते—गोते यांची ओढ असतानाही अशा प्रकारचे जीवन जगावे लागते. त्यांना दारिद्रयात दु:खाने जगावे लागते ही शोकांतिका स्वीकारावी लागते. एकल स्त्रियांना धर्म, जात, वर्गआणि पुरुषप्रधानता स्त्रियांना आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यावर खिंडीत गाठले जाते. ज्या घरासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवते त्याच घरापासून तिला वेगळे रहावे लागते.

१.५ संशोधन समस्या विधान

समाजामध्ये एकल स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे हे विकासाच्यादृष्टीने घातक आहे. एकल स्त्रियांमध्ये प्रामुख्याने विधवा घटस्फोटीत निराधार मागासवर्गीय परितक्त्यांचा समावेश होतो. एकल स्त्रिया विकासापासून पूर्णपणे वंचित आहेत. एका बाजूला विकासप्रक्रियेत पुरुषांप्रमाणे स्त्रियांचे स्थान तितकेच महत्वाचे मानत असताना एकल स्त्रियांच्या समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसून येतात.अपूरे उत्पन्न असल्यामुळे त्या आपल्या कौटुंबिक समस्या सोडवू शकत नाहीत. मुळातच एकटे जीवन जगत असल्यामुळे विकासप्रक्रियेमध्ये त्या फारशा भाग घेत नाहीत. या सर्वांचा परिणाम म्हणजे देशाचा विकास होऊ शकणार नाही. एकल स्त्रियांच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रस्तुत अभ्यासात प्रयत्न करण्यात आला.

१.६ अभ्यासाची व्याप्ती

'तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा एक चिकित्सक अभ्यास' हे अभ्यासाचे शीर्षक आहे. हा अभ्यास करताना प्रामुख्याने तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा विचार केला जाणार आहे. संदर्भसहित अभ्यास म्हणून सांगली जिल्हयातील इतर तालुक्यांचा संक्षिप्त अभ्यास करण्यात येणार आहे. तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचा अभ्यास करताना आर्थिक आणि सामाजिक स्थितीच्या अभ्यासाबरोबर लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, वीज पुरवठा, बॅका, विमा,पोस्ट, वाहतुक दळणवळण इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे. याचबरोबर एकल स्त्रियांच्या विकासासाठी शासनाच्या भूमिकेचा अभ्यास केल्यामुळे अभ्यासाचे महत्व वाढले आहे.

१.७ अभ्यासाचे महत्व

प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मुळातच विकासामधील एक महत्वपूर्ण घटक म्हणून स्त्रियांच्याकडे पाहिले जाते. एवढेच नव्हेतर स्त्रिया विकासाची प्रक्रिया आणखी गतीमान करु शकतात. पण समाजातील वास्तव परिस्थिती पूर्णपणे वेगळी पहावयास मिळते. एका बाजूला महिला सबलीकरण व सक्षमीकरण झाले पाहिजे असे म्हटले जाते. दुस—या बाजूला तिच्या समस्येमधील दिवसेंदिवस वाढ पहावयास मिळते हे सत्य आपणास स्विकारावेच लागेल.

आज समाजामध्ये वंचित घटकांची विशेषत: एकल स्त्रियांची संख्या वाढताना दिसते. ही समस्या ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागामध्ये सुध्दा दिसून येते. मानव हा समाजशील प्राणी असून ही त्या स्त्रियांना अलिप्त जीवन व्यतीत करावे लागते एवढेच नव्हे तर कोणत्याही सामाजिक कार्यामध्ये सहभाग घेतला जाऊ दिला जात नाही.

अपूरे उत्पन्न राहणीमानाचा निकृष्ट दर्जा, सामाजिक कार्यातील अल्प सहभाग, आर्थिक शोषण, शासकीय अल्प स्वरुपात मदत, आरोग्य विषयक कमी सुविधा इत्यादी समस्यांना त्यांना नेहमी तोंड दयावे लागते. त्यांना अशा प्रकारचे एकटे जीवन जगण्यासाठी कारणीभूत घटकांचा, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी हा विषय हेतूपरस्पर घेतला. त्यांच्या समस्येवर उपायोजना सुचवण्यासाठी आणि समाजामध्ये मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रस्तुत अभ्यास करण्यापाठीमागचा मानस आहे.

१.८ अभ्यासाची उद्दिष्टे :—

प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

१) एकल स्त्रियांना एकटे आयुष्य जगण्याच्या कारणांचा अभ्यास करणे.

२) अभ्यास क्षेत्रातील एकल स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) एकल स्त्रियांच्या सामाजिक स्थान अथवा दर्जाचा अभ्यास करणे.

४) एकल स्त्रियांच्या बाबतीत शासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५) तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे

६) अभ्यास क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या समस्येवर उपाययोजना सुचविणे.

१.९ अभ्यासाची गृहितके

प्रस्तुत अभ्यासाची गृहितके पुढीलप्रमाणे

१) एकल स्त्रियांचा सर्वसमावेशक विकास झालेला नाही.

२) एकल स्त्रियांच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहेत.

३) सामाजिक कार्यामध्ये एकल स्त्रिया फारसा सहभाग घेत नाहीत.

४) एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्न कमी आहे.

१.१० संशोधन पध्दती व तथ्य संकलन :—

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे अचूक निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी व संशोधन पद्धतीमध्ये शास्त्रीयता आणि अद्यावतता आणण्यासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

तथ्य संकलन पद्धती :—

सामाजिक संशोधनामध्ये तथ्य संकलनास अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. तथ्य हे वास्तवाचे दर्शन घडवते, ज्याचे अवलोकन किंवा अनुभव प्रत्येकाला घेता येऊ शकतो. तथ्य म्हणजे असे निरिक्षण आहे की, ज्याच्या ज्ञानेद्रियांद्वारे अनुभव घेता येतो. तथ्य संकलनावरच सामाजिक संशोधनाची परिणामकता अवलंबून असते.

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे.

प्राथमिक स्त्रोत —

प्राथमिक तथ्य संकलनासाठी अवलोकन, निरिक्षण, मुलाखत या स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. एकल स्त्रियांशी संवाद साधून मुलाखतीद्वारे तथ्य संकलन करण्यात आले आहे.

द्वितीय स्त्रोत :—

तथ्य संकलनासाठी द्वितीय स्त्रोतामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, शोध प्रबंध, शासकीय प्रकाशने, शासकीय अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे तसेच इंटरनेटचा उपयोग करण्यात आला आहे.

माहितीचे प्रक्रियाकरण :—

तथ्य संकलनाच्या विविध साधनांचा व तथ्यांचा अवलंब करुन संकलित करण्यात आलेली माहिती तथा आकडेवारी ही विखुरलेल्या स्वरुपात असते. केवळ तथ्यांचे संकलन करणे म्हणजे संशोधन नसते. तर प्राप्त करुन घेतलेल्या तथ्यांचे सुयोग्य असे वर्गीकरण करुन संशोधन उद्दिष्टापर्यंत पोहचू शकेल याप्रमाणे माहितीचे संस्कारण व वर्गीकरण करणे महत्त्वाचे असते यासाठी प्रामुख्याने खालील पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे.

१. विश्लेषणात्मक पद्धती

२. आलेख पद्धती

३. संगणकीकरण

नमुना निवड :—

तासगाव तालुक्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात ६८ गावाची निवड करण्यात आली आहे. ६८ गावामधून १७६ एकल कुटुंबाचा अभ्यास करण्यात आला आहे.

तक्ता क्र. १.१

तासगाव तालुक्यातील लोकसंख्यानिहाय एकल स्त्रियांची संख्या

अ.न.	लोकसंख्या	गावांची संख्या	एकल स्त्रियांची संख्या
१	१००० पेक्षा कमी	०९	२३
२	१००१ ते २०००	२४	५२

३	२००१ ते ३०००	१२	३८
४	३००१ ते ४०००	०६	१५
५	४००१ ते ५०००	०५	१७
६	५००० पेक्षा जास्त	१२	३१
	एकूण	६८	१७६

स्त्रोत : बाल व एकात्मिक विकासविभाग,तासगाव पंचायत समिती तासगाव२०१८

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १००१ ते २००० लोकसंख्या असलेल्या गावामध्ये एकल स्त्रियांची संख्या ५२ इतकी आहे. ती सर्वात जास्त आहे. ३००१ ते ४००० या लोकसंख्येमधील गावामध्ये एकल स्त्रियांची संख्या १५ इतकी आहे.

सांख्यिकी साधने :—

संकलित प्राथमिक आणि दुय्यम तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, प्रमाण विचलन ,Z चाचणी इत्यादी सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

१.११ अभ्यासाचा कालावधी

अभ्यासासाठी निवडलेला कालावधी हा सन २०११ ते २०१७ पर्यंत असून तो ७ वर्षे आहे.

१.१२ अभ्यासाच्या मर्यादा

प्रस्तुत अभ्यास विषय भौगोलिकदृष्टया सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यापुरता मर्यादित आहे.हा अभ्यास करताना तालुक्यातील एक नगरपालिका आणि ६८ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली.

१.१३ प्रकरण रचना

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा एक चिकित्सक अभ्यास या संशोधन प्रकल्पाचे पाच प्रकरणामध्ये विभाजन केले आहे.

१) प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

संशोधन प्रकल्पाच्या पहिल्या प्रकरणामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा, एकल स्त्रिया, संशोधन समस्या विधान, संशोधन अभ्यासाची व्याप्ती, संशोधन अभ्यासाची आवश्यकता, अभ्यासाची उद्दिष्टे, अभ्यासाची गृहितके, संशोधन पद्धती व तथ्य संकलन अभ्यासाचा कालावधी, अभ्यासाच्या मर्यादा इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात आले आहे.

२) संबंधित साहित्याचा आढवा—

प्रस्तुत प्रकरणात संशोधन साहित्य आढाव्याचा हेतू, संबंधित साहित्य आढाव्याचे महत्त्व, संदर्भ ग्रंथ, संशोधन निबंध, वर्तमानपत्रातील लेख, विविध समित्यांचे अहवाल इत्यादींचा आढावा, संशोधनाचे वेगळेपण इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

३) तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती—

सदर प्रकरणात भारतातील एकल स्त्रियांची स्थिती महाराष्ट्रातील एकल स्त्रियांची स्थिती, सांगली जिल्हयातील एकल स्त्रिया, तासगाव तालुक्याचे भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक आर्थिक आणि लोकसंख्या विषयक माहिती घेण्यात आली आहे.

४) तथ्याचे निर्वाचन—

प्रस्तुत प्रकरणात तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांची सर्वसाधारण माहिती, त्यांची सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, एकल स्त्रियांची जीवनशैली आणि समाधान पातळी, एकल स्त्रियांच्या समस्या, एकल स्त्रियांच्या भविष्यकालीन अपेक्षा,उदिष्टांची तपासणी, गृहितकाची चाचणी इत्यादींचा विचार करण्यात आला आहे.

५) निष्कर्ष आणि शिफारशी

संशोधन प्रकल्पाच्या प्रकरणात प्रमुख निष्कर्ष,उपाययोजना, भविष्यकालीन अभ्यासाची दिशा इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

१.१४ उपसंहार

प्रस्तुत अभ्यासामध्ये तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न सत्यात आणयचे असल्यास पुरुषाप्रमाणे स्त्रियांचाही सर्वांगीण विकास करणे गरजेचे आहे. आज समाजामध्ये असणा—या वंचित स्त्रियांचा विकास होणे काळाची गरज बनली आहे. कारण एकल स्त्रियांच्या समस्या भयानक स्वरुपाच्या आहेत. एकल स्त्रिया एकटे जीवन जगण्यापाठीमागे कारणमीमांसा, त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती, त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक समस्या, त्यांच्या बद्दलची शासनाची भूमिका इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१.१५ संदर्भ

१) प्रा. चंद्रकांत खंडागळे, (१९९८), भारतीय समाज, विशाल ऑफसेट,

सांगली पृ. २२१.

२) बोबडे प्रकाश, (१९८८) 'भारतीय समाजरचना: पारंपारिक आणि आधुनिक' नागपूर प्रकाशन, पृ. १७.

३) साळुंखे आ. ह., (डिसेंबर १९१८)'हिंदू संस्कृती आणि स्त्री', प्रकाशक — राकेश आ.साळुंखे, 'लोकायत' १३, यशवंतनगर गेंडामाळ, सातारा, पृ. ४.

४) आळतेकर ए. एस., (१९६२) 'द पोझीशन ऑफ वुमेन इन इंडिया सीव्हिलायझेशन,' प्रकाशक — सुंदरलाल जैन, मोतीलाल बंगला, जवाहरनगर, दिल्ली — ६., पृ. ४७.

५) तत्रैव, पृ. ४७,४८

६) तत्रैव, पृ. ४९.

७) प्रशांतक कुमार, (१९६४) 'वैदिक साहित्य में नारी', वासुदेव प्रकाशन, दिल्ली —९, ,पृ. १०४.

८) बोबडे प्रकाश, (१९८८)'भारतीय समाजरचना', नागपूर प्रकाशन, पृ.१८०.

९) तत्रैव, पृ. १८३.

१०) साळुंखे आ. ह.,(डिसेंबर १९८९) 'हिंदू संस्कृती आणि स्त्री',मंजिरी—मकरंद सहनिवास, माहीम मुंबई, पृ. २०.

११) पांडे रेखा,(१९९०) 'वुमन इन इंडिया पास्ट ॲण्ड प्रेझेन्ट' नीलम उपाध्ये

चौक, पब्लिकेशन अलाहाबाद, इंडिया, पृ. १११.

१२) साळुंखे आ. ह.,(१९८९) 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', मंजिरी—मकरंद सहनिवास, प्रकाशन माहीम मुंबई,,पृ.१०७.

१३) अनंतराम शरयू, वंडसे उमा, (१९९७) 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. १११, ११६.

१४) साळुंखे आ.ह.,(१९८९) 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', मंजिरी—मकरंद प्रकाशन, माहीम मुंबई, पृ. १३६.

१५) पांडे रेखा, नीलम उपाध्ये, (१९९०) 'वुमन इन इंडिया पास्ट ॲण्ड प्रेझेंट',पब्लिकेशन अलाहाबाद, इंडिया, पृ. १८,१९.

१६) अनंतराम शरयू, उमा वंडसे, (१९८७)'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. १६

१७) काचोळे दा. धों.,(१९१९) 'भारतीय सामाजिक विचारवंत', कैलाश पब्लिकशन, औरंगाबाद, पृ. १११

१८) साळुंखे आ. ह.,(१९८९) 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', माहीम प्रकाशन, मुंबई, पृ. १५६.

१९) काचोळे दा. धो., (१९१९)'भारतीय सामाजिक विचारवंत', कैलाश

पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. १३

२०) साळुंखे आ. ह.,(१९८९) 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', मकरंद निवास प्रकाशन,मुंबई, पृ. १५७.

२१) काचोळे दा.धो., (१९१९)'भारतीय सामाजिक विचारवंत', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. १५, १६.

२२) साळुंखे आ.ह.,(१९८९)'हिंदु संस्कृती आणि स्त्री', प्रकाशन मुंबई, पृ. १५२,१५६.

२३) काचोळे दा. धों.,(१९१९) 'भारतीय सामाजिक विचारवंत', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. २३,२४.

२४) खंडागळे चंद्रकांत, (१९९८)'भारतीय समाज', प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली , पृ. १२९.

२५) पांडे रेखा, नीलम उपाध्ये, (१९९०) 'वुमन इन इंडिया पास्ट ॲण्ड प्रेझेन्ट', प्रकाशन अलाहाबाद, इंडिया, पृ. १७,१८.

२६) खंडागळे चंद्रकांत, (१९९८)'भारतीय समाज', प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, पृ. १२९.

प्रकरण दुसरे

संबंधित साहित्याचा आढावा

२.१ प्रास्ताविक

२.२ संबंधित साहित्याचा आढावा घेण्याचा हेतू

२.३ संबंधित संशोधनाच्या आढाव्याचे महत्त्व

२.४ संबंधित साहित्याचा आढावा

२.५ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

२.६ उपसंहार

१.७ संदर्भ

प्रकरण दुसरे

संबंधित साहित्याचा आढावा

२.१ प्रास्ताविक —

प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी संबंधीत साहित्याचा आधार घ्यावा लागला. तसेच संशोधन संमस्या निश्चित केल्या पासून अहवाल लेखन करेपर्यंत अनेक ग्रंथांचाही अभ्यासकास संदर्भ घ्यावा लागला आहे. या सर्व साहित्याचा संदर्भ घेऊन आढावा घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे. संबंधित साहित्याचा आढावा घेत असताना संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रातील लेख शोध निबंध संशोधन प्रकल्प इत्यादीचा घेतला आहे.

२.२ संबंधित साहित्याचा आढावा घेण्याचा हेतू —

संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधकास संबंधित साहित्याचा आढावा घेण्याचे हेतू स्पष्ट करावे लागतात. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

१. प्रस्तुत संशोधानास अभ्यासपूर्ण बैठक लाभावी.

२. प्रस्तुत संशोधनाला योग्य दिशा मिळावी आणि याविषयीच्या संदर्भात पूर्वी झालेल्या संशोधनाबाबत प्रस्तुत संशोधन नविन दृष्टीकोनाने व्हावे.

३. प्रस्तुत संशोधनासाठी खालील ग्रंथाचा आधार घेण्यात आला त्यांचा आढावा

थोडक्यात घेण्यात येत आहे. खालील ग्रंथातून संशोधनाच्या पद्धती, न्याय दर्शाच्या पद्धती, संख्याशास्त्रीय तंत्रे यांचे ज्ञान झाले आणि प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने त्याचा उपयोग केलेला आहे.

२.३ संबंधित संशोधनाच्या आढाव्याचे महत्त्व –

१.संकल्पित संशोधनासाठी एक संदर्भ चौकट तसेच सैधांतिक पार्श्वभूमी तयार होते.

२. स्वत:च्या स्थूल समस्येस संशोधनक्षम विशिष्ट रुप देता येते व शब्दांकन करता येते.

३. तत्सम समस्या पूर्ववर्ती संशोधकाने कोणत्या पद्धतींनी सोडवली, कोणता अभिकल्प वापरला तसेच कोणती साधने व संख्याशास्त्रीय तंत्रे वापरली याची माहिती मिळते.

४. निष्फळ व निरुपयोगी समस्या टाळल्या जातात. संशोधनाची पुनरावृत्ती टाळली जाते. आपल्या संशोधनाद्वारे अर्थपूर्ण पद्धतीने सद्य:स्थितीतील ज्ञानात भर टाकता येते.

५. आपल्या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ठरविता येते.

६. संशोधनाची पद्धती, साधने व तंत्रे कोणती वापरावीत ते ठरविता येते.

७. सिद्ध झालेल्या निष्कर्षांचा आपल्या संशोधनात वापर करता येतो.

८. संशोधकाला माहित नसलेली आधार सामग्री उपलब्ध होते.

९. संशोधकाला संशोधनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजते.

१०. नविन संकल्पना व प्रणालीचे ज्ञान होते.

११. स्वत:च्या समस्येचे मूल्यमापन व इतरांशी तुलना करता येते.

१२. अधिच्या संशोधकाने केलेल्या सूचनांचा, विषयांचा विचार करता येतो. २.४ **संबंधित साहित्याचा आढावा**

प्रा. साधना झाडबुके (२०१६)[१] यांनी 'महिला छेडछाड समस्या आणि उपाय' संशोधन लेखामध्ये महिलांच्या सामाजिक समस्या सविस्तर मांडल्या आहेत. लैगिक छेडछाडचा नेमका अर्थ, छेडछाडीसंबंधात मुलींनी काय केले पाहिजे, मुलींनी कोणती पथ्ये पाळली पाहिजे, लैगिक छेडछाडीमूळे मूलींवर होणारे परिणाम, इत्यादी घटकाचा उहापोह केला आहे. त्याचबरोबर समाजातील प्रत्यक्ष परिस्थिती व्यक्त केली आहे. छेडछाडासंबंधित शासनाने प्रतिबंधात्मक ठोस उचलणे गरजेचे आहे.

प्रा. साधना झाडबुके (२०१६)[२], यांनी 'एकटीचे दु:ख, त्यावर उपाय काय? या लेखात समाजातील स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण केले आहे. प्रामुख्याने एकटी स्त्रियाच्या सविस्तर वर्णन केले आहे. एकल महिलांच्या समस्या, एकल महिलांना सन्मानाने जगण्यासाठी कोणते उपाययोजना अमलात आणणे गरजेचे आहे हे सविस्तरपणे आहे.

एकल स्त्रियांच्या समस्या मांडण्यात आलेल्या आहेत. पण एकल महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

प्रा. वर्षा गंगणे (२०१३)[३],यांनी 'ग्रामीण विकासात स्त्री सक्षमीकरणाची भूमीका' या संशोधन लेखामध्ये ग्रामीण क्षेत्राचा विकास आणि स्त्रियांना विकासाच्या प्रवाहात आणणे या दोन घटकावर विशेष भर दिला आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींचा खेडयाकडे चला हा विचार प्रभाविपणे मांडला आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी स्त्रियांचे सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. ग्रामीण भागातील समस्या स्त्रियांच्या माध्यमातून सोडवणे शक्य होईल.

वासंती रामन (२००७)[४] यांनी 'समकालीन राजकारणातील स्त्रियांचा प्रश्न' या संशोधनपर लेखामध्ये भारतीय राजकारणातील स्त्रियांचा प्रश्न आणि परिणामी निर्माण झालेल्या समस्या यांना केंद्रबिंदू मानून विचार व्यक्त करण्यात आले आहे. स्त्री चळवळीची आवश्यकता, स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्या (बलात्कार, हुंडाबळी, गर्भजल परिक्षा) यासारख्या घटकाचा विचार करण्यात आला. स्त्रियांना राजकारणात म्हणावा त्या प्रमाणात सहभाग घेतला दिला जात नाही. वेगवेगळया कालखंडातील राजकारणातील स्त्रियांच्या सहभागाचा अभ्यास करण्यात आला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे (२००१)[५] यांनी 'समाज आणि महिला' या संदर्भग्रंथामध्ये आरोग्य, अत्याचार, राजकारण आणि जागतिक महिला आंदोलन या घटकावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. गावपातळीवरील राजकारणातील महिला सरपंचाची कोंडी, स्त्री आरोग्य, स्त्रियाचे दारिद्रय, स्त्रीयांच्या वरील अत्याचार, जागतिक स्तरावरील महिला आंदोलन या विषयावर प्रामुख्याने विचारमंथन केले आहे.

सरोजिनी शारंगपाणी (१९९०)[६] यांनी स्त्रियांचे हक्क आणि त्यांच्या मर्यादा या संदर्भग्रंथामध्ये स्त्रियांचे वेगवेगळे हक्क आणि त्यांच्या वरती येणाऱ्या मर्यादा यांचा अभ्यास केला आहे. वेगवेगळया क्षेत्रातील स्त्रियांच्या समस्या प्रामुख्याने मांडल्या आहेत. समस्या सोडवणूक करताना येणाऱ्या मर्यादेचे वर्णन करण्यात आले आहे.

डॉ. लीला पाटील (१९९०)[७], यांनी 'भारतीय स्त्री जीवन' या संदर्भग्रंथामध्ये महिलाच्या सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक कौटुंबिक परिवर्तनाचा अभ्यास केला आहे. कृषीपूर्व संस्कृती, कृषी संस्कृती पूर्वकाळ, कृषी संस्कृती उत्तरकाल या महत्त्वाच्या संस्कृतीच्या तीन टप्प्यांचा अभ्यास केला आहे. या तीन वेगवेगळया टप्प्यातील स्त्रीजीवनाचे चित्रण सदर संदर्भ ग्रंथामध्ये लेखिकिने मार्मिकपणे केले आहे. सतीबंदी, बालविवाह प्रतिबंध, घटस्फोट, आंतरजातीय विवाह, स्त्रीला वारसा हक्क, हुंडाबंदी इत्यादी कायद्याची माहिती दिसून येते. वेगवेगळया विचारवंतानी व्यक्त केलेले विचार मांडण्यात आले आहे. ग्रामीण स्त्री—मुक्ती, आजचे स्त्री जीवन, मिळवती स्त्री स्त्री शिक्षण, तरुणीविषयी विचार प्रामुख्याने मांडण्यात आले आहेत.

मंगल खिवसरा (२००५)[८] यांनी स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग या आपल्या पुस्तकात स्त्री मुक्ती चळवळीतील जनसंपर्क माध्यमे हा एक महत्त्वपूर्ण घटक अभ्यासाचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्त्री मुक्ती चळवळीचा इतिहास, स्त्री मुक्ती चळवळीचे नवे प्रवाह, ग्रामीण आणि दलित स्त्री, सामाजिक संस्थामधील स्त्री, मराठी साहित्यामधील स्त्री, प्रसारमाध्यमे आणि स्त्री, मराठी नियतकालिकामधील स्त्री, त्यासंदर्भात वृत्तपत्राची जबाबदारी इत्यादी घटकाचा अभ्यास करण्यात आला आहे.

गीता साने (१९८६)[९] यांनी 'भारतीय स्त्री जीवन' या पुस्तकामध्ये स्त्रीजीवनाची सुख दु:खे स्पष्ट केली आहे. स्त्री स्वातंत्र्याची गरज स्त्री आणि भारतीय न्यायव्यवस्था, स्त्री आणि भारतीय अर्थव्यवस्था, स्त्री आणि कुटूंबसंख्या या घटकाचा अभ्यास केला आहे.

विलास खोले (१९९७)[१०] यांनी 'स्त्री पुरुष तुलना' या संदर्भग्रंथामध्ये स्त्री पुरुष सत्ता संबधातील असमतोलाचे विवरण केले आहे. महाराष्ट्रातील स्त्रियांच्या परिस्थितीवर चांगला प्रकाश टाकण्यात आला आहे. समस्त स्त्रीजातीचे दु:ख दूर व्हावे आणि स्त्रियांना समाजात सन्मानाचे प्रतिष्ठेचे व पुरुषाच्या बरोबरीचे स्थान प्राप्त व्हावे यादृष्टीने लेखकाने वर्णन केले आहे.

शरयू अनंतराम आणि उमा वंडसे (१९८७)[११] यांनी 'भारतीय समाजातील, स्त्रियांचे स्थान' या आपल्या संदर्भग्रंथामध्ये स्त्रियांच्या जीवनाचे विविध पैलू व स्त्रियांच्या समस्या यासंबंधित माहिती गोळा करुन तिचे विश्लेषण करण्यात आले आहे. उपलब्ध माहितीच्या माध्यमातून स्त्रियांसमोर असलेल्या अनेक प्रश्नांची जाणीव निर्माण होते. अशा समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रा.डॉ. प्रभावती कस्तुरे—वाडकर (२०१०)[१२] यांनी 'महाराष्ट्र शासनाचे महिलाविषयक धोरण' एक चिकित्सक अभ्यास या संदर्भग्रंथामध्ये भारतीय महिलांची स्थितीचा ऐतिहासिक आढावा या घटकावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे महिला सक्षमीकरणात शासनाच्या महिला धोरणाचे योगदान महाराष्ट्र शासनाच्या महिलाविषयक धोरणाचे विश्लेषण, धोरणाची चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये करण्यात आला आहे.

डॉ. लीला पाटील (२००८)[१३], यांनी महिलांसमोरील नवी आव्हाने यांनी आपल्या संशोधन लेखामध्ये स्त्रियांच्या समस्या विशद केल्या आहेत. महिलांचे घटते प्रमाण, स्त्री भ्रूण हत्या, शिक्षणातील भेदभाव, स्त्री देहाची असुरक्षितता, वाढत्या अपेक्षांचा भार, भूमिकामधील अंतर, करियरचा वाढता ताण, दडपणातून अपराधीपण, इत्यादी समस्या सविस्तरपणे मांडल्या आहेत.

ना. रा. गाढे (१९९२)[१४] यांनी ग्रामीण महिलांच्या समस्या – एक दृष्टीक्षेप या लेखामध्ये विकासामधील महिलांच्या स्थानाबरोबर समस्यांचे विवेचन सविस्तरपणे करण्यात आले आहे. ग्रामीण महिलांचे शिक्षणाचे प्रमाण आणि त्यासंबंधी वेगवेगळया समस्या ग्रामीण भागाच्या महिलांच्या आरोग्यविषयक समस्या, वेगवेगळया अंधश्रध्दा, रोजगारविषयक, कौटुंबिक वातावरण, संबंधीत अनेक कायदे इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. समस्या सोडवण्यासाठी विविध उपययोजना सुचवल्या आहेत.

प्रा. आर. जी. रसाळ (१९९८)[१५], यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान या संशोधन निबंधामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्त्रियांची भूमिका वेगवेगळया बाजूंनी मांडली आहे. स्त्रीयांची बदलती मनसिकता, स्त्रीपुरुष प्रमाण व साक्षरता, स्त्रिया आणि रोजगार इत्यादी घटकाचा अभ्यास केला आहेत्र त्याच प्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील स्त्रियांची होणारी घट, त्यांच्या समस्या घटकाचा सविस्तर अभ्यास प्रामुख्याने केला आहे.

प्रा. सुधा काळदाते (१९८९)[१६], यांनी 'मराठवाडयातील स्त्रियांचे प्रश्न'या लेखामध्ये मराठवाडयातील स्त्रियांच्या संदर्भातील वेगवेगळया प्रश्नांचा अभ्यास करण्यात आला आहे, पारंपारिक विचारसरणी स्त्रियांचे वाढते निरक्षरता प्रमाण,

आर्युमानामध्ये होणारे घट, आर्थिक सामाजिक आणि वैयक्तिक समस्यांचा प्रामुख्याने अभ्यास केला आहे. या समस्या सोडवण्यासाठी वेगवेगळी उपाययोजना सुचविली आहेत.

डॉ. कस्तुरे (१९९२)[१७], यांनी 'श्रमिक स्त्रियांच्या समस्या' या लेखामध्ये श्रमिक स्त्रियांच्या समस्या सविस्तरपणे मांडल्या आहेत. १९०९ ते १९८९ या कालावधीतील श्रम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण विशद केले आहे. विशेष म्हणजे हे प्रमाण कमी होणाऱ्या कारणाचा प्रामुख्याने अभ्यास केला आहे. राज्यनिहाय श्रम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण, शेतीमधील स्त्रियांचे प्रमाण स्त्रियांच्या बेकारीचे प्रमाण, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी घटकावर प्रकाश राकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याशिवाय समस्यांच्या अभ्यासाबरोबर उपाययोजना सुचविल्या आहेत.

आ. ह. सांळुंखे (१९९३)[१८] यांनी आपल्या '' महाभारतातील स्त्रिया '' या संदर्भ ग्रंथामध्ये महाभारतातील स्त्रियांचे मार्मिक चित्रण केले आहे. पुरुषांच्या ठिकाणी पुरुषत्व आणि स्त्रियांच्या ठिकांणी स्त्रीयत्व हे दोन्ही नैसर्गिक गुणधर्म आपआपल्या परीने स्त्री आणि पुरुष यांच्या संदर्भात पस्परांना अनुकूल असतात. असे विवरण त्यांनी केले आहे. त्याच बरोबर महाभारतातील स्त्रियांचा अर्थिक आणि सामाजिक दर्जा पुस्तकामध्ये मांडला आहे. सदर संदर्भ ग्रंथामध्ये एकल स्त्रियांच्या समस्या मांडण्यात आलेल्या नाहीत.

प्रमिला कपूर (१९७३)[१९] यांनी हिंदू धर्मातील महिलांच्या करिअरचा अभ्यास केला आहे. त्यांनी हिंदू धर्मातील महिलांच्या समस्यांचे मार्मिक कथन केले आहे. त्याच

प्रमाणे त्यांच्या करिअरमधील अडचणींवर प्रकाश टाकण्याचे काम केले आहे. सदर अभ्यासामध्ये एकल स्त्रियांचा कोणताही विचार केलेला नाही.

कृष्णकुमारी (१९८७)[२०] यांनी आपल्या संदर्भ ग्रंथामध्ये एकल स्त्रियांच्या समस्यांचे मार्मिक विवेचन केले आहे. त्यांच्या मते, अशा स्त्रियांना अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा प्रकारच्या समस्या उच्चवर्णिय लोकांच्यामध्ये फारश्या आढळत नाहीत. याशिवाय एकल स्त्रियांना सामोरे जाव्या लागत असलेल्या मानसिक समस्यांचाही विचार करण्यात आला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये त्यांना समाजामध्ये राहणे कठीण वाटत आहे. अशा प्रकारचे अनेक निष्कर्ष काढले आहेत. परंतु एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

ॲड. मनिषा तुळपुळे (२०१५) [२१] यांनी समान हक्क समान न्याय या वर्तमानपत्रातील लेखामध्ये एकल स्त्रियांच्या समस्यांचे वर्णन अतिशय मार्मिकपणे केले आहे. महाराष्ट्र टाइम्सने राबवलेल्या नको भेदभाव या कार्यक्रमात त्यांनी एकल महिलांना पडणारे वेगवेगळे प्रश्न, त्यांच्या समस्या, गर्भलिंग चिकित्सा, मंदिर प्रवेश, घटस्फोटानंतर मालमत्तेवरील स्त्रियांचा हक्क आणि त्याविषयीचे कायदे यासारख्या विषयावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. परंतु एकल स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्येसंदर्भामध्ये विवेचन केलेले नाही.

भारती मोरे (२०१५)[२२] यांनी एकल महिला निराधारच या लेखमध्ये एकल महिलांच्या योजनांचा आढावा घेतला आहे. त्यांनी संजयगांधी, श्रावणबाळ, इंदिरा

गांधी योजनांचा आढावा घेतला आहे. प्रत्येक्षात मात्र योजना चांगल्या असल्या तरी त्या कागदावरतीच राहिल्या असा निष्कर्ष त्यांनी काढला. एकल स्त्रियांना योजनेसंदर्भातील माहिती दिली जात नाही. एवढेच नव्हेतर कागदपत्रांची जुळवणुक करण्यासाठी त्यांना जास्त त्रास सहन करावा लागतो. शिवाय अशा योजनांची अम्मलबजावणी वेळेवरती होत नसल्याचे त्यांनी आपल्या लेखात सांगितले. त्यांनी एकल स्त्रियांच्या बाबतीतील फक्त योजनांचा आढावा घेतला आहे.

मानसी तारे आणि रेखा कशेळकर (२०११)[२३] यांनी संघर्ष सन्माने जगण्यासाठी या संदर्भ ग्रंथामध्ये एकल महिलांच्या संघर्ष कथा, अनेक वेदना दु:ख व अपमान यांचा सामना करुन पुन्हा उभारी धरणा—या कणखर महिलांच्या सत्य कथा सांगितल्या आहेत. वाढता भ्रष्टाचार महागाईच्या रगाडयात वंचित गटातील एकल महिलांचे जीवन अधिकच कठीण झाले आहे. रोजगार, न्याय प्रक्रियेत विलंब, शारिरीक, लैगिक शोषण, एकेरी पालकत्वाचे आव्हाने, घर आरोग्य इत्यादी अनेक प्रश्नावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये समाजातील फक्त १२ महिलांचे प्रश्न मांडले आहेत.

राष्ट्रीय महिला अहवाल (२०११)[२४] यात महिला कुटूंब प्रमुखांचा सर्वेक्षण करण्यात आले. त्यात परितक्त्या, विधवा आणि अविवाहित एकल महिलांचा अभ्यास करण्यात आला. समाजातील सर्वात वंचित दूर्लक्षित घटकांचा अभ्यास करण्यात आला.

ग्रामीण गरीबी अहवाल (२००१)[२५] अहवालात १९७० ते १९९६ च्या काळात कुटूंबप्रमुख महिलांच्या संख्येत ३० ते ३५ टक्के वाढ झाली आहे. असा निष्कर्ष काढण्यात आला. ग्रामीण भागातील दारिद्रयाच्या प्रश्नावर मार्मिक विवेचन करण्यात आले.

राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षण (२०१४)[२६] या सर्वेक्षणात एकल स्त्रियांच्या आरोग्य विषयक प्रश्नावर प्रकाश टाकण्यात आला आहे. एकल परितक्त्या महिलांचे आरोग्य घसरत आहे. असा निष्कर्ष काढण्यात आला.

महाराष्ट्र महिला संघटना (१९९०)[२७] यांनी केलेल्या सर्वेक्षणात पाच ते सहा लाख परितक्त्या महिलांची संख्या वाढलेली नमूद करण्यात आलेली आहे. त्यानंतरच्या काळात विधवा परितक्त्या महिलांच्या संख्येत वाढ झालेली सांगण्यात आली आहे.

२.५ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण –

आजपर्यंत स्त्रियांच्याबाबतीत अनेक संशोधन विविध माध्यमातून झाले आहेत. पण एकल स्त्रियांच्या समस्यांवर अगदी नगन्य अशा स्वरुपात संशोधने झाली आहेत. आजच्या घडीला एकल स्त्रियांच्या समस्या जटील बनत चालल्या आहेत. याविषयावर अद्यापही फारसे संशोधन झालेले दिसून येत नाहीत. त्याच प्रमाणे एकल स्त्रियांचे समाजातील स्थान, त्यांच्या सामाजिक समस्या, आर्थिक समस्या या समाजापुढे आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे धोरणात्मक उपाययोजना त्यांच्या समस्येवरती होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या

आर्थिक आणि सामाजिक समस्यांबाबत सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

२.६ उपसंहार —

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकांनी संशोधन समस्येचे सबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे. तसेच यापूर्वी या विषयावर संशोधन झालेले नसल्यामुळे या समस्येशी निगडीत संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, शोध निबंध, विविध समित्यांचे अहवाल इत्यादींचा आढावा घेतला आहे.

संदर्भ

१. प्रा. साधना झाडबुके (२०१६), महिला छेडछाड : समस्या आणि उपाय, प्रबोधन प्रकाशन ज्योती, (मासिक), समाजवादी प्रबोधिनी, वर्ष २७, अंक — ३४४. इचलकरंजी. पान, नं. २९—३४.

२. प्रा. साधना झाडबुके (२०१६), एकटीचे दु:ख, त्यावर उपाय काय? प्रबोधन प्रकाशन ज्योती (मासिक) समाजवादी प्रबोधिनी, वर्ष २७, अंक ३४९,इचलकरंजी, पान नं. ५४—५७.

३. प्रा. वर्षा गंगणे (२०१३), ग्रामीण विकासात स्त्री सक्षमीकरणाची भूमिका, आम्ही उपोजिका, वर्ष ७ वे, अंक २१३, सांगली. पान न. २३—२५.

४. वासंती रामन (२००७), समकालीन राजकारणातील स्त्रियांचा प्रश्न मंजूषा

गोसावी (संपादक), समकालीन भारतातील नागरी स्त्रिया डायमंड पब्लिकेशन्स पूणे, पान नं. ३९५—३९९.

५. डॉ. नीलम गोऱ्हे (२००१), समाज आणि महिला, पद्मगंगा प्रकाशन, पूणे.

६. सरोजिनी शारंगपाणी (१९९०),'स्त्रियांचे हक्क आणि त्यांच्या मर्यादा' विमल प्रकाशन, पूणे.

७. डॉ. लीला पाटील (१९९०), 'भारतीय स्त्री जीवन' मेहता पब्लिशिंग हाऊस, पूणे.

८. मंगल खिंवसरा (२००५), स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

९. गीता साने (१९८६), भारतीय स्त्री जीवन, मौजे प्रकाशन मुंबई.

१०. विलास खोले (१९९७), स्त्रीपुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पूणे.

११.शरयू अनंतराम आणि उमा वंडसे (१९८७), भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

१२.प्रा. डॉ. प्रभावती कस्तुरे —वाडकर (२०१०), महाराष्ट्र शासनाचे महिलाविषयक धोरण : एक चिकित्सक अभ्यास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

१३. डॉ. लीला पाटील (२००८), महिलांसमोरील नवी आव्हाने, योजना मासिक,

वर्ष ३६, अंक ३ , ऑक्टोंबर २००८, नवी मुंबई.

१४. ना. रा. गाढे (१९९२), ग्रामीण महिलांच्या समस्या, एक दृष्टीक्षेप योजना मासिक, अंक २५, नवी मुंबई.

१५. प्रा. आर. जी. रसाळ (१९९८), भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान, योजना मासिक, अंक १२, नवी मुंबई.

१६. प्रा. सुधा काळदाते (१९८९), मराठवाडयातील स्त्रियांचे प्रश्न, योजना मसिक, नवी मुंबई.

१७. डॉ. कस्तुरे (१९९२) श्रमिक स्त्रियांच्या समस्या, योजना मासिक, एप्रिल १९९२, नवी मुंबई.

१८. साळुंखे आ. ह., (डिसेंबर १९१८)‘ महाभारतातील स्त्रिया ’, प्रकाशक – राकेश आ.साळुंखे, ‘लोकायत’ १३, यशवंतनगर गेंडामाळ, सातारा.

१९. Paranjpe, U. M. (1963) ‘‘Are Spinsters a Social Problem’’ in Hindustan Times,October, 13.

२०. Krishnakumari, N. S. (1987) Status of Single Women in India: A Study of Spinsters, Widows and Divorcees, New Delhi : Uppal Publishing House.

२१. ॲड. मनिषा तुळपुळे, (२०१५), समान हक्क समान न्याय, महाराष्ट्र टाइम्स, मुंबई १३ ऑगस्ट.

२२. भारती मोरे (२०१५), एकल स्त्रिया, महाराष्ट्र टाइम्स, मुंबई २८ जुलै.

२३. मानसी तारे आणि रेखा कशेळकर (२०११),संघर्ष सन्मानाने जगण्यासाठी, प्रेस्टिज दादर मुंबई.

२४. राष्ट्रीय महिला अहवाल (२०००)

२५. ग्रामीण गरीबी अहवाल (२००१)

२६. राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षण (२००३)

२७. महाराष्ट्र महिला संघटना (१९९०)

प्रकरण तिसरे

तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती

३.१ प्रस्तावना

३.२ भारतातील एकल स्त्रियांची स्थिती

३.३ राज्यनिहाय एकल स्त्रियांचे प्रमाण

३.४ सांगली जिल्हयाची माहिती

३.५ तासगाव तालुक्याची माहिती

३.६ तासगाव तालुक्यातील एकल स्त्रिया

३.७ उपसंहार

प्रकरण तिसरे

तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती

३.१ प्रस्तावना

१८ व्या शतकात महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू केली. केशवपनासारख्या क्रूर रूढीपासून विधवांची मुक्तता करण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदीसाठी लढा दिला. अशा काही स्त्रीसुधारकांचे अथक प्रयत्न आणि महाराष्ट्रातील विविध महिला आंदोलनांच्या संघर्षात्मक कार्यामुळे स्त्रिया काही प्रमाणात बंधनमुक्त झाल्या आणि संघटनात्मक कामाची सुरूवात झाली. १९७५—८५ च्या दशकात महाराष्ट्रात परित्यक्ता,विधवा, घटस्फोटित महिलांची संघटना बनण्यास सुरूवात झाली. महिला आंदोलनाने एकटया महिलांचा प्रश्न समाजाच्या आणि सरकारच्या समोर आणला. थोडक्यात एकल स्त्रियांच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

३.२ भारतातील एकल स्त्रियांची स्थिती

तक्ता क्रमांक ३.१

भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्यानुसार वर्गीकरण

अ.न.	वर्ष	लोकसंख्या
१	२००१	५.१२ कोटी
२	२०११	७.१४ कोटी

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात एकल स्त्रियांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते. २००१ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार देशातील एकल स्त्रियांचे प्रमाण ५.१२ कोटी इतके होते तर २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार ती वाढून ७ कोटी १४ लाख इतकी झाली आहे. या दहा वर्षाच्या काळात २.०२ कोटी इतकी वाढ झालेली दिसत आहे.

तक्ता क्रमांक ३.२

भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण

अ.न.	वर्ष	लोकसंख्येतील प्रमाण
१	२००१	६० टक्के
२	२०११	६८ टक्के

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट

२००१ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार एकल स्त्रियांचे प्रमाण ६० टक्के इतके होते तर २०११ च्या आकडेवारीनुसार हे प्रमाण ६८ टक्के इतके वाढले.

तक्ता क्रंमाक ३.३

भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्येनुसार तपशील(२०११)

अ.न.	तपशील	लोकसंख्या	टक्केवारी
१	विधवा	२.८२ कोटी	३९.५०टक्के
२	अविवाहित	१.३२ कोटी	१८.४९ टक्के
३	इतर	३.००कोटी	४२.०१ टक्के
	एकूण	**७.१४ कोटी**	**१०० टक्के**

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट

यात ह्म कोटी ९२ लाख विधवा आहेत तर १ कोटी ३२ लाख अविवाहित स्त्रिया आहेत.

तक्ता क्रंमाक ३.४

भारतातील एकल स्त्रियांचे लोकसंख्यानुसार तपशील(२०११)

अ.न.	तपशील	लोकसंख्या	टक्केवारी
१	ग्रामीण	४.४४ कोटी	६२ टक्के
२	शहरी	२.७० कोटी	३८ टक्के
	एकूण	**७.१४ कोटी**	**१००टक्के**

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट

या एकूण आकडेवारीतील ४ कोटी ४४ लाख म्हणजे ६२ टक्के एकल स्त्रिया ग्रामीण आहेत. तर ४८ टक्के शहरात राहणा—या आहेत. वयोगटा नुसार हे प्रमाण पाहिले तर २५—२९या वयोगटातील एकल स्त्रियांचे प्रमाण १ कोटी ६९ लाख म्हणजे २३ टक्के इतके आहे.

३.३ राज्यनिहाय एकल स्त्रियांचे प्रमाण

२०११ च्या आकडेवारी नुसार भारतातील एकल स्त्रियांचे प्रमाण अधिक असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र दुस—या क्रमांकावर आहे. (ही आकडेवारी सोबतच्या चौकटीत दिली आहे.)

तक्ता क्रंमाक ३.५

राज्यनिहाय एकल स्त्रियांचे प्रमाण (२०११)

अ.नं.	राज्य	संख्या (लाख)	शेकडेवारी
१	उत्तरप्रदेश	४०.०७	३०.९८ टक्के
२	**महाराष्ट्र**	**३१.३६**	**२४.२४ टक्के**
३	आंध्रप्रदेश	३१.२७	२४.१७ टक्के
४	तामिळनाडू	२६.६५	२०.६१ टक्के
	एकूण	१२९.३५	१०० टक्के

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट

वरील तक्तामध्ये राज्यनिहाय एकल स्त्रियांचे प्रमाण दर्शवले आहे. सर्वात जास्त उत्तरप्रदेश या राज्यामध्ये ४०.०७ लाख (३०.९८ टक्के) इतके आहे. महाराष्ट्रामध्ये ३१.३६ लाख (२४.२४ टक्के) इतके आहे.

३.४ सांगली जिल्हयाची माहिती

सांगली जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिण व आग्नेय दिशेला आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे ८,५७२ चौ. कि. मी. असून जिल्ह्याच्या उत्तरेला व वायव्येला सातारा, उत्तर व ईशान्येला सोलापूर, पूर्वेला विजापूर (कर्नाटक), दक्षिणेला बेळगाव (कर्नाटक),

नैर्ऋत्येला कोल्हापूर व पश्चिमेला रत्नागिरी हे जिल्हे आहेत. पश्चिमेकडील शिराळा तालुका सह्याद्रीच्या मुख्य रांगेत येतो. जिल्ह्याचा पश्चिम भाग डोंगराळ आहे. कृष्णा खोंयाचा परिसर मात्र सपाट मैदानी स्वरूपाचा आहे.

सांगली जिल्ह्यातील तालुके : शिराळा, वाळवा, तासगांव, खानापूर (विटा), आटपाडी, कवठे महांकाळ, मिरज, पलूस, जत व कडेगांव

जिल्ह्यात जागोजागी भिन्नभिन्न भौगोलिक, आर्थिक व सामाजिक स्थिती आहे. जत, आटपाडी, कवठे महांकाळ हे कायम दुष्काळी तालुके आहेत. पलूस, वाळवा, मिरज तालुक्यांतील अनेक गावांना कायम पुराचा धोका असतो. शिराळा, कडेगाव, खानापूर हे डोंगरी तालुके आहेत. एका टोकाच्या शिराळा तालुक्यात जंगल आहे. तर दुसरीकडे जत तालुक्यात मैलोनमैल ओसाड जमीन आहे. महाराष्ट्र—कर्नाटक सीमेवर असलेल्या सांगलीचा निम्मा लोकव्यवहार कानडी भाषेत चालतो. जिल्ह्याची पूर्व—पश्चिम लांबी २०५ किमी व उतर—दक्षिण लांबी ६६ किमी आहे.

सांगली जिल्हा कृष्णा, वारणा नदी व उत्तरेस महादेवाच्या डोंगराखालील पठार व माणगंगा नदीच्या पात्रात वसला आहे. कृष्णा नदीची जिल्ह्यातली लांबी १०५ कि.मी आहे. जिल्ह्याचे तापमान किमान १४ अंश सेंटिग्रेड व कमाल ४२ अंश सेंटिग्रेड यांदरम्यान असते. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ४००—४५० मिलिमीटर आहे. जिल्ह्याची २००१ सालची लोकसंख्या २८२०५७५ इतकी आहे.

३.५ तासगाव तालुक्याची माहिती

तासगाव महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील एक शहर आणि नगरपालिका परिषद आहे. १७७४ मध्ये नारायण बल्लाल पेशवे यांनी परशुराम भाऊ पटवर्धन यांना तासगाव बक्षीस म्हणून दिले होती. श्रीमंत गणपतराव पटवर्धन यांच्या शासनकाळात तासगाव संस्थानाची स्थापना करण्यात आली होता. तासगाव शहरातील द्राक्षे महाराष्ट्रातील अतिशय प्रसिद्ध द्राक्षे आहेत. सांगली शहरासह उपग्रह उपनगर म्हणून तासगाव वेगाने विलीन होत आहे आणि लवकरच सांगली शहरी महामंडळाचा भाग बनेल.

तासगाव हे द्राक्षेसाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध ठिकाणांपैकी एक आहे. येथे शेतकरी अनेक प्रकारचे द्राक्षे विकसित करतात. तासगाव १७.०३°N ७४.६°E येथे स्थित आहे. त्याची सरासरी उंची ५६० मीटर आहे (१८३७ फुट). तासगांवमध्ये मान्सूनमधून ४५० मिमी सरासरी पाऊस पडतो.

लोकसंख्याशास्त्र २००१ च्या भारतीय जनगणनेनुसार, तासगाव तालुक्याची लोकसंख्या सुमारे ३००००० इतकी आहे. तासगाव नगरपालिकेची लोकसंख्या ३३,४३५ आहे. पुरुषांची संख्या ५२टक्के आणि महिलांची ४८ टक्के आहे. तासगावचा सरासरी साक्षरता दर ७४ टक्के आहे, जो राष्ट्रीय सरासरी ५ ९ .५ टक्के पेक्षा अधिक आहे . पुरुष साक्षरता प्रमाण ८०टक्के आणि महिला साक्षरता प्रमाण ६८ टक्के आहे. तासगाव तालुक्या मध्ये १३ टक्के लोक ६ वर्षाखालील आहेत.

शहर त्याच्या जागतिक दर्जाचे द्राक्षे साठी प्रसिद्ध आहे. द्राक्षे मुख्यत: यूके, यूएई, सिंगापूर, हाँगकाँग, श्रीलंका, बांग्लादेश इत्यादी आशियाई देशांमध्ये निर्यात

केली जातात. उत्तम दर्जाचे द्राक्षे तासगावपासून आहेत, जसे कधीकधी द्राक्षांचा आकार ३.५ इंच इतका असतो. द्राक्षे उत्पादन दर नाशिक म्हणून दुप्पट आहे. तासगांवमधील गणपती मंदिर २२५ वर्षांपेक्षा जुने आहे, कारण गणेशचा सौंड उजव्या दिशेने वाकलेली आहे आणि हे जागृत देवस्थान आहे. गणेश मूर्ति सोन्यामध्ये १२५ किलो वजन आहे. गणेश मंदिरच्या गोपुर (मंदिरासाठी प्रवेश म्हणून ५ स्टोरी प्राचीन बांधकाम) महाराष्ट्रात सर्वात उंच (९ ६ फूट) आहे कारण हे गोपुर सामान्यत: दक्षिण भारतामध्ये दिसते. गणेश उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गणेश चतुर्थीच्या एक दिवसानंतर गणेश रथोत्सव प्रसिध्द आहे. विठ्ठल सखाराम पान, विधान परिषदेचे माजी अध्यक्ष आणि रोजगार हमी योजनेचे संस्थापक विसापूर नावाच्या गावातील आहेत.

कवठे—एकंद दशहरा (दशरा) (भारतातील सांगली रोडवरील तासगावपासून ७ कि. मी.) वर भारतातील सर्वात मोठा आतिशबाजी महोत्सव , सावळज: सावळसिद्ध मंदिर ,सिद्धवेदी (सावळज:), मनेराजूरी, गावन व वडगावरू पाणी टँकरच्या मदतीने द्राक्षे उत्पादन (तासगांव शहरापासून १० किमी), चिंचणी (तासगावपासून ५ किमी) जागरुत येल्लमा देवी मंदिर येथे दर वर्षी जानेवारी महिन्यात जत्रा होते. माजी आमदार दिनकर (आबा) पाटील आणि खासदार संजय पाटील यांचे गाव चिंचणी उत्कृष्ट द्राक्षासाठी प्रसिद्ध आहे. सुमारे ३०टक्के शेतकरी या गावात द्राक्षे वाढतात. येथे पटवर्धन राजवंशाचा राजवाडा प्रसिद्ध आहे. इस्कॉन मंदिर आरवडे, तासगांव, श्री गणपती मंदिर, तासगांव , राज्य मुख्यालय मुंबई रस्त्याने ४०० किमी आहे.

जिल्हा मुख्यालय सांगली २२ किमी रस्त्याने आहे. जवळचे रेल्वे जंक्शन मिरज २५ किमी आहे. किर्लोस्करवाडी भिलावाडी सांगली कराड जवळील रेल्वे स्थानक आहेत. कराड / इस्लामपूर मार्गे पुणे २५० किमी आहे. सांगली—कोल्हापूर महामार्ग मार्गे कोल्हापूर ७० किमी आहे. कोल्हापूर मार्गे तटीय शहर मालवण २३० किलोमीटर आहे.

तक्ता क्रंमाक ३.६

तासगाव तालुक्यातील लोकसंख्यानुसार वर्गीकरण

अ.नं.	वर्ष	स्त्रियांचे प्रमाण
१	२००१	११५११७
२	२०११	१२३४९२
	वाढीचा दर	३.५१ टक्के

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट (२०११)

वरील तक्तामध्ये तासगाव तालुक्यातील लोकसंख्यानुसार वर्गीकरण दर्शवले आहे. २००१ च्या जणगणनेनुसार स्त्रियांचे प्रमाण ११५११७ इतके होते. २०११ च्या जणगणनेनुसार स्त्रियांचे प्रमाण १२३४९२इतके होते. लोकसंख्या वाढीचा दर ३.५१ टक्के इतका आहे.

तक्ता क्रंमाक ३.७

तासगाव तालुक्यातील ग्रामीण व शहरी स्त्रियांचे वर्गीकरण

अ.नं.	वर्ष	ग्रामीण	शहरी	एकुण
१	२००१	९९०४७	१६०७०	११५११७
२	२०११	१०४९९२	१८५००	१२३४९२
	वाढीचा दर	२.९१	७.०३	३.५१

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट (२०११)

वरील तक्तामध्ये तासगाव तालुक्यातील ग्रामीण व शहरी स्त्रियांचे वर्गीकरण दर्शवले आहे. २००१मध्ये ग्रामीण लोकसंख्या ९९०४७ इतकी होती ती २०११ मध्ये १०४९९२ इतकी वाढली या काळातील स्त्री लोकसंख्या वाढीचा दर २.९१ टक्के इतका होता.

शहरी भागात २००१ मध्ये स्त्री लोकसंख्या १६०७० इतकी होती ती २०११ मध्ये १८५०० इतकी झाली. या काळातील स्त्री लोकसंख्या वाढीचा दर ७.०३ टक्के इतकी होती. ग्रामीण भागातील स्त्री लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा शहरी भागातील वाढीचा दर जास्त आहे.

तक्ता क्रंमाक ३.८

तासगाव तालुक्यातील स्त्रियांचे प्रमाण

अ.नं.	वर्ष	ग्रामीण	शहरी
१	२००१	९७२	९२४
२	२०११	९६९	९५०
	वाढीचा दर	— ०.१६	१.३९

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट (२०११)

वरील तक्त्यामध्ये तासगाव तालुक्यातील स्त्री—पुरुष प्रमाण दर्शविले आहे. २००१ मध्ये ग्रामीण भागामध्ये स्त्रियांचे प्रमाण ९७२ इतके होते. ते २०११ मध्ये ९६९ इतके कमी झाले. शहरी भागामध्ये २००१ मध्ये स्त्री प्रमाण ९२४ इतके होते ते २०११ मध्ये ९५० इतके वाढले.

तक्ता क्रंमाक ३.९

तासगाव तालुक्यातील स्त्रियांचे साक्षरता प्रमाण

अ.नं.	वर्ष	साक्षरता प्रमाण
१	२००१	६७.३६
२	२०११	७६.२६
	वाढीचा दर	६.२०

स्त्रोत: भारतीय जणगणना वेबसाईट (२०११)

वरील तक्त्यामध्ये तासगाव तालुक्यातील साक्षरता प्रमाण दर्शविले आहे. २००१ मध्ये स्त्री साक्षरता प्रमाण ६७.३६ टक्के इतके होते. २०११ मध्ये ७६.२६ टक्के इतके वाढले. साक्षरता वाढीचा दर ६.२० टक्के इतका आहे.

३.६ तासगाव तालुक्यातील एकल स्त्रिया –

तासगाव तालुक्यातील एकूण स्त्री लोकसंख्येपैकी एकल स्त्रियांचे प्रमाण कमी असले तरी त्यांच्या समस्या गंभीर आहेत. तासगाव तालुक्यामधील एक नगरपालिका आणि ६८ गावामध्ये १७६ एकल स्त्रिया आपले जीवन जगत आहेत. त्यांच्या समस्या दिवसेंदिवस अधिक जटील बनत चालल्या आहेत. त्यांच्या समस्येवरती उपाययोजना सांगण्यासाठी त्याचबरोबर त्यांच्या समस्या समाजापुढे मांडण्यासाठी प्रस्तुत लघु संशोधन प्रकल्पामध्ये प्रयत्न करण्यात आला आहे.

३.७ उपसंहार

एकल स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. समाजात एकल स्त्री म्हणून जगत असताना त्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. समाजात अनेक क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग दिसत आहे. शिक्षणामुळे स्त्रियांची प्रगती होत आहे. मात्र दुसरीकडे स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अजूनही संकुचित आहे.

प्रकरण : चौथे

तथ्याचे निर्वाचन

४.१ प्रस्तावना

४.२ तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांची माहिती

४.३ उद्दिष्टे चाचणी

४.४ गृहितके चाचणी

४.५ उपसंहार

प्रकरण :चौथे

तथ्याचे निर्वाचन

४.१ प्रस्तावना —

तासगाव तालुक्यातील एकल स्त्री जीवनाचा अभ्यास करताना त्यांची सर्वसाधारण माहिती, त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती, त्यांचा सामाजिक कार्यातील सहभाग, त्यांना भेडसावणा—या (शारिरीक, मानसिक, सामाजिक, आर्थिक), त्यांच्या समस्येवरती उपाययोजना इत्यादीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

४.२तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांची महिती

४.२.१ तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे गावनिहाय संख्या —

तासगाव तालुक्यामध्ये एक नगरपालिका आणि ६८ ग्रामपंचायती आहेत. यामधील एकल स्त्रियांचे प्रमाण पुढील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक ४.१

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियाचे गावनिहाय वर्गीकरण

अ. न.	गाव /शहर	एकल स्त्रियांची संख्या	अ. न.	गाव /शहर	एकल स्त्रियांची संख्या	अ. न.	गाव /शहर	एकल स्त्रियांची संख्या	अ. न.	गाव /शहर	एकल स्त्रियांची संख्या	अ. न.	गाव /शहर	एकल स्त्रियांची संख्या
१	तासगाव	१३	१६	नागाव (नि)	२	३१	खा.धामणी	२	४६	सिध्देवाडी	०	६१	सावर्डे	३
२	वासुंबे	३	१७	नेहरुनगर	०	३२	हातनोली	५	४७	डोंगरसोनी	२	६२	गव्हाण	५
३	कवठे एकंद	५	१८	ढवळी	४	३३	मांजर्डे	२	४८	अंजनी	३	६३	वज्रचौंडे	२
४	चिंचणी	३	१९	वंजारवाडी	०	३४	आरवडे	३	४९	वडगाव	१	६४	कौलगे	३
५	भैरववाडी	०	२०	विसापूर	५	३५	(पुणदी)	२	५०	नागेवाडी	०	६५	लोंढे	२
६	नागाव	२	२१	बोरगाव	३	३६	बलगवडे	२	५१	लोकरवाडी	०	६६	खुजगाव	२
७	मतकुणकी	४	२२	आळते	२	३७	गौरगाव	२	५२	जरंडी	३	६७	वाघापूर	३
८	बेंद्री	४	२३	निंबळक	३	३८	पेड	३	५३	वायफळे	३	६८	डोर्ली	२
९	शिरगाव	४	२४	चिखलगोठण	२	३९	मोराळे (पेड)	१	५४	यमगरवाडी	२		**एकूण**	**२२**
१०	कुमठे	४	२५	शिरगाव (वि)	३	४०	धोंडेवाडी	३	५५	बिरणवाडी	२			
११	येळावी	५	२६	लिंब	३	४१	विजयनगर	२	५६	बस्तवडे	०	१	**१ ते १५**	**५५**
१२	जुळेवाडी	२	२७	पानमळेवाडी	२	४२	नरसेवाडी	०	५७	मणेराजुरी	६	२	**१६ते ३०**	**३६**
१३	तुरची	३	२८	हातनूर	५	४३	कचरेवाडी	२	५८	योगेवाडी	२	३	**३१ते ४५**	**३४**
१४	राजापूर	०	२९	गोटेवाडी	२	४४	किंदरवाडी	२	५९	उपळावी	३	४	**४६ ते६०**	**२९**
१५	निमणी	३	३०	पाडळी	०	४५	सावळज	३	६०	धुळगाव	२	५	**६१ ते ६८**	**२२**
	एकूण	**५५**		**एकूण**	**३६**		**एकूण**	**३४**		**एकूण**	**२९**		**एकूण**	**१७६**

स्त्रोत : बाल व एकात्मिक विकास विभाग,तासगाव पंचायत समिती तासगाव २०१८

वरील तक्त्यामध्ये तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे गावनिहाय वर्गीकरण दर्शविले आहे. तासगाव नगरपालिकेत एकल स्त्रियांची संख्या १३ इतकी आहे. कवठे एकंद, येळावी, विसापूर, हातनूर, हातनोली, गवाण या गावामध्ये प्रत्येकी ५ एकल स्त्रिया आहेत तर सर्वात जास्त मणेराजुरी या गावामध्ये एकल स्त्रियांची संख्या ६ आहे. भैरववाडी, राजापूर, वंजारवाडी, पाडळी, नरसेवाडी, सिद्धेवाडी, नागेवाडी, बस्तवडे या गावामध्ये एकल स्त्रिया नाहीत.

४.२.२ एकल स्त्रियांचे वय :

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचा सामाजिक अभ्यास करताना त्यांच्या वाढत्या आयुष्यमाना बरोबर त्यांना एकटे जीवन जगण्याची व त्यापुढील निर्माण होणा—या सर्व मर्यादा सांभाळण्याची गरज निर्माण झाली आहे. वयोमानानुसार अभ्यास करताना गट निहाय अभ्यास करण्यात आला आहे. तो पुढील प्रमाणे :

तक्ता क्रमाक ४.२

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रायांचे वयोगटानुसार वर्गीकरण

अ.न.	वयोगट	संख्या	टककेवारी
१	२० वर्षपिक्षा कमी	..	..
२	२१ ते ४० वर्ष	३४	१९.३२
३	४१ ते ६० वर्ष	७७	४३.७५
४	६१ वर्षावरील	६५	३६.९३
	एकुण	१७६	१००

स्त्रोतः प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१



तक्ता क्र ४.१ आलेख क्र ४.१ मध्ये वयवर्षे २० व त्यापेक्षा कमी वयाची एकल स्त्रियांची संख्या ०टक्के म्हणजे एकही नाही. वय वर्षे २१ ते ४० या वयोगटातील एकूण एकल स्त्रियांपैकी (१९.३२ टक्के) स्त्रिया आहेत. वय वर्षे ४१ ते ६० गटातील ७७(४३.७५टक्के) स्त्रिया आहेत. ६१ वर्षावरील ६५ (३६.९३ टक्के) स्त्रिया आहेत.

या अभ्यासावरुन वय वर्षे ४१ ते ६० गटातील स्त्रिया एकल जीवन जगत असल्याचे प्रमाण जास्त आहे. वयाच्या वाढीबरोबर यांचे एकल जीवन जगणे व आयुष्याच्या समस्यांचा सामना करणे त्यांना गरजेचेच आहे.

४.२.३ एकल स्त्रियांचे धर्मानुसार वर्गीकरण:

भारतामध्ये अनेक धर्माचे लोक जीवन व्यतीत करत आहेत. जीवनाचा/आयुष्याच्या जगण्यामध्ये धर्मातील विचारांचा रुढी परंपरांचा परीणाम होत असतो. धर्माच्या वर्चस्वाखाली ग्रामीण भागामध्ये अनेक रुढी परंपरांना स्त्रियांना सांभाळणे भाग पाडले जाते.

त्यासाठी कोणत्या धर्मातील स्त्रिया एकल जीवन जगत आहेत यांचा अभ्यास पुढील टेबलमध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.३

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे धर्मानुसार वर्गीकरण

अ.न.	धर्म	संख्या	टक्केवारी
१	हिंदू	९८	५५.६८
२	मुस्लिम	५	२.८४
३	ख्रिश्चन	१०	५.६८
४	बौध्द	४१	२३.३०
५	जैन	२२	१२.५०
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२



तक्ता क्र. ४.२ व आलेख क्र. ४.२ मध्ये एकल स्त्रियांच्या धर्मानुसार हिंदू धर्मातील ३८ (५६.६८ टक्के) स्त्रिया आहेत. मुस्लीम धर्मातील ५(२.८४ टक्के) आहेत तर ख्रिश्चन धर्मातील १० (५.०० टक्के), बौद्ध धर्मातील ४१ (२३.३० टक्के) तर जैन

धर्मातील २२ (१३ टक्के) स्त्रिया या एकल जीवन व्यतीत करताना दिसत आहे. हिंदू धर्मातील स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे १७६ मध्ये ९८ (५६.६८टक्के) एवढे आहे. त्यानंतर मुस्लीम धर्मातील स्त्रीयांचे प्रमाण इतर धर्मातील स्त्रियांच्या तुलनेत अतिशय कमी आहे. या अभ्यासावरुन कमी अधिक प्रमाणात सर्व धर्मातील स्त्रियांचा असल्या तरी हिंदू मध्ये हे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे.

४.२.४ एकल स्त्रियांचे जातनिहाय वर्गीकरण:

जातनिहाय वर्गवारी एकल स्त्रियांचे वर्गीकरण केल्यानंतर पुढील प्रमाणे अभ्यास करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.४

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांचे जातनिहाय वर्गीकरण

अ.न.	जात	संख्या	टककेवारी
१	सर्वसाधरण	६७	३८.०७
२	ओबीसी	४७	२६.७०
३	एन.टी.	१३	७.३९
४	एस.सी.	४९	२७.८४
५	एस.टी	००	००
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.३



तक्ता क्र. ४.३ व आलेख क्र. ४.३ मध्ये स्त्रियांची जात निहाय सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील ६७ (३८.०७ टक्के) आहेत. ओबीसी ४७(२६.७० टक्के), एन.टी. १३ (७.३९टक्के), एस सी ४९ (२७. ८४ टक्के) व एस. टी. ०टक्के स्त्रिया असल्याचे दिसून येत आहे.

जात निहाय वर्गवारीमध्ये सर्वसाधारण गटातील स्त्रिया तासगाव तालुक्यामध्ये एकल जीवन व्यतीत करणा—यांचे प्रमाण इतर जातनिहाय वर्गापेक्षा अधिक म्हणजे ६७ आहेत.

४.२.५ एकल स्त्रियांच्या वैवाहिक स्थिती वर्गीकरण:

एकल स्त्रियांच्या वैवाहिक स्थितीचा अभ्यास, सामाजिक पार्श्वभूमी जाणून घेण्यात आली. त्याची गटवारी करुन वर्गीकरण पुढील तक्त्यामध्ये विवाहित, अविवाहित, परितक्त्या व विधवा अशी केली आहे.

तक्ता क्रमाक ४.५

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या वैवाहिक स्थिती वर्गीकरण

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	विवाहीत	१२५	७१.०२
२	अविवाहीत	२७	१५.३४
३	परितक्त्या	९	५.११
४	विधवा	१५	८.५२
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.४



तक्ता क्र. ४.४ व आलेख क्र. ४.४ मध्ये १२५ (७६.७०टक्के) विवाहित एकल स्त्रिया, २७ (५.३४टक्के) अविवाहित स्त्रिया, ९(५.११टक्के) परितक्त्या स्त्रिया व १५(८.५२टक्के) विधवा स्त्रिया असल्याचे दिसत आहे. विवाहीत एकल स्त्रियांचे प्रमाण मोठया स्वरुपात आहे. विवाहानंतर त्यांना एकाकी जीवन व्यतीत करावे लागत आहेत. तर २७ टक्के स्त्रियांचा विवाह झालेला नाही. त्यांना आपल्या आई—वडिल, बहिण—भाऊयांच्या कडूनही एकल जीवन व्यतीत करण्याची परिस्थिती स्पष्टपणे दिसत आहे. तर १५ स्त्रिया

या आपल्या पतीच्या मृत्यूनंतर स्वत:च्या मुलांपासून जीवन व्यतीत करावे लागत आहे. वैवाहिक स्थिती जाणताना एकही गटवारीमध्ये स्त्रिया नाहीत असे स्पष्ट चित्रण या अभ्यासादरम्यान दिसत आहे.

४.२.६ एकल स्त्रियांच्या शैक्षणिक स्थितीचे वर्गीकरण:

एकल स्त्रियांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करताना साक्षर व निरक्षर परिस्थिती जाणून घेण्यात आली. प्रत्येक जिल्हा निहाय साक्षरता ही जरी वाढत असली तरी आजही शैक्षणिक निरक्षरता तासगाव तालुक्यामध्ये असल्याचे पुढील तक्त्यामध्ये दिसून येत आहे.

तक्ता क्रमाक ४.६

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या शैक्षणिक स्थितीचे वर्गीकरण

अ.न.	शैक्षणिक स्थिती	संख्या	टक्केवारी
१	साक्षर	१०५	५९.६६
२	निरक्षर	७१	४०.३४
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.५



तक्ता क्र. ४.५ व आलेख क्र. ४.५ मध्ये शैक्षणिक स्थितीचा अभ्यासामध्ये साक्षर एकल स्त्रिया एकूण संख्यात्मक परिस्थितीमध्ये १०५(५९.६९टक्के) आहेत तर ७६(४०. ३४टक्के) या निरक्षर एकल स्त्रिया असल्याचे दिसत आहे.(५९.६६: ४०.३०) साक्षर व निरक्षरता प्रमाण हे जवळजवळ ६:४ म्हणजे ३:२ असल्याचे दिसत आहे. शैक्षणिक विकास या स्त्रियांचा झालेला नाही. शिक्षण ही वैयक्तिक विकासाची गुरुकिल्ली असते. तो या स्त्रियांचा अतिशय कमी आहे. तीन स्त्रिया शिकलेल्या आहेत. व दोन स्त्रिया या निरक्षर असल्याचे स्पष्ट चित्रण आकडेवारी व टेबल वरुन दिसून येत आहे.

४.२.७ एकल स्त्रियांच्या शैक्षणिक पात्रता:

शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या महिलांची शैक्षणिक स्थितीचे वर्गीकरण एस.एस. सी, एच.एस.सी, पद्वी, पदव्युत्तर व इतर असे पुढील तक्त्यात करण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.७

एकल स्त्रियांच्या शैक्षणिक पात्रतेचे विभाजन

अ.न.	शैक्षणिक पात्रता	संख्या	टककेवारी
१	एस.एस.सी.	६७	६३.८१
२	एच.एस.सी.	१५	१४.२९
३	पदवी	१२	११.४३
४	पदव्युत्तर	५	४.७६
५	इतर	६	५.७१
	एकुण	१०५	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.६



तक्ता क्र ४.६ व आलेख क्र ४.६ मध्ये शैक्षणिक पात्रता धारण क्षमता ६७(६३.८१टक्के), एस.एस.सी. १५(१४.२९टक्के) एच.एस.सी. १२(९१.४३टक्के), पद्वी ५(४.७६टक्के) पदव्युत्तर व ६(५.७१टक्के) इतर शिक्षण पात्रता धारण केल्याचे दिसून येत आहे. यामध्ये ६७ स्त्रिया या एस.एस.सी. शिक्षण पात्रता धारण केलेल्या मोठया/जास्त प्रमाणात आहेत. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेऊन त्यावर आपले जीवन व्यतीत करत आहेत. त्यांची शैक्षणिक पात्रता कमी असल्याचे दिसते तरी १२ स्त्रिया पद्वी व ५ स्त्रिया पदव्यूत्तर शिक्षण घेतलेल्या असले तरी एकल जीवन व्यतीत करत आहेत. शिक्षणाचा एकल जीवनावर परिणाम होतोच असे नाही.

एकूण निरक्षरता व साक्षरता तक्ता क्र. ४.५ व ४.६ मध्ये अभ्यासली आहे. पण दोन्ही स्त्रियांना आपले एकल जीवन व्यतीत करावे लागत आहे. शैक्षणिक विकासाचा व एकल जीवनाचा फारसा परिणाम जाणवत नाही.

४.२.८ शासकीय कागदपत्रे:

शासनामार्फत अनेक योजना राबवण्यात येतात. त्यामध्ये रेशनकार्ड (अन्नधान्य पुरवठयासाठी), आधारकार्ड, मतदान कार्ड व पॅनकार्ड यांचा आधार किंवा उपयोग किंवा उपलब्धता या एकल महिलांकडे आहे का? हे जाणून घेण्यात आले. त्याचे वर्गीकरण पुढील तक्त्यामध्ये करण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.८

शासकीय कागदपत्रे असणा—या एकल स्त्रियाचा तपशील

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	रेशनकार्ड	१७६	१००
२	आधारकार्ड	१७६	१००
३	मतदान कार्ड	१६७	९४.८९
४	पॅनकार्ड	७	३.६०

स्त्रोतः प्रश्नावली

तक्ता क्र. ४.७ मध्ये रेशनकार्ड धारक, आधारकार्ड वापर, व मतदान कार्ड असणा—या पूर्ण म्हणजे १७६ स्त्रिया आपल्या जीवनामध्ये करत आहेत. त्या सगळयांनी आपल्या आवश्यक त्या शासकीय कागदपत्र स्वतः काढली आहेत व वापर करुन आपल्या जीवनासाठी सहाय्यक म्हणून या कागदपत्राचा आधार घेत आहेत.

१७६ स्त्रियांपैकी फक्त ७ स्त्रियाच पॅनकार्डचा वापर करत आहेत. हे प्रमाण अत्यअल्प आहे. ३.७ टक्के एवढे आहे त्यांना मिळणारे उत्पन्न व व्यवहारासाठी त्यांचे पॅनकार्डचे महत्व त्यांच्यापर्यंत आजही पोहचलेले दिसत नाही.

४.२.९ भ्रमण ध्वनीः

आज २१ व्या शतकात आधुनिक तंत्रज्ञान युग असून सर्व जागतिक पातळीवरुन संबोधले जाते. या युगात प्रत्येकाकडे अधुनिक यंत्र म्हणजे भ्रमणध्वनी असतोच असे आपण ग्रहित धरत आहे. पण ही स्थिती एकल स्त्रियांच्या बाबतीत जाणून घेण्यासाठी यांचे वर्गीकरण पुढील तक्त्यामध्ये करण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.९

एकल स्त्रियांकडे भ्रमण ध्वनी असलेला तपशील

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	भ्रमण ध्वनी असणा—या	६१	३४.६५
२	भमण ध्वनी नसणा—या	११५	६५.३४
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.७



तक्ता क्र. ४.८ मध्ये १७६ एकल स्त्रियांपैकी फक्त ६१ (३४.६५ टक्के) स्त्रिया भ्रमणध्वनीचा वापर करत आहेत. ११५ (६५.३५ टक्के) स्त्रिया भ्रमणध्वनीचा वापर करत नाहीत.

भ्रमणध्वनीचा वापर करणा—या एकल स्त्रियांपेक्षा न वापर करणा—या स्त्रियांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. स्वत:ची विचारपूस करणारी व यांची समाजाकडून काळजी घेणारे कोणी नसल्याचे दिसते. तसेच त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे त्या आपल्या जीवनात भ्रमणध्वनीचा वापर करु शकत नाहीत.

४.२.१० एकल स्त्रियांच्या एकटेपणाचे स्वरुप:

एकल स्त्रियांनी आपले जीवन एकटेपणाने व्यतीत करण्याचे कारण कोणते आहे. हे जाणून घेण्यात आले.हेजीवन जगण्यासाठी का जबाबदार आहे? असे विचारात घेण्याच्या दृष्टीने जाणले असता पुढील चार घटक पुढे आले आहेत. त्यामध्ये निवडीनुसार, सक्तीने, दोन्हीही घटक व इतर कारणे लक्षात आली. याचे वर्गीकरण पुढील तक्त्यात करण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.१०

एकल स्त्रियांच्या एकटेपणाचे स्वरुप

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	निवडी नुसार	१७	९.६५
२	सक्तीने	३५	१९.८८
३	दोन्हीही	५७	३२.३८
४	इतर कोणत्याही	६७	३८.०६
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.८



तक्ता क्र. ४.९ मध्ये १७ (९.६५ टक्के) स्त्रिया स्वत:च्या निवडीनुसार एकटया राहत आहेत असे दिसून आले. ३५ (१९.८८ टक्के) स्त्रिया कुटूंबाकडून सक्तीने वेगळया करण्यात आल्या तर ५७(३२.३८ टक्के) स्त्रियांना सक्ती व स्वत:च्या निर्णयानुसार जीवन व्यतीत करावे लागते. तर ६७(३८.०६ टक्के) स्त्रियांनी कारण सांगण्यास नकार दिला.

एकल स्त्रियांना कुटूंब व स्वत: तसेच इतर कारणामुळे एकल जीवन व्यतीत करावे लागते. त्यांना कुटूंब व समाजाकडून आस्था, जिव्हाळा तसेच सहजीवन जगण्याच्या

आनंदापासून मुकावे लागत आहे. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. पण स्वत:तील दोष असतील किंवा काही उणिवा असतील तर प्रत्येक बाब आपल्या हातात नसते. निसर्गाकडून घडवताना राहिलेल्या कमतरता असतील किंवा कुटूंब पद्धतीतील दोष असतील त्यामुळे त्यांच्या आयुष्यामध्ये हे जीवन जगण्याची वेळ आल्याचे दिसून येत आहे.

४.२.११ एकल स्त्रियांच्या एकटेपणाविषयीची मते:

एकाकी जीवन जगताना आपणास काय जाणवते हे जाणून घेताना त्यांनी समाधान, असमाधान व तटस्थता असा नाराजीचा स्वर व्यतीत केला. त्याचे वर्गीकरण पुढील तक्त्यामध्ये करण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.११

एकल स्त्रियांच्या एकटेपणाविषयीची मते

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	समाधानी	१७	९.६५
२	असमाधानी	९७	५५.११
३	तटस्थ	६२	३५.२२
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.९



तक्ता क्र. ४.१० मध्ये एकल स्त्रियांचे जीवन व्यतीत करताना १७(९.६५ टक्के) स्त्रिया समाधानपणे जीवन जगत आहेत. ९७(५५.११ टक्के) स्त्रिया एकल जीवन जगण्यासाठी असमाधानी असल्याचे दिसून येते तर ६२(३५.२२ टक्के) स्त्रिया या प्रश्नाबाबत निरुत्तर राहिल्या आहेत. त्यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली दिसून येत नाही.

४.२.१२ कुटूंबातील व्यक्तींची मते

एकूण एकल स्त्रियांमध्ये असमाधानी असलेल्या स्त्रियांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. ज्या स्वत:चा निर्णय घेऊन एकटे जीवन जगत आहेत. एवढया स्त्रिया समाधानी असल्याचे दिसून येते. इतर स्त्रिया मात्र समाज, कुटूंब व निसर्ग यांच्यामुळे एकटे जगणे भाग पडत असल्यामुळे असमाधानी असल्याचे दिसून येत आहे.

तक्ता क्रमाक ४.१२

एकल स्त्रियांच्या विषयीची कुटूंबातील व्यक्तींची मते

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	एकटे रहा	३४	१९.३१
२	लवकर लग्न करा	९७	५५.११
३	वय प्रतिबंध धार्मिक कारणामुळे	४५	२५.५६
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१०



तक्ता क्र. ४.१२ मध्ये ३४(१९.३१ टक्के) स्त्रियांना तुम्ही एकटेच जीवन जगा असे त्यांच्या कुटूंबाकडून सक्ती केली जात आहे. व त्या तशा पद्धतीने आपले जीवन व्यतीत करत आहेत. ९७(५५.११ टक्के) स्त्रियांनी स्वत:चा विवाह करावा असे कुटूंबाकडून सांगण्यात आले आहे. काही स्त्रियांचा प्रथम विवाह केलेला नाही तो करावा व काहींचा पुर्नविवाह करावा असे कुटूंबाकडून सांगण्यात येत आहे. कारण त्यांना एकाकी

जीवन व्यतीत करावे लागणार नाही म्हणजेच वैचारिक परिवर्तन थोडया प्रमाणत झाल्याचे दिसत आहे. पण ४५ स्त्रियांना वयोमानानुसार व धार्मिक निर्बंधामुळे विवाह करणे शक्य नाही.

४.२.१३ एकाकी जीवन जगताना सभोवतालचे वातावरणे

एकाकी जीवन जगताना सभोवतालच्या वातावरणाचा आढावा घेतला असता एकल स्त्रियांच्याकडून पुढील प्रमाणे उत्तरे आली पुढील तक्त्यामध्य आहेत.

तक्ता क्रमाक ४.१३

एकाकी जीवन जगताना सभोवतालचे वातावरण

अ.न.	तपशील	सहमत	असहमत	लागू नाही	एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
१	माझ्या उत्पन्नाचा वापर माझ्यासाठीच	३३ (५५.९३)	१४ (२३.७२)	१२ (२०.३३)	५९ (१००)	१.६४	४०.५६
२	उच्च पदावर जाण्यासाठी	१२ (५०.००)	१० (४१.६६)	२ (८.३४)	२४ (१००)	१.५८	१५.८५
३	मुले नकोत	१ (३.४४)	२३ (७९.३१)	५ (१७.२४)	२९ (१००)	२.५१	१८.७३
४	मनाप्रमाणे जीवन जगण्यासाठी	१३ (५०.००)	९ (३१.६१)	४ (१५.३८)	२६ (१००)	१.६५	१७.२२
५	कौटुंबिक जबाबदारी नको	१९ (५०.००)	७ (३८.८८)	२ (११.१२)	२८ (१००)	१.४६	१८.७६
६	मुला शिवाय आरोग्य चांगले राहण्यासाठी	५ (५०.००)	४ (४०.००)	१ (१०.००)	१० (१००)	१.६०	५.९४
	एकुण	**८३ (४७.१६)**	**६७ (३८.०७)**	**२६ (१४.७७)**	**१७६ (१००)**	१.६७	१२३.२७

स्त्रोत: प्रश्नावली

तक्ता क्र. ४.१३ मध्ये, एकल स्त्रियांच्या सभोवताली असलेल्या वातावरणाचे विवरण केले आहे. मुले नकोत याची भारांकीत सरासरी (२.५१) सर्वात जास्त आहे. तर प्रमाण विचलन माझ्या उत्पन्नाचा वापर माझ्यासाठीचे सर्वात जास्त आहे.

४.२.१४ पूर्वीची कुटूंब पद्धती

भारतीय कुटूंब पद्धतीही एकत्र कुटूंब पद्धती जोपासणारी आहे. पिढयांपिढया एकत्र कुटूंब पद्धतीचे जीवन व्यतीत करणारी पद्धती आजही ग्रामीण भागात दिसते. काळानुरुप विभक्त कुटूंब पद्धती अलीकडे विकसित होताना दिसत आहे.

एकल स्त्रियांची पूर्वीची जीवनपद्धती कशा पद्धतीची होती हे पुढील तक्त्यामध्ये अभ्यासले आहे.

तक्ता क्रमाक ४.१४

एकल स्त्रियांची पूर्वीची कुटूंब पद्धती

अ.न.	कुटुंब पद्धती	संख्या	टककेवारी
१	एकत्र कुटूंबपद्धती	१४४	८१.८२
२	विभक्त कुटूंब पद्धती	३२	१८.१८
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.११



तक्ता क्र. ४.१४ मध्ये १४४ (८१.८२ टक्के) स्त्रिया या एकत्र कुटूंब पद्धतीमध्ये आपले बालपण व लग्नानंतरचे आयुष्य घालवणा—या असल्याचे दिसून आले. तर ३२(१८.१८ टक्के) स्त्रिया पूर्वी विभक्त कुटूंब पद्धतीमध्ये जीवन जगत असलेले दिसून आले.

एकाकी जीवन जगणे, एकत्र कुटूंब पद्धतीतील स्त्रियांना अनेक गोष्टींचा, जबाबदारीचा सामना करावा लागत आहे. त्याचा परिणाम मानसिक व शारिरीक स्थितीवर झाल्याचे दिसून येते. संघर्षमय जीवन पद्धती त्यांच्या वाटयाला येत आहे. कळपापासून बाजूला काढलेल्या प्राण्याची अवस्था व त्यांची अवस्था सारखीच असल्याचे दिसून येत आहे. विभक्त कुटूंब पद्धतीतील स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे.

४.२.१५ पूर्वीची कौटुंबिक पार्श्वभूमी

तासगाव तालुक्यातील शहरे व गाव यांचा समावेश अभ्यासामध्ये करण्यात आला आहे. त्यांचे शहरे व गाव असे वर्गीकरण स्त्रियांच्या राहण्याच्या ठिकाणावरुन केले आहे. ते पुढील तक्त्यामध्ये आहे.

तक्ता क्रमाक ४.१५

एकल स्त्रियांची पूर्वीची कौटुंबिक पार्श्वभूमी

अ.न.	तपशील	संख्या	टक्केवारी
१	ग्रामीण	१६३	९२.६१
२	शहरी	१३	७.३९
	एकूण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१२



तक्ता क्र. ४.१५ मध्ये १६३ (९२.६१ टक्के) स्त्रिया ग्रामीण भागात राहत आहेत. तर १३ (७.३९ टक्के) स्त्रिया शहरी भागामध्ये राहत आहेत. शहरी संस्कृतिमध्ये सामाजिक निर्बध कमी असतात किंवा थोडयाफार प्रमाणात कमी आढळतात. जीवन

व्यतीत करताना त्यांचा फारसा प्रभाव होत नाही. परंतु ग्रामीण संस्कृतीमध्ये हे प्रमाण रीतीरिवाज, परंपरा, रुढी यांचे जास्त असते. एकल स्त्रियांची संख्या गावात जास्त असल्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. जीवनाच्या प्रत्येक प्रसंगावर त्यांचा प्रभाव अधिक असल्याचे दिसून येत आहे.

४.२.१६ स्वंयपाकासाठी वापरत असणा—या साधनांचा

तासगाव तालुक्यातील एकल स्त्रिया स्वयंपाकासाठी वापरत असलेल्या साधनांच्या बाबतीत विचारणा केली असता त्यांनी दिलेल्या उत्तरांचा तपशिल पुढील तक्त्यामध्ये देण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.१६

एकल स्त्रिया स्वंयपाकासाठी वापरत असणा—या साधनांचा तपशील

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	गॅस	४०	२२.७२
२	चुल	७०	३९.७८
३	स्टो	३५	१९.८८
४	शेगडी	३१	१७.६२
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१३



तक्ता क्र. ४.१६ मध्ये ७०(३९.७८ टक्के) महिला स्वयंपाकासाठी चुलीचा वापर करत आहेत. तर ४० (२२.७२ टक्के) स्त्रियांच्या कडे गॅस आहे. एकूण एकल स्त्रियांपैकी ६६ स्त्रिया स्टोव्ह आणि शेगडीचा वापर करताना दिसून येत आहेत. अजूनही ग्रामीण भागामध्ये स्वयंपाकासाठी चुलीचा वापर केल्याचे दिसून येत आहे.

४.२.१७ पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता

मानवाच्या मुलभूत गरजा बरोबर पाणी ही अत्यंत महत्त्वाची गरज मानली जाते. यासंदर्भात एकल स्त्रियांना त्याच्या उपलब्धतेबद्दल प्रश्न विचारला असता त्यांनी पुढीलप्रमाणे उत्तरे दिली आहेत. त्याचे विवेचन पुढील तक्त्यात करण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.१७

पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	पिण्यासाठी पाणी उपलब्ध असणे	१३९	७८.९८
२	पिण्यासाठी पाणी उपलब्ध नसणे	३७	२१.०२
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१४



तक्ता क्र. ४.१७ मध्ये असे दिसून येते की, १३९ स्त्रियांना (७८.९८ टक्के) पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत आहे. तर ३७ (२१.०२ टक्के) स्त्रियांना पिण्याचे पाणी योग्य प्रमाणात मिळत नसल्याचे दिसून आले.

जास्तित जास्त स्त्रियांना पाणी उपलब्ध असल्याचे दिसून येते. सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणी उपलब्ध होत आहेव ३७ स्त्रियांना पुरेशाप्रमाणात पाणीपुरवठा

उपलब्ध होण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. विहीरी, कूपनलिका, तलाव या ठिकाणाहून पाणीपुरवठा उपलब्ध करावा लागत आहे.

४.२.१८ एकल स्त्रियांची निवारा व्यवस्था

अन्न,वस्त्र,निवारा या प्राथमिक गरजाची प्रत्येकास आवश्यकता असते. निवारा व्यवस्था वेगवेगळया प्रकारची घर स्वताच्या मालकीची असणे अथवा भाडे तत्वावर उपलब्ध करून घेणे आवश्यक असते. स्त्रियांना स्वताची निवास व्यवस्था ही पुढील पध्दतीने वर्गीकरण तक्तामध्ये केले आहे.

तक्ता क्रमाक ४.१८

एकल स्त्रियांची निवारा व्यवस्था

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	स्वत:चे घर	१३९	७८.९८
२	भाडे तत्वावर	३७	२१.०२
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१५



तक्ता क्र. ४.१८ मध्ये १३९(७८.९८ टक्के) स्त्रियांना स्वत:च्या मालकीची घरे यामध्ये मातीची,सिमेंट, कॉक्रीटची, धाब्याची असल्याचे दिसते. बाकीच्या ३७ स्त्रियांनी या स्वत:च्या आर्थिक परिस्थितीनुसार भाडे तत्वावर निवास व्यवस्था उपलब्ध केली आहे.

४.२.१९ सामाजिक समस्या

समाजामध्ये जीवन व्यतीत करत असताना एकल स्त्रियांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. यामध्ये आरोग्य विषयक सुविधांचा अभाव, पाण्याचा तुटवडा, वाहतुक दळणवळण सुविधांचा अभाव, शैक्षणिक सुविधांचा अभाव, इतर सामाजिक सुविधांचा अभाव अशा समस्या निर्माण होतात. यांचा अभ्यास पुढील तक्त्यात करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.१९

सभोवतालच्या परिसरातील सामाजिक समस्या

अ.न.	सामाजिक समस्या	संख्या	टककेवारी
१	आरोग्य विषयक सुविधांचा अभाव	२५	१४.२०
२	स्वच्छ पाण्याचा अभाव	३३	१८.७५
३	आरोग्य केद्राचा अभाव	२५	१४.२०
४	वाहतुक व दळणवळणाच्या सुविधांचा अभाव	३३	१८.७५
५	शैक्षणिक सुविधांचा अभाव	३७	२१.०२
६	इतर सामाजिक सुविधा	२३	१३.०६
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१६



तक्ता क्र. ४.१९ मध्ये सामाजिक समस्यांचा सतत एकल स्त्रियांना सामना करावा लागतो. त्यांना सगळयात जास्त आरोग्य विषयक सुविधा ४८(२७.२७ टक्के) होत आहे. स्वच्छ पाण्याच्या पुरवठयाचा अभाव ३३(१८.७५टक्के) स्त्रियांना सामना करावा लागत आहे. ३७(२१.०२ टक्के) स्त्रियांना शैक्षणिक सुविधांचा अभाव जाणवत आहे. ३३(१८.७५ टक्के) स्त्रिया वाहतुक दळणवळण समस्यांना दैनंदिन जीवनात सार्वजनिक सुविधांचा अभाव जाणवत आहे.

सामाजिक जीवनामध्ये शासकीय संस्था व सार्वजनिक साधनसामुग्रीच्या पुरवठयाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. समाजातील अडचणी निर्माण होतात पण सर्वांनी मिळून चांगल्या सुविधा शासनाकडून राबवणे आवश्यक आहे.

४.२.२० आरोग्य विषयक सुविधा

एकल स्त्रियांना आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शासकीय, अशासकीय संस्थांवर अवलंबून रहावे लागत आहे. त्याचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.२०

एकल स्त्रियांना उपलब्ध होणा—या आरोग्य विषयक सुविधा

अ.न.	आरोग्य विषयक सेवा	संख्या	टक्केवारी
१	शासकीय	१५१	८५.८०
२	खाजगी	२५	१४.२०
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१७



तक्ता क्र. ४.२० मध्ये एकल स्त्रियांना स्वत:च्या आरोग्यासाठी १५१(८५.८ टक्के)जणींना शासकीय सुविधा उपलब्ध होत आहेत. २५ (१४.२० टक्के) स्त्रियांना खाजगी आरोग्य सुविधांवर अवलंबून रहावे लागत आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवा ठराविक महिला स्वत:च्या आरोग्याची काळजी घेताना दिसत आहेत. जास्तित जास्त महिला आरोग्य सेवांसाठी शासकीय आरोग्य केंद्राचा वापर करताना दिसून येत आहे.

४.२.२१ कुटूंब कर्ता म्हणून समस्या

कुटुंब प्रमुख म्हणून जीवनामध्ये प्रत्येक समस्यांचा सामना करावा लागत असतो. एकल स्त्रियांना कुटूंब कर्त्याच्या सर्व जबाबदा—या पार पाडाव्या लागतात. जबाबदा—या आर्थिक, सामाजिक, आरोग्य, राजकीय व मिश्र अशा जबाबदा—या त्या पेलवत आहेत. याचा उल्लेख पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.२१

एकल स्त्रियांच्या कुटूंब कर्ता म्हणून समस्या

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	आर्थिक जबाबदारी	८५	४८.२९
२	दोन्ही जबाबदा—या	२५	१४.२०
३	सामाजिक समस्या	३३	१८.७५
४	आरोग्य समस्या	२३	१३.०६
५	राजकीय समस्या	१०	५.६८
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१८



तक्ता क्र. ४.२१ मध्ये एकल स्त्रियांच्या वरील कुटूंब कर्त्यांच्या भूमिका पार पाडताना ८५(४८.२९ टक्के) आर्थिक समस्या सोडवण्याची अडचण भासत आहे. ही एकूण एकल स्त्रियांच्यामध्ये मोठी समस्या आहे. दोन्ही म्हणजे कुटूंब कर्ता व आर्थिक समस्या अशी जबाबदारी २५ (१४.२० टक्के) स्त्रियांना भेडसावत आहे. समाजामध्ये बावरताना मानहानी, मानसिक दडपण यासारख्या समस्यांचा सामना २५ (१४.२० टक्के) स्त्रियांना करावा लागत आहे. स्वत:चे आरोग्य या स्त्रिया मानसिक व आर्थिक जबाबदारीमुळे हरवून बसलेल्या २३ (१३.०६ टक्के) स्त्रियांना भेडसावत आहे. मानसिक आघाताचा सामना अधिक प्रमाणात सोसल्यामुळे त्यांच्या समस्या वाढतच आहेत. पिण्याच्या पाण्याचा अभाव, राहण्याची योग्य सोय नाही. अन्नधान्य पुरवठा / पालेभाज्या / फळ / दूध आहारात उपलब्ध करुन घेऊ शकत नाही. त्यामुळे हिमोग्लोबीची

कमतरता, सांधे दुखणे, डोके दुखणे, साथीचे टाईफाईड, मलेरिया, कॉलरा, चिकनगुण्या यांना तोंड दयावे लागते.

४.२.२२ एकल स्त्रियांना भेडसावणा—या समस्या

एकल स्त्रियांना वैयक्तिक जीवनामध्ये स्वत:लाच सर्व संघर्ष करावा लागतो. परिणामी शारिरीक समस्या, मानसिक समस्या, पुरुषप्रधान संस्कृती, वारसा हक्कापासून वंचित, लाजाळूपणा, आरोप—प्रत्यारोप, अप्रतिष्ठा यांचा सामना त्यांना करावा लागतो. त्याचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.२२

एकल स्त्रियांना भेडसावणा—या समस्या

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	शारिरीक समस्या	११	६.२५
२	मानसिक समस्या	२५	१४.२०
३	पुरुषप्रधान संस्कृतीचा बळी	५६	३१.८२
४	वारसाहक्कापासून वंचित	३३	१८.७५
५	अबोल लाजाळूपणा फायदा घेतात	१८	१०.२३
६	वर्तनुकीवर आरोप	१९	१०.८०
७	अप्रतिष्ठित वागणूक	१४	७.९५
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.१९



तक्ता क्र. ४.२२ मध्ये ११ (६.२५ टक्के) स्त्रियांना शारिरीक समस्यांचा सामना करावा लागत आहे. २५ (१४.२० टक्के) स्त्रियांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. ५६(३१.८२ टक्के) स्त्रियांना पुरुषप्रधान संस्कृतीचा बडगा सोसावा लागत आहे.३३ (१८.७५ टक्के) स्त्रियांना आपल्या वारसा हक्का पासून वंचित रहावे लागत आहे. १८ (१०.२३ टक्के) स्त्रियांचा फायदा (लाजाळूपणा) उठवलेला दिसत आहे. १९ (१०.८० टक्के) स्त्रियांना तुमची वर्तणूक, व्यवहार योग्य नाही असे आरोप—प्रत्यारोपांचा सामना करावा लागत आहे. १४ (७.९५ टक्के) स्त्रियांना समाज, कुटूंब, शेजारी यांच्याकडून अयोग्य पद्धतीची वागणूक दिली जाताना दिसत आहे.

स्त्री म्हणून अनेक समस्यांचा सामना करुन त्या आपले आयुष्य व्यतीत करताना दिसत आहेत.

४.२.२३ मनोबल वाढवण्यासाठी साहाय्यभूत घटक

मनोबल वाढवण्यासाठी कुटूंबातील व्यक्ती, मैत्रीणी, पाहुणे, शेजारी अशा अनेकांचे सहाय्य होत असते. सुख दु:खाचा प्रसंग असो अथवा एखादा सकारात्मक अथवा नकारात्मक निर्णय घ्यावयाचा असो कोणी कोणी आपल्या पाटीशी उभा राहून पुढे जाण्याच्या दृष्टीने सहाय्य करणारा असावा लागतो. मानसिक प्रबलता प्राप्त करण्यासाठी मनोबल आवश्यक असते. मनोबल हे अदृश्यपणे जीवनाची आणि विकासाची गती वाढवते.

तक्ता क्रमाक ४.२३

एकल स्त्रियांचे मनोबल वाढवण्यासाठी साहाय्यभूत घटक

अ.न.	घटक	संख्या	टककेवारी
१	आई—वडील	२८	१५.९१
२	सासू—सासरे	११	६.२५
३	मैत्रिणी	४४	२५.००
४	नातेवाईक	१३	७.३९
५	निमशासकीक संस्था	६७	३८.०७
६	कोणीही नाही	१३	६.८१
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२०



तक्ता क्र. ४.२३ मध्ये, एकल स्त्रियांची मनोबल वाढवण्यासाठी ६७ (३८.०७ टक्के) निमशासकीय संस्थांनी मदत केली आह तर ४४ (२५ टक्के) स्त्रियांना मनोबल वाढवण्यासाठी मैत्रिणींनी मदत केली आहे. १३ (६.८१ टक्के) स्त्रियांना कोणीही मदत केलेली नाही असे नमूद करण्यात आले आहे. समाजापासून एकटे राहण्याची वेळ त्यांच्यावर आलेली आहे.

४.२.२४ कौटुंबिक स्थितीचे वर्णन

एकल स्त्रियांचे कौटुंबिक स्थितीचे वर्णन विचारले असता त्यांच्या दृष्टीने ६ वर्णनांना १ सहमत, २ असहमत व लागू नाही, ३ असा पसंती क्रम देण्यात आला. त्यांना ज्यामुळे आपले जीवन एकाकी आहे यावर मत प्रदर्शनानुसार पसंती क्रमांक दिला आहे.

तक्ता क्रमाक ४.२४

एकल स्त्रियांच्या कौटुंबिक स्थितीचे वर्णन

अ. न.	कौटुंबिक स्थिती	सहमत	असहमत	लागू नाही	एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
१	आपल्या विषयी कोणतीही तपासणी करु नये	२१ (५८.३३)	१३ (३६.११)	२ (५.५६)	**३६ (१००)**	१.४७	२४.४२
२	मनाप्रमाणे जगण्याची मुभा असावी	२६ (७६.४७)	५ (१४.७१)	३ (८.८२)	**३४ (१००)**	१.३२	२३.११
३	कोणत्याही प्रकारचे बंधन असता कामा नये	१६ (६४.००)	७ (२८.००)	२ (८.००)	**२५ (१००)**	१.४४	१६.६६
४	कोणत्याही कार्यक्रमामध्ये सहभाग घेता यावा	१९ (६३.६६)	७ (२३.३३)	४ (१३.३३)	**३० (१००)**	१.५०	२०.१५
५	मुक्तपणे बोलण्यासाठी	२१ (७०.००)	७ (२३.३३)	२ (६.६७)	**३० (१००)**	१.३६	२०.२५
६	समान वागणूक	१४ (६६.६७)	५ (२३.८१)	२ (९.५२)	**२१ (१००)**	१.४२	१३.८५
	एकुण	**११७** (६६.४८)	**४४** (२५.००)	**१५** (८.५२)	**१७६ (१००)**	१.४२	१२३.४६

स्त्रोत: प्रश्नावली

तक्ता क्र. ४.२४ मध्ये, आपल्या विषयी कोणीही तपासणी करु नये, मनाप्रमाणे जगण्याची मुभा असावी, कोणत्याही प्रकारचे बंधन असता कामा नये, त्यांना सहभाग घेता यावा, समाजात मुक्तपणे बोलण्यासाठी स्वतंत्र असावे व इतरांबरोबर समान संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या सर्व विचारावर त्यांनी दिलेल्या पसंती क्रमांकाचे भारांकीत सरासरी काढली, सहमत १ =१ भारांकीत केले. असहमत २ = २ भारांकीत केले. लागू नाही ३ = ३ भारांकीत केले. सगळयात जास्त १.५० भारांकीत सरासरी ही कोणत्याही कार्यक्रमामध्ये सहभाग घेता यावा तर प्रमाण विचलनामध्ये सगळयात जास्त २४. ४१६ एवढे आपल्या विषयी कोणही तपासणी करु नये याला आहे.

४.२.२५ एकटेपणा जगण्यापाठीमागील कारणमीमंसा

एकल स्त्रियांची एकटेपणानी जीवन जगण्यापाठीमागील कारणमीमंसा जाणण्यात आली असता १० कारणांनी त्यांनी १ प्रमुख जबाबदार २ काही प्रमाणात जबाबदार व ३ लागू नाही असा पसंती क्रमांक दिला. एकटेपणा जगण्यापाठीमागील कारणमीमंसा पुढील तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

तक्ता क्रमाक ४.२५
एकटेपणा जगण्यापाठीमागील कारणमीमंसा

अ.न.	कारण	प्रमुख जबाबदार	काही प्रमाणात जबाबदार	लागू नाही	एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
१	उज्ज्वल करिअर	१४ (६३.६४)	६ (२७.२७)	२ (९.०९)	२२	१.४५	१४.५३
२	बौध्दिक कामांना प्राधान्य	१६ (६६.६७)	५ (२०.८३)	३ (१२.५०)	२४	१.४५	१५.९५
३	पुबेल अभ्यासक्रम पूर्तता	१२ (६३.१६)	५ (२६.३२)	२ (१०.५३)	१९	२.१०	११.९५
४	सामाजिक व धार्मिक कार्यासाठी जीवन समर्पित	६ (४०.००)	५ (३३.३३)	४ (२६.६७)	१५	१.८६	९.२९
५	सर्व सुखंचा उपभोग	१० (५८.८२)	५ (२९.४१)	२ (११.७६)	१७	१.५२	१०.९५
६	सयुंक्त कुटूंब आवडत नाही	९ (५२.९४)	६ (३५.२९)	२ (११.७६)	१७	१.५८	१०.९०
७	दुय्यम स्थान नको	११ (७३.३३)	३ (२०.००)	१ (६.६७)	१५	१.३३	९.६७
८	आर्थिक स्वातंत्र्य	१७ (८९.४७)	..	२ (१०.५३)	१९	१.२१	१२.५८
९	कौटुंबिक वाद नको	९ (५६.२५)	६ (३७.५०)	१ (६.२५)	१६	१.५०	१०.२५
१०	सामाजिक वाद नको	९ (७५.००)	३ (२५.००)	..	१२	१.२५	७.६०
	एकुण	**११३** (६४.२०)	**४४** (२५.००)	**१९** (१०.८०)	**१७६**	**१.४६**	**१२३.४१**

स्त्रोतः **प्रश्नावली**

तक्ता क्र. ४.२५ मध्ये, उज्ज्वल करिअर, बौध्दिक कामांना प्राधान्य, पुढील अभ्यासक्रम पूर्तता, सामाजिक व धार्मिक कार्यासाठी जीवन समर्पित, सर्व सुखांचा उपभोग संयुक्त कुटूंब पद्धत आवडत नाही, दुय्यम स्थान नको, आर्थिक स्वातंत्र्य, कौटुंबिक वाद नको व सामाजिक वाद नको असे एकूण १० कारणांना पसंती क्रमांकानुसार भारांकीत सरासरी काढली. प्रमुख जबाबदार १ = १ ने भरांकीत केले काही प्रमाणात जबाबदार २ = २ भारांकीत केले. ३ = ३ लागू नाहीला भारांकीत केले. या सर्व कारणांनी पुढील अभ्यासक्रम पूर्तता याचा भारांकीत सरासरी २.१० इतका आहे तर सर्वात जास्त प्रमाण विचलन १५.९४ हे बौद्धिक कामांना प्राधान्य चे आहे.

४.२.२६ एकल स्त्रियांचा नोकरीविषयक तपशील

एकल स्त्रिया नोकरी करत आहेत / स्त्रिया नोकरी करत नाहीत.

तक्ता क्रमाक ४.२६

एकल स्त्रियांचा नोकरीविषयक तपशील

अ.न.	तपशील	संख्या	टक्केवारी
१	आहे	३५	१९.८८
२	नाही	१४१	८०.११
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२१



तक्ता क्र. ४.२६ मध्ये ३५ (१९.८९ टक्के) एकल स्त्रिया नोकरी करत आहेत. तर १४१ (८०.११ टक्के) स्त्रिया नोकरी करत नाहीत.

आपल्या चरितार्थासाठी १९.८९ एकल स्त्रियांना जीवनाचा चरितार्थ नोकरी करुन आर्थिक तरतूद उभी करवी लागत आहे.

४.२.२७ एकल स्त्रियांचा नोकरीविषयक तपशील

एकल स्त्रिया आपल्या चरितार्थासाठी नोकरी करतात. त्यामध्ये सरकारी खाजगी उद्योगसंस्था, व्यावसायिक / व्यापारी संस्थामध्ये मोठया प्रमाणात स्त्रिया नोकरी करत आहेत. आपल्या कौशल्याचा वापर करुन आपला चरितार्थ चालवत आहेत. याचा तपशिल पुढील तक्त्यामध्ये अभ्यासण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.२७

एकल स्त्रियांचा नोकरीविषयक तपशील

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	सरकारी	११	३१.४२
२	खाजगी	१५	४२.८५
३	उद्योग	५	१४.२८
४	व्यावसायिक	४	११.४२
	एकुण	३५	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२२



तक्ता क्र. ४.२७ मध्ये, सरकारी नोकरी ११(३१.४२ टक्के) एकल स्त्रिया करत आहेत. १५ (४२.८५ टक्के) एकल स्त्रिया खाजगी संस्था, ५ (१४.२८ टक्के) स्त्रिया उद्योग व ४ (११.४२ टक्के) एकल स्त्रिया व्यवसायिक म्हणून काम करतात.

खाजगी संस्थामध्ये नोकरी करणाऱ्या एकल स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसत आहे.

४.२.२८ नोकरीची वेळ

एकल स्त्रिया ज्या ठिकाणी नोकरी करतात त्यांच्या कामकाजाची वेळ कोणती आहे हे पुढील तक्त्यामध्ये अभ्यासण्यात आले आहे

तक्ता क्रमाक ४.२८

एकल स्त्रियांचा नोकरीची वेळ

अ.न.	नोकरीची वेळ	संख्या	टककेवारी
१	सकाळी ते सांयकाळ	१३	३७.१४
२	दुपारी ते सांयकाळ	१४	४०.००
३	सकाळी ते रात्रीपर्यत	५	१४.२९
४	रात्रीचे	२	५.७१
५	ल्रागू नाही	१	२.८६
६	कार्यरत शिफ्ट	००	००
	एकुण	३५	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२३



तक्ता क्र. ४.२८ मध्ये पूर्णवेळ ८ तास सकाळपासून सायंकाळपर्यंत १३(३७.१४ टक्के) एकल स्त्रियांना कामकाज उपलब्ध आहे. दुपारी ते सायंकाळपर्यंत चार तास ते

सहा तास १४ (४०.०० टक्के) एकल स्त्रिया काम करतात. सकाळी ते रात्रीपर्यंत १२ तास ५ (१४. २९ टक्के) एकल स्त्रिया काम करतात. रात्रपाळीचे कामकाज २ (५.७१ टक्के) एकल स्त्रिया करत आहेत. १(२.८६ टक्के) एकल स्त्रियांना कोणतीही वेळ लागू नाही. त्यांना शक्य असेल त्या त्या वेळी कामकाजासाठी बोलवले जाते. कामाची वेळ त्यांची सतत बदलते.

४.२.२९ एकल स्त्रियां रिकामा वेळ कोणाबरोबर व्यथित करतात

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. प्रत्येकाला आपल्या रिकाम्या वेळेचा सद्उपयोग करायला आवडते. काही आपला छंद जोपसतात, काही एखादयास मदत करतात, काही इतरांबरोबर वेळेचा योग्य उपयोग करतात. एकल स्त्रियांनाआपला वेळ, सुख दु:ख वाटण्यासाठी त्यांच्यातील काहीजणी आई, मैत्रिणी, बहिण यांच्यासोबत विचार विनिमय करण्यास त्यांना आवडते. यांचा अभ्यास पुढील तक्त्यात करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.२९

एकल स्त्रियां रिकामा वेळ कोणाबरोबर व्यथित करतात

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	आई	९	५.११
२	मैत्रिण	१९	१०.७९
३	बहिण	२५	१४.२०
४	कोणाबरोबर नाही	१२३	६९.८८
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२४



तक्ता क्र. ४.२९ मध्ये, ९(५.११ टक्के) एकल स्त्रिया आपल्या आईबरोबर आपला विचार विनिमय करण्यामध्ये त्यांना मानसिक समाधान लाभते. १९(१०.७९ टक्के) एकल स्त्रिया त्यांच्या मैत्रिणी बरोबर मानसिक समाधानाने वेळ घालवतात. २५ (१४.२० टक्के) स्त्रियांना आपल्या नात्यांने बहिण असणा—यांबरोबर वेळ घालवण्यात त्यांना आनंद लाभतो. तर १२३ (६९.८८ टक्के) स्त्रियांना वेळ जरी असला तरी त्यांना कोणासोबत घालवायचा ही समस्या आहे. कारण त्यांना सामाजिक ऋणानुबंध निर्माण होणारे असे कोणीही त्यांच्या आयुष्यात आलेले नाही. तसेच कुटूंब पण तेवढा आदरयुक्त वर्तणूक देत नाही.

४.२.३० रिकाम्या वेळेचा उपयोग

एकल स्त्रिया आपला वेळ सत्कारणी लावतात. त्यांच्याकडे रिकामा असणारा वेळ त्या अनेक प्रकारची माहिती मिळवण्यात, ज्ञान वाढवण्यात, नविन तंत्रज्ञान वापरण्यात,

नविन ठिकाणांना भेटी देऊन त्यांचे ऐतिहासिक, सामाजिक, भौगोलीक महत्व जाणून घेण्यासाठी आयोजन करतात. अशिक्षित स्त्रिया सुद्धा या सगळयामध्ये उत्साहाने भाग घेतात. याचाही अभ्यास पुढील तक्त्यात करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.३०

एकल स्त्रियां रिकामा वेळेचा उपयोग

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	टी. व्ही.	५३	३०.११
२	कॉम्युअरचा वापर	११	६.२५
३	मोबाईल	४०	२२.७६
४	वाचन	२५	१४.२०
५	सहल	२४	१३.६४
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२५



तक्ता क्र. ४.३० मध्ये स्त्रियांच्या नवनविन ज्ञान, माहिती जिज्ञासेने वाढवण्यासाठी ५३ (३०.११ टक्के) करमणूक म्हणून टी.व्ही. पाहतात. ११ (१७.६१ टक्के) कॉम्प्युटर,

नेट वापरणे इतरांच्या मदतीने नविन उत्पन्नाचे स्त्रोत शोधण्यासाठी त्यांचा वापर करण्यासाठी वेळ देतात. ४०(२२.७२ टक्के) स्त्रिया मोबाईलवर मनोरंजन, ज्ञान, माहिती मिळवण्यासाठी वेळ वापरतात. २५ (१४.२० टक्के) एकल स्त्रिया पेपर वाचन, पुस्तकांचे वाचन करतात. आपला रिकामा वेळ सत्कारणी लावतात. २४ (१३.६३ टक्के) एकल स्त्रिया कामातून सवड मिळाली देवस्थाने, तिर्थस्थाने, प्रदर्शने, यात्रा अश्या ठिकाणी वेळ घालवून आनंद मिळवतात.

कष्ट करुन येणा—या थकवा घालवण्यासाठी मनातील मळभ काढण्यासाठी स्वत:च्या सोईनुसार व मानसिकतेनुसार प्रत्येकीला वेळेचा सद्उपयोग करण्यास योग्य वाटल्याचे दिसून येते.

४.२.३१ एकल स्त्रियांबददल कुंटुबाकडून अपेक्षा

समाज व कुटुंबाकडून या स्त्रियांना जीवनाच्या प्रत्येक वळणावर जाणवणा—या अडचणी त्या सोडवताना मदतीचा वेगवेगळया अपेक्षा जाणवल्या या अपेक्षांचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.३१

एकल स्त्रियांबददल कुंटुबाकडून अपेक्षा

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	मदत करणारे	४४	२५.००
२	आर्थिक ओझे	५३	३०.११
३	जबाबदारी	२०	११.३६
४	दायित्व	३५	१९.८९
५	नियमित कुंटुब सदस्य	२४	१३.६४
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२६



तक्ता क्र. ४.३१ मध्ये, ४४ (२५ टक्के) एकल स्त्रियांना मदत करणारे कोणीतरी असावे व ज्या अडचणी येतात त्यांची सोडवणूक करण्यास मदतनीस म्हणून कोणीतरी असावे असे त्यांना वाटते. तर ५३ (३०.११ टक्के) स्त्रियांना आपल्याला जी आर्थिक समस्या जाणवते त्यावेळी आर्थिक हातभार लावणारे अथवा सहाय्य करणारे कोणीतरी उभे राहावे असे वाटते. आपल्यावर पडलेल्या सर्व जबाबदा—यांचा बोजा हालका करावा

अथवा सहाय्यक कोणीतरी असावे असे २० (११.३६ टक्के) एकल स्त्रियांना वाटते. तर ३५ (१९.८८ टक्के) आपल्या दायित्वाची जबाबदारी उचलणारे अथवा वाटणी करण्यास कोणी तरी हक्काचेअसाणारे असावे तर २४ (१३.६३ टक्के) कुटूंब सदस्य म्हणून आपणास आपल्या कुटूंबाकडून स्वीकारावे.

वरील सर्व अपेक्षामध्ये आर्थिक अपेक्षा ही सर्वात जास्त जणींना आहे असे दिसून येते.

४.२.३२ विविध संस्थेतील एकल स्त्रियांचे सभासदत्व

अनेक संस्था महिलांच्या विकासासाठी, कायदयातंर्गत पाठबळासाठी अथवा अशासकीय, अथवा शासकीय संस्था प्रबलता प्राप्त व्हावी म्हणून संस्था आपल्या भूमिका बजावताना दिसतात. एकल स्त्रिया या संस्थांच्या सदस्यत्व घेतल्याचे दिसते. यांचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे. तो पुढीलप्रमाणे

तक्ता क्रमाक ४.३२

विविध संस्थेतील एकल स्त्रियांचे सभासदत्व

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	व्यावसायिक संस्था	३२	१८.१८
२	महिला कल्याणकारी संस्था	२९	१६.४८
३	कोणत्याही संस्थेचे सभासदत्व नाही	११५	६५.३४
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२७



तक्ता क्र. ४.३२ मध्ये ३२ (१८.१८ टक्के) एकल स्त्रिया या व्यवसायिक संस्थांच्या सभासद असल्याच्या दिसत आहेत. २९ (१६.४७ टक्के) एकल स्त्रिया महिला कल्याणकारी संस्थांच्या सभासद असल्याचे दिसतात. तर ११५ (६५.३४ टक्के) एकल स्त्रियांना कोणत्याही संस्थेचे सभासदत्व नाही त्यांना आपल्यासाठी अशा संस्था मार्फत काही सहाय्य केले जाते अथवा मदत केली जाते. याचे पूर्ण ज्ञान त्यांना नाही. सभासदत्वामुळे काय आपणास जीवनाच्या प्रत्येक वळणास उभा करण्यास संस्था कशा सहाय्य करतात यांचे ज्ञान त्यांना देणे आवश्यक आहे.

४.२.३३ एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्न

जीवनाच्या उलाढालीमध्ये कोण ससा तर कोण पारधी बनत असतात. दर दिवशी नविन अवस्थेमधून प्रवास करावा लागतो. प्रत्येकाला अनेक मार्गाने उत्पन्न मिळवावे लागते. उत्पन्नाच्या वेगवेगळया मार्गातून होणारी प्राप्ती एकल स्त्रियांना किती होते. त्यांना

चरीतार्थासाठी पुरेसा स्त्रोत आहे का? असे अभ्यासल्यानंतर त्याची माहिती पुढील तक्त्यामध्ये मांडली आहे.

तक्ता क्रमाक ४.३३

एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्न

अ.न.	तपशील	संख्या	टक्केवारी
१	२५००० पेक्षा कमी	८४	४७.७३
२	२५००१ ते ५००००	६२	३५.२३
३	५०००१ ते ७५०००	१५	८.५२
४	७५००१ ते १०००००	१२	६.८२
५	१००००१ पेक्षा जास्त	३	१.७०
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२८



तक्ता क्र. ४.३३ मध्ये वार्षिक उत्पन्न २५००० रुपयांपेक्षा कमी असणा—या संख्या ८४ (४७.७ टक्के) आहे. २५००१ ते ५०,००० च्या दरम्यान ६२(३५.१२ टक्के) एवढे उत्पन्न असणा—या आहेत. ५०००१ते ७५००० च्या दरम्यान १५ (८.५२ टक्के)

एकल स्त्रियांचे उत्पन्न आहे. तसेच ७५००१ ते १०,०००० एवढे जास्त उत्पन्न असणा—या ३ (१.७० टक्के) एकल स्त्रिया आहेत.

एकूण एकल स्त्रियांचे उत्पन्न हे दारिद्रय रेषेच्या खाली आहे. त्यामुळे प्रत्येकीच्या चरितार्थासाठी आवश्यक ती शासनाकडून काळजी घ्यावी. घर, पाणी, आरांग्य समाज व्यवस्था यांच्याशी त्या झगडत आहेत. कमी उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये त्यांना आपल्या जीवनाचा सारथी होऊन रथ ओढावा लागत आहे.

४.२.३४ एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्नाचे मार्ग

एकल स्त्रिया आपल्या चरीतार्थासाठी उत्पन्न मिळवताना अनेक क्षेत्रामध्ये कार्य करतात. स्वत:च्या कौशल्याच्या आधारे त्या शेती करतात. आपल्या कडील ज्ञानाद्वारे सेवाप्रदान करुन नोकरी करतात. कौशल्य, ज्ञान व शारिरीक कष्टाच्या आधारे व्यापार व व्यवसायाद्वारे उत्पन्नाचा मार्ग प्राप्त करताना दिसत आहे.

तक्ता क्रमाक ४.३४

एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्नाचे विविध मार्ग

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	शेती	१२०	६८.१८
२	नोकरी	३५	१९.८९
३	इतर	२१	१.९३
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.२९



तक्ता क्र. ४.३४ मध्ये १२० (६८.१८ टक्के) शेती व शेती पूरक व्यवसाय एकल स्त्रिया करतात. भाजीपाला निर्मिती, विक्री, अन्नधान्य निर्मिती व विक्री, शेळी पालन, कुक्कुट पालन, पशुपालन दुग्ध व्यवसाय स्वत:साठी उत्पन्न प्राप्त करतात. ३५(१९.८८ टक्के) खाजगी संस्थामध्ये मोल मजुरी करतात. तर २१(११.९३ टक्के) स्त्रिया किराणामाल दुकान, फळे व भाजीपाला विक्री, ब्युटी पार्लर, शिलाई काम, धुणे भांडी करणे, टी स्टॉल याद्वारे उत्पन्न मिळवतात.

एकल स्त्रियांचा आपल्या उत्पन्नासाठी त्यांना दररोज काबाडकष्ट करावे लागत आहे. या कष्टातून उत्पन्न प्राप्त करुन जीवन त्या व्यतीत करीत आहेत.

४.२.३५ दैनंदिन गरजाची पुर्तता करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब

चरीतार्थासाठी सारथी म्हणून जीवन व्यतीत करताना एकल स्त्रियांचे उत्पन्न कमी आहे. त्यांना त्यांच्या दैनंदिन गरजा भागतात की नाही असे विचारले असता त्यांच्या कडून आलेल्या उत्तराचा भाग पुढील तक्त्यात अभ्यासला आहे.

तक्ता क्रमाक ४.३५

एकल स्त्रियांची दैनंदिन गरजाची पुर्तता

अ.न.	तपशील	संख्या	टक्केवारी
१	होय	३५	१९.८९
२	नाही	१४१	८०.११
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.३०



तक्ता क्र. ४.३५ मध्ये ३५ (१९.८८ टक्के) आपणास पुरेसे उत्पन्न प्राप्त होते. असे एकल स्त्रिया म्हणतात तर १४१ (८०.१२ टक्के) मिळणारे उत्पन्न त्यांना त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पुरेसे प्राप्त होतेच असे नाही. मिळणारे सर्वांचे उत्पन्न हे दारिद्रय रेषेखालील आहे. त्यामुळे त्यांना आर्थिक सहाय्याची गरज भासते. वाढत्या

महागाईमध्ये जीवनाच्या स्थायी चाके वेगाने अथवा गती प्राप्त करावयाची असतील तर आर्थिक सबलता प्राप्तीसाठी मार्ग निर्माण केला पाहिजे. शासकीय नोकरीमध्ये त्यांना सामावून घ्यावे, राखीव जागांची तरतूद, उद्योगासाठी पायाभूत सुविधा व अर्थ पुरवठा, घराची तरतूद अशा सहाय्यक बाबी शासनाने पुढाकार घेऊन एकल स्त्रियांना जीवन व्यतीत करता येईल. आर्थिक स्त्रोत वाढीसाठी सहाय्यक ठरेल.

४.२.३६ दैनंदिन गरजाची पुर्तता करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब

एकल स्त्रियांच्या स्वत:च्या दैनंदिन गरजा पूर्ततेसाठी सहाय्यक म्हणून अनेकांवर अवलंबून रहावे लागते. त्यासाठी नातेवाईक, शेजारी, कर्ज व इतर अन्य मार्गांचा अवलंब करतात. याचा अभ्यास पुढील तक्त्यात करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.३६

एकल स्त्रियांची दैनंदिन गरजाची पुर्तता करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	नातेवाईकांच्या कडून घेणे	४२	२९.७९
२	शेजारच्या कडून घेणे	३३	२३.४०
३	बॅकाच्याकडून कर्ज घेणे	२६	१८.४४
४	इतर मार्गांचा अवलंब केला जातो	४०	२८.३७
	एकुण	१४१	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.३१



तक्ता क्र. ४.३६ मध्ये, नातेवाईकांकडून मदत घेणाऱ्या ४१ (२३.२८टक्के)एकल स्त्रिया आहेत. ३३(१८.७५ टक्के) या शेजाऱ्यांकडून मदत घेतात. २६ (१४.७५ टक्के) बॅकांकडून अर्थसहाय्य घेतात. तर ४० (२२.७२ टक्के) स्त्रिया अन्य मार्गांचा अवलंब करताना दिसून आल्या.

४.२.३७ एकल स्त्रियांचे बचत गटाचे सभासदत्व

एकल स्त्रिया आपल्या उत्पन्नाचा काही भाग सत्कारणी लावतात. तसेच इतरांना मदत करण्याच्या दृष्टीने, स्वतंत्रपणे मैत्रिणीसह जीवनाचा आनंद घेण्याच्या दृष्टीने पुंजी नियोजनासाठी बचत गटाच्या सदस्यत्वाचा स्वीकार केला आहे. याचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे. मिळून साऱ्याजणी घडवू नविन विकास पर्वणी असे हेतूने बचत गट प्रमुख व सदस्य कार्य करतात. त्याचा अभ्यास पुढील तक्त्यात करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.३७

एकल स्त्रियांचे बचत गटाचे सभासदत्व

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	होय	१२१	६८.७५
२	नाही	५५	३१.२५
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.३२



तक्ता क्र. ४.३७ मध्ये १२१ (६८.७५ टक्के) एकल स्त्रिया या बचत गटाच्या सदस्य आहेत. तसेच त्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, ऑडिटर, सदस्य अशा विविध पदावर कार्य करतात. ५५ (२१.२५ टक्के) स्त्रिया बचत गटामध्ये सभासदत्व होण्यासाठी इच्छुक नाहीत असे दिसून येत आहे.

४.२.३८ एकल स्त्रियांना मिळणा—या आर्थिक पाठबळाचा तपशील

एकल स्त्रियांना दैनंदिन गरजा व आकसिमत निर्माण होणाऱ्या गरजा भागवण्यासाठी आर्थिक तरतूदीसाठी वडिल, आई, भाऊ, बहिण तसेच इतर नातेवाईक व मैत्रिणी यांच्यावर अवलंबून रहावे लागते. यांचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.३८

एकल स्त्रियांना मिळणा—या आर्थिक पाठबळाचा तपशील

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	वडील	२०	११.३६
२	आई	३९	२२.१६
३	भाऊ	२९	१६.४८
४	बहिण	३४	१९.३२
५	इतर	५४	३०.६८
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.३३



तक्ता क्र. ४.३८ मध्ये, २० (११.३६ टक्के) एकल स्त्रिया त्यांच्या वडिलांच्याकडून आर्थिक सहाय्य घेतात. ३९ (२२.१६ टक्के) जणी आईकडून तात्पुरते सहाय्य घेतात. २९(१६.४७ टक्के) भावाकडून आर्थिक मदत घेतात. ३४ (१९.३१ टक्के)एकल स्त्रियांना बहिणीकडून आर्थिक मदत मिळाते तर ५४ (३०.३८ टक्के) जणी नातेवाईक मित्र मैत्रिणीची मदत घेतात.

एकल स्त्रियांना आपले जीवन जगताना कोणाची ना कोणाची तरी मदत घ्यावीच लागते हे अभ्यासातून दिसून आले.

४.२.३९ एकल स्त्रियांना मिळणा—या रोजगाराचे स्वरूप

एकल स्त्रिया नोकरी, व्यवसाय, उद्योगातील रोजंदारी यासारख्या कोणत्या ना कोणत्या मार्गांचा अवलंब करतात. याचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.३९

एकल स्त्रियांना मिळणा—या रोजगाराचे स्वरूप

अ.न.	तपशील	संख्या	टककेवारी
१	शेती / शेतमजुरी	८८	५०.००
२	उद्योग / व्यावसायिक / स्वयंरोजगार	३५	१९.८९
३	कौटुंबिक व्यवसाय	२१	११.९३
४	गृहिणी	२४	१३.४१
५	बेकार	६	३.४१
६	इतर	२	१.१४
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.३४



तक्ता क्र. ४.३९ मध्ये, ८८(५०.०० टक्के) एकल स्त्रिया शेती करतात. तसेच शेतमजूर म्हणून शेतामध्ये काम करतात. ३५ (१९.८८ टक्के) उद्योग, व्यवसाय, स्वयंरोजगार मार्फत आपले उत्पन्न मिळवतात. २१ (११.९३ टक्के) कुटूंबामार्फत चालवले जाणारे व्यवसायाच्या ज्ञानावर व कुटूंबाच्या कर्त्याच्या निधनानंतर व्यवसाय चालवतात. २४(१३.६३ टक्के) गृहीणी म्हणून आपले जीवन जगतात. ६ (०३.४० टक्के) बेकार व २ (०१.१३ टक्के) स्त्रिया वेळेनुसार रोजगार, मजुरी अथवा व्यवसायिक अशा मार्गाने कार्य करतात.

ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रमाण जास्त असल्यामुळे शेती व शेतमजूर म्हणून कार्य करण्याचा प्रभाव अधिक दिसून येतो.

४.२.४० शासकीय योजनेचे लाभार्थी

शासनामार्फत अनेक योजना राबवण्यात येतात. या योजनेचे एकल स्त्रियांना काही प्रमाणात लाभ होतात. याचाही अभ्यास करण्यात आला आहे. तो पुढील तक्त्यात दिसून येतो.

तक्ता क्रमाक ४.४०

शासकीय योजनेचे लाभार्थी

अ.न.	तपशील	संख्या	टकक्केवारी
१	मनरेगा	३२	१८.१८
२	इंदिरा आवास योजना	२३	१३.०७
३	जवाहर रोजगार योजना	२५	१४.२०
४	इतर	७५	४२.२०
५	लाभार्थी नाही	२१	११.९३
	एकुण	१७६	१००

स्त्रोत: प्रश्नावली

आलेख क्रमाक ४.३५



तक्ता क्र. ४.४० मध्ये, ३२ (१८.१८टक्के) एकल स्त्रिया मनरेगा योजनेचा लाभ घेतात. २३ (१३.०६ टक्के) एकल स्त्रियांना इदिरा आवास योजनेचा लाभ झाला आहे.

२५ (१४.२० टक्के) एकल स्त्रियांना जवाहर रोजगार योजनेतून रोजगार उपलब्ध झाला आहे. ७५ (४२.६१ टक्के) स्त्रियांना इतर योजनांचा लाभ मिळाला आहे तर २१ (११. ९३टक्के) स्त्रियांना कोणताही लाभ प्राप्त झालेला नाही.

४.२.४१ एकल स्त्रियांच्या शारीरिक समस्या

एकल स्त्रियांच्या शारिरीक समस्या जाणून घेण्यासाठी ६ समस्या पसंती क्रमांक घेण्यात आला. १. मोठया प्रमाणात २. कमी प्रमाणात तर ३. मूळीच नाही. असा दिला या समस्यांचे वर्गीकरण पुढील तक्त्यामध्ये करण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.४१

एकल स्त्रियांच्या शारीरिक समस्या

अ.न.	शारीरिक समस्या	तीव्रता			एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही			
१	शारीरिक समस्या	१६	७	३	२६	१.५०	१७.३२
२	शारीरिक ताणतणाव	२५	१७	२	४४	१.४७	३०.०७
३	आरोप विरोधाभास निर्माण केला जातो	१९	११	३	३३	१.५१	२२.२७
४	असमर्थपणा	१९	९	२	३०	१.४३	२०.२१
५	चांगल्या प्रकारची वागणूक	१८	१६	०	३४	१.४७	२३.०१
६	लैंगिक छळ	३	४	२	९	१.८८	५.०३
	एकुण	१००	६४	१२	१७६	१.५०	१२३.३९

स्त्रोतः प्रश्नावली

तक्ता क्र. ४.४१ मध्ये, शारिरीक समस्या, शारिरीक ताणतणाव, आरोपी विरोधाभास निर्माण केला जातो. शारिरीक असमर्थपणा, चांगल्याप्रकारची वागणूक नाही व लैंगिक छळ अश्या समस्यांचाभारांकीत सरासरी काढली आहे. मोठया प्रमाणात १=१ ने भारांकीत केले आहे. कमी प्रमाणात २=२ ने भारांकीत केले तर मूळीच नाही. ३=३ ने भारांकीत केले. या सर्व समस्यांमध्ये लैंगिक छळ याची भारांकीत सरासरी १.८८सर्वात जास्त आहे. प्रमाण विचलन ३०.०७ सगळयात जास्त शारिरीक ताणतणाव या समस्येचे आहे.

४.२.४२ एकल स्त्रियांच्या मानसिक समस्या

एकल स्त्रियांच्या मानसिक समस्येचा अभ्यास करताना सहा समस्या विचारात घेतल्या आहेत. १. मोठया प्रमाणात २. कमी प्रमाणात तर ३. मूळीच नाही. असा दिला आहे. या समस्यांचे विवरण पुढील तक्त्यामध्ये मांडण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक ४.४२

एकल स्त्रियांच्या मानसिक समस्या

अ. न.	मानसिक समस्या	तीव्रता			एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही			
१	अविवाहीत असल्याने भावनिक ताण जाणवतो	२३	१७	६	४६	१.६३	३१.३७
२	असुरक्षितता	५	९	३	१८	१.६४	११.५७
३	अवस्थता	९	७	४	२०	१.७५	१२.९१
४	नैराश्य निराशा	२९	७	३	२९	१.३३	१९.५७
५	एकटेपणा	२८	८	०	३६	१.२२	२४.५९
६	कनिष्ठ वागणूक	९	५	३	१७	१.९४	१०.६५
	एकुण	१०३	५३	१९	१७६	१.५१	१२३.३८

स्त्रोत: प्रश्नावली

तक्ता क्र. ४.४२ मध्ये, अविवाहित असल्याने भावनिक ताण जाणवतो, असुरक्षितता, अस्वस्थता, नैराश्य, एकटेपणा व कनिष्ट वागणूक अशा समस्यांची भारांकीत सरासरी काढली आहे. मोठया प्रमाणात १=१ ने भारांकीत केले आहे. कमी प्रमाणात २=२ ने भारांकीत केले तर मूळीच नाही. ३=३ ने भारांकीत केले आहे. या समस्यामध्ये अस्वस्थता १.७५ याची भारांकीत सरासरी सर्वात अधिक दिसून आली. प्रमाण विचलन ३१.३७ सगळयात जास्त अविवाहित असल्याने ताणतणाव या मानसिक समस्येचे दिसून आले.

४.२.४३ एकल स्त्रियांच्या सामाजिक समस्या

एकल स्त्रियांच्या सामाजिक समस्या जाणून घेताना ५ समस्यांवर पसंती क्रमांक घेतला आहे. १. मोठया प्रमाणात २. कमी प्रमाणात तर ३. मूळीच नाही. असा दिला आहे. सामाजिक समस्या पुढील तक्त्यामध्ये स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

तक्ता क्रमाक ४.४३

एकल स्त्रियांच्या सामाजिक समस्या

अ. न.	सामाजिक समस्या	तीव्रता			एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही			
१	कौटुंबिक भावनेचा अभाव	८	७	३	१८	१.७२	११.५१
२	नातेवाईकांकडून शोषण	५	६	२	१३	१.७६	१९.४६
३	सामाजिक कलंक	१०	८	३	२१	१.६६	१३.६८
४	सामाजिक बहिष्कार	३३	२३	३	५९	१.४९	४०.६७
५	सामाजिक कार्यामध्ये सहभाग नाही	४३	१३	९	६५	१.४७	४४.९२
	एकुण	९९	५७	२०	१७६	१.५५	१२३.३५

स्त्रोत: प्रश्नावली

तक्ता क्र. ४.४३ मध्ये सामाजिक समस्या कौटुंबिक भावनेचा अभाव, नातेवाईकांकडून शोषण, सामाजिक कलह, सामाजिक बहिष्कार व सामाजिक कार्यात सहभाग नाही. इत्यादी समस्यांना पसंत क्रमांक देऊन भारांकीत सरासरी काढण्यात आली. मोठया प्रमाणात १=१ ने भारांकीत केले आहे. कमी प्रमाणात २=२ ने भारांकीत केले तर मूळीच नाही. ३=३ ने भारांकीत केले आहे. नातेवाईकाकडून शोषण यांची भारांकीत सरासरी १.७६ इतरांपेक्षा जास्त आली. प्रमाण विचलन ४४.९२ हे सामाजिक कार्यात सहभाग नाही याचे सर्वात जास्त आले.

४.२.४४ एकल स्त्रियांच्या आर्थिक समस्या

एकल स्त्रियांच्या चरितार्थाचा प्रश्न हा त्यांना सतत जाणवतो. त्यासाठी आर्थिक समस्यांचा सामना त्यांना करावा लागतो. हया समस्या जाणून घेण्यासाठी पाच पसंती क्रमांक आर्थिक समस्यांना देण्यात आले आहेत. याचा तपशिल पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.४४

एकल स्त्रियांच्या आर्थिक समस्या

अ.न.	सामाजिक समस्या	तीव्रता			एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही			
१	आर्थिक ताण	४५	११	०	५६	१.१९	३८.७६
२	कर्जबाजारीपणा	१३	१२	२	२७	१.५९	१७.९७
३	अपुरे उत्पन्न साधने	२४	११	४	३९	१.३८	२६.६०
४	बॅकाकडून साहाय्य नाही	१२	११	३	२६	१.२३	१७.५२
५	इतर	११	१३	४	२८	१.३५	१८.८५
	एकुण	१०५	५८	१३	१७६	१.४८	१२३.४१

स्त्रोत: प्रश्नावली

तक्ता क्र. ४.४४ मध्ये आर्थिक समस्यांना मोठया प्रमाणात १=१ ने भारांकीत केले आहे. कमी प्रमाणात २=२ ने भारांकीत केले तर मूळीच नाही. ३=३ ने भारांकीत केले आहे. यावरुन भारांकीत सरासरी काढली आहे. ही भारांकीत सरासरी १.७६ ही सर्वात जास्त नातेवाईकाकडून शोषण या समस्येस आहे तर प्रमाण विचलन ३८. ७६ हे आर्थिक ताण या समस्येचे आहे.

४.२.४५ समस्येवरती उपाययोजना

एकल स्त्रियांच्या निर्माण होणाऱ्या सर्व समस्यांवर उपाययोजना पसंती क्रमांक घेण्यात आला. यामध्ये १५ उपाययोजनांवर पसंती क्रमांक घेतला असता. अनेक वेळा १, काही वेळा २ व आजिबात नाही ३ क्रमांक देण्यात आला. याचा अभ्यास पुढील तक्त्यामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्रमाक ४.४५
समस्येवरती उपाययोजना

अ. न.	उपाय	वारंवारिता			एकुण	भारांकीत सरासरी	प्रमाण विचलन
		अनेक वेळा	काही वेळा	मूळीच नाही			
१	गाणी ऐकणे	१०३	३०	४३	१७६	१.६५	१२३.२८
२	टी.व्ही. पाहणे	१२२	३१	२३	१७६	१.४३	१२३.४४
३	वाचन	९५	५	७६	१७६	१.८९	१२३.१२
४	घराची सजावट	३३	५५	८८	१७६	२.३१	१२२.८२
५	नातेवाईकांची भेट	७४	६८	३४	१७६	१.७७	१२३.१९
६	खेळ खेळणे	०	१०	१६६	१७६	२.९४	१२३.३७
७	इतराची मदत घेणे	५४	८९	३३	१७६	१.८८	१२३.१२
८	क्लब सामाजिक संस्था	२५	४	१४४	१७६	२.०७	१२०.८७
९	कामात मग्न होणे	१३३	२३	२०	१७६	१.३५	१२३.५०
१०	धार्मिक उपक्रम	०	१६	१६०	१७६	२.९०	१२२.४०
११	सहलीला जाणे	३३	१९	१२४	१७६	२.५१	१२२.६७
१२	वर्तमानपत्रासाठी लिखाण	५	२	१६९	१७६	२.९४	१२२.३७
१३	मित्रासोबत वेळ घालवने	१७	३६	१२३	१७६	२.६०	१२२.६१
१४	छोटासा व्यवसाय सुरु करणे	३२	६४	८०	१७६	२.२७	१२२.८५
१५	वयोवृद्ध आणि मुलांशी संवाद साधणे.	१०२	६४	१०	१७६	१.४७	१२३.४१
	एकुण						

स्त्रोत: प्रश्नावली

तक्ता क्र. ४.४५ मध्ये, स्वत:च्या अडचणी व समस्या सोडवण्यासाठी त्यांच्याकडून गाणी ऐकणे, टी.व्ही. पाहणे, वाचन, घराची सजावट, नातेवाईकांना भेट, खेळ खेळणे, इतरांची मदत घेणे, क्लब व सामाजिक संस्था, कामात मग्न, धार्मिक कार्यात सहभाग, सहलीला जाणे, वर्तमान पत्रातील लिखान, मित्रांसोबत वेळ घालवणे, छोटा व्यवसाय सुरु करणे, वयोवृद्ध व मुलांशी संवाद साधने अशा उपायांना पसंती क्रमांक देण्यात आले आहेत. त्या पसंती क्रमांकामध्ये अनेक वेळा १=१ ने, काही वेळा २=२ व अजिबात नाही ३=३ ने भारांकीत केले. या भारांकांची सरासरी काढण्यात आली. या भारांकीत सरासरीमध्ये वर्तमानपत्रातील लिखानच सर्वात जास्त २.९४ आली आहे. प्रमाण विचलन १२३.४४ टि. व्ही. पाहणे यासाठी आले आहे.

४.३ उद्दिष्टे चाचणी

पुढील तक्त्यामध्ये उद्दिष्टांची पूर्तता दर्शविली आहे. उद्दिष्ट निहाय तक्ता क्रमांक ही दर्शविला आहे.

तक्ता क्रमाक ४.४६

उद्दिष्टे चाचणी

अ.न.	उद्दिष्ट	संदर्भ तक्ता	शेरा
१	एकल स्त्रियांना एकटे आयुष्य जगण्याच्या कारणांचा अभ्यास करणे.	तक्ता क्रमाक ४.२४	परीपूर्ण
२	अभ्यास क्षेत्रातील एकल स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.	तक्ता क्रमाक ४.१२ तक्ता क्रमाक ४.१३ तक्ता क्रमाक ४.१४ तक्ता क्रमाक ४.१५ तक्ता क्रमाक ४.१७ तक्ता क्रमाक ४.२७ तक्ता क्रमाक ४.२८ तक्ता क्रमाक ४.३२ तक्ता क्रमाक ४.३३ तक्ता क्रमाक ४.३८	परीपूर्ण
३	एकल स्त्रियांच्या सामाजिक स्थान अथवा दर्जाचा अभ्यास करणे.	तक्ता क्रमाक ४.१ तक्ता क्रमाक ४.२ तक्ता क्रमाक ४.३ तक्ता क्रमाक ४.४ तक्ता क्रमाक ४.५ तक्ता क्रमाक ४.६	परीपूर्ण
४	एकल स्त्रियांच्या बाबतीत शासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.	तक्ता क्रमाक ४.७ तक्ता क्रमाक ४.४०	परीपूर्ण
५	तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे	तक्ता क्रमाक ४.१८ तक्ता क्रमाक ४.२० तक्ता क्रमाक ४.२१ तक्ता क्रमाक ४.४१, तक्ता क्रमाक ४.४२, तक्ता क्रमाक ४.४३, तक्ता क्रमाक ४.४४	परीपूर्ण
६	अभ्यास क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या समस्येवर उपाययोजना सुचविणे.	तक्ता क्रमाक ४.२३ तक्ता क्रमाक ४.४५	परीपूर्ण

१. एकल स्त्रियांना एकटे आयुष्य जगण्याच्या कारणांचा अभ्यास करणे. या उद्दिष्टाची तक्ता क्रमाक २.२४ मध्ये पूर्तता होते.

२. अभ्यास क्षेत्रातील एकल स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे. हे उद्दिष्ट तक्ता क्रमाक ४.१२ , ४.१३ , ४.१४ , ४.१५ , ४.१७ , ४.२७ , ४.२८ , ४.३२ , ४.३३ , ४.३८ मध्ये दिसून येते.

३. एकल स्त्रियांच्या सामाजिक स्थान अथवा दर्जाचा अभ्यास करणे.या उद्दिष्टाची पूर्तता तक्ता क्रमाक ४.१ , ४.२ , ४.३ , ४.४ , ४.५ , ४.६ मध्ये आहे.

४. एकल स्त्रियांच्या बाबतीत शासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे. हे उद्दिष्ट तक्ता क्रमाक ४.७, ४.४०मध्ये पूर्ण होते.

५. तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे. हे उद्दिष्ट तक्ता क्रमाक ४.१८ , ४.२० , ४.२१ , ४.४१, ४.४२, ४.४३, ४.४४ मध्ये दिसून येते.

६. अभ्यास क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या समस्येवर उपाययोजना सुचविणे. हे उद्दिष्ट तक्ता क्रमाक तक्ता क्रमाक ४.२३ , ४.४५ मध्ये पूर्ण होते.

४.४ गृहितकाची चाचणी

१. एकल स्त्रियांचा सर्वसमावेशक विकास झालेला नाही. (तक्ता क्रमाक ४.४०)

खालील तक्ता Z चाचणीच्या सहाय्याने एकल स्त्रियांच्या सर्वसमावेशक विकासाविषयक पाच मोजमापांचा उपयोग केला आहे.

तक्ता क्रमाक ४.४७

संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	Z स्कोर	
			मध्यमान	प्रमाण विचलन
५	३५.२०	२२.६३	0E-7	१.००

वरील तक्त्यामध्ये पाच घटकांची सरासरी ३५.२० आहे तर प्रमाण विचलन २२.६३ आले आहे.

२. एकल स्त्रियांच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहेत.

(तक्ता क्रमाक ४.४१, , ४.४२, , ४.४३, , ४.४४,)

तक्ता क्रमाक ४.४८

एकल स्त्रियांच्या शारीरिक समस्या (६)

संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	Z स्कोर	
			मध्यमान	प्रमाण विचलन
१७६	१६.६७	७.३३	0E-7	१.००
१७६	१०.६७	५.०९	0E-7	१.००
१७६	२.००	१.१०	0E-7	१.००

एकल स्त्रियांच्या सहा प्रकारच्या शारिरीक समस्यांची सरासरी २९.३४ इतकी आली आहे तर प्रमाण विचलन १३.५२ इतके आले आहे.

तक्ता क्रमाक ४.४९

एकल स्त्रियांच्या मानसिक समस्या (६)

संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	Z स्कोर	
			मध्यमान	प्रमाण विचलन
१७६	१७.१७	१०.७०	0E-7	१.००
१७६	८.८३	४.२१	0E-7	१.००
१७६	३.१६	१.९४	0E-7	१.००

एकल स्त्रियांच्या सहा प्रकारच्या मानसिक समस्यांची सरासरी २९.१६ इतकी आली आहे तर प्रमाण विचलन १६.८५ इतके आले आहे.

तक्ता क्रमाक ४.५०

एकल स्त्रियांच्या सामाजिक समस्या (५)

संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	Z स्कोर	
			मध्यमान	प्रमाण विचलन
१७६	१७.१७	१६.०८	0E-7	१.००
१७६	८.८३	७.०२	0E-7	१.००
१७६	२.१६	२.८३	0E-7	१.००

एकल स्त्रियांच्या पाच प्रकारच्या सामाजिक समस्यांची सरासरी २८.१६ इतकी आली आहे तर प्रमाण विचलन १५.८५ इतके आले आहे.

तक्ता क्रमाक ४.५१

एकल स्त्रियांच्या आर्थिक समस्या (५)

संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	Z स्कोर	
			मध्यमान	प्रमाण विचलन
१७६	२१.००	१४.४०	0E-7	१.००
१७६	११.६०	०.८९	0E-7	१.००
१७६	२.६०	१.६७	0E-7	१.००

एकल स्त्रियांच्या पाच प्रकारच्या आर्थिक समस्यांची सरासरी ३५.२० इतकी आली आहे तर प्रमाण विचलन १६.९६ इतके आले आहे.

३) **सामाजिक कार्यामध्ये एकल स्त्रिया फारसा सहभाग घेत नाहीत.**

(तक्ता क्रमाक ४.४३)

तक्ता क्रमाक ४.५२

संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	Z स्कोर	
			मध्यमान	प्रमाण विचलन
१७६	२१.६७	१८.५८	0E-7	१.००

एकल स्त्रियांच्या सामाजिक कार्यातील सहभाग नसलेली सरासरी २१.६७ इतकी आली आहे तर प्रमाण विचलन १८.५८ इतके आले आहे.

४) **एकल स्त्रियांचे आर्थिक उत्पन्न कमी आहे. (तक्ता क्रमाक ४.३३)**

तक्ता क्रमाक ४.५३

संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	Z स्कोर	
			मध्यमान	प्रमाण विचलन
१७६	३५.२०	३५.६८	0E-7	१.००

एकल स्त्रियांच्या आर्थिक उत्पन्नाची सरासरी ३५.२० इतकी आली आहे तर प्रमाण विचलन ३५.६८ इतके आले आहे.

४.५ उपसंहार

सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. एकल स्त्रियांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती खालावलेली आहे असे अभ्यासाअंती दिसून आले. विकासामधला एक महत्वाचा अडथळा म्हणून एकल स्त्रियांच्या न झालेल्या विकासाकडे पाहिले जाते.

प्रकरण : पाचवे

निष्कर्ष आणि शिफारशी

५.१ प्रस्तावना

५.२ निष्कर्ष

५.३ उपाययोजना

५.४ उपसंहार

प्रकरण : पाचवे

निष्कर्ष आणि शिफारशी

५.१ प्रस्तावना

आपल्या समाजात एकल महिलेला अपमानित जिणं जगावं लागतं. पुरूषसत्ताक मानसिकतेच्यामुळे तीला शोषित,दुर्लक्षित आाणि वंचित व्हावं लागत. रूढीपरंपरा यांची जोखड तिच्या मानेभोवती असते आणि अनेकवेळा शारीरिक,मानसिक व लैंगिक अत्याचाराची ती बळी ठरते. सामाजिक परिवर्तन व्हावे आणि एकल महिलांना सन्मानाने जगता यावं म्हणून यावर विचारमंथन होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या समस्या मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

५.२ निष्कर्ष

१. तासगाव तालुक्यातील वय वर्षे ४१ ते ६० गटातील स्त्रिया एकल जीवन जगत असल्याचे प्रमाण जास्त आहे. वयाच्या वाढीबरोबर यांचे एकल जीवन जगणे व आयुष्याच्या समस्यांचा सामना करणे त्यांना गरजेचेच आहे.**(तक्ता क्रमांक ४.२)**

२. हिंदू धर्मातील स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे १७६ मध्ये ९८ (५६.६८टक्के) एवढे आहे. त्यानंतर मुस्लीम धर्मातील स्त्रीयांचे प्रमाण इतर धर्मातील स्त्रियांच्या तुलनेत अतिशय कमी आहे. **(तक्ता क्रमांक ४.३)**

३. जात निहाय वर्गवारीमध्ये सर्वसाधारण गटातील स्त्रिया तासगाव तालुक्यामध्ये एकल जीवन व्यतीत करणा—यांचे प्रमाण इतर जातनिहाय वर्गापेक्षा अधिक म्हणजे ६७ आहेत. **(तक्ता क्रमांक ४.४)**

४. तासगाव तालुक्यातील १२५ (७६.७०टक्के) विवाहित एकल स्त्रिया आहेत. वैवाहिक स्थिती जाणताना एकही गटवारीमध्ये स्त्रिया नाहीत असे स्पष्ट चित्रण या अभ्यासा दरम्यान दिसत आहे. **(तक्ता क्रमांक ४.५)**

५. साक्षर व निरक्षरता प्रमाण हे जवळजवळ ६:४ म्हणजे ३:२ असल्याचे दिसत आहे. शैक्षणिक विकास या स्त्रियांचा झालेला नाही. **(तक्ता क्रमांक ४.६)**

६. एकल स्त्रियांची शैक्षणिक पात्रता धारण क्षमता ६७(६३.८१टक्के)एस.एस.सी. आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता कमी असल्याचे दिसते तरी १२ स्त्रिया पद्वी व ५ स्त्रिया पदव्यूत्तर शिक्षण घेतलेल्या असले तरी एकल जीवन व्यतीत करत आहेत. **(तक्ता क्रमांक ४.७)**

७. एकल स्त्रिया रेशनकार्ड धारक, आधारकार्ड वापर, व मतदान कार्ड असणा—या पूर्ण म्हणजे १७६ स्त्रिया आपल्या जीवनामध्ये करत आहेत. १७६ स्त्रियांपैकी फक्त ७ स्त्रियाच पॅनकार्डचा वापर करत आहेत. **(तक्ता क्रमांक ४.८)**

८. भ्रमणध्वनीचा वापर करणा—या एकल स्त्रियांपेक्षा न वापर करणा—या स्त्रियांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. कारण त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे त्या आपल्या जीवनात भ्रमणध्वनीचा वापर करु शकत नाहीत. **(तक्ता क्रमांक ४.९)**

९. एकटेपणविषयी ६७(३८.०६ टक्के) स्त्रियांनी कारण सांगण्यास नकार दिला.. **(तक्ता क्रमांक ४.१०)**

१०. तासगाव तालुक्यातील ९७(५५.११ टक्के) स्त्रिया एकल जीवन जगण्यासाठी असमाधानी असल्याचे दिसून येते. एकूण एकल स्त्रियांमध्ये असमाधानी असलेल्या स्त्रियांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

(तक्ता क्रमांक ४.११)

११. स्वत:चा विवाह करावा असे कुटूंबाकडून ९७ (५५.११ टक्के) स्त्रियांनी सांगण्यात आले आहे. काही स्त्रियांचा प्रथम विवाह केलेला नाही तो करावा व काहींचा पुर्नविवाह करावा असे कुटूंबाकडून सांगण्यात येत आहे. पण ४५ स्त्रियांना वयोमानानुसार व धार्मिक निर्बंधामुळे विवाह करणे शक्य नाही.

(तक्ता क्रमांक ४.१२)

१२. एकत्र कुटूंब पद्धतीमध्ये आपले बालपण व लग्नानंतरचे आयुष्य १४४ (८१.८२ टक्के) स्त्रिया घालवणा—या असल्याचे दिसून आले. विभक्त कुटूंब पद्धतीतील स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे.

(तक्ता क्रमांक ४.१४)

१३. एकूण एकल स्त्रियापैकी १६३ (९२.६१ टक्के) स्त्रिया ग्रामीण भागात राहत आहेत. एकल स्त्रियांची संख्या गावात जास्त असल्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. जीवनाच्या प्रत्येक प्रसंगावर त्यांचा प्रभाव अधिक असल्याचे दिसून येत आहे. **(तक्ता क्रमांक ४.१५)**

१४. आजही ७०(३९.७८ टक्के) महिला स्वयंपाकासाठी चुलीचा वापर करत आहेत. ग्रामीण भागामध्ये स्वयंपाकासाठी चुलीचा वापर केल्याचे दिसून येत आहे. **(तक्ता क्रमांक ४.१६)**

१५. सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणी उपलब्ध होत आहे. तर ३७ स्त्रियांना पुरेशाप्रमाणात पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. एकल स्त्रियांना विहीरी, कूपनलिका, तलाव या ठिकाणाहून पाणीपुरवठा उपलब्ध करावा लागत आहे. **(तक्ता क्रमांक ४.१७)**

१६. स्वत:च्या आर्थिक परिस्थितीनुसार भाडे तत्वावर ३७ एकल स्त्रियानी निवास व्यवस्था उपलब्ध केली आहे. **(तक्ता क्रमांक ४.१८)**

१७. एकल स्त्रियांना स्वत:च्या आरोग्यासाठी १५१(८५.८ टक्के) जणींना शासकीय सुविधा उपलब्ध होत आहेत. सार्वजनिक आरोग्य सेवा ठराविक महिला स्वत:च्या आरोग्याची काळजी घेताना दिसत आहेत. जास्तित जास्त महिला आरोग्य सेवांसाठी शासकीय आरोग्य केंद्राचा वापर करताना दिसून येत आहे. **(तक्ता क्रमांक ४.२०)**

१८. कुटूंब कर्त्याच्या भूमिका पार पाडताना ८५ (४८.२९ टक्के) आर्थिक समस्या सोडवण्याची अडचण भासत आहे. मानसिक आघाताचा सामना अधिक प्रमाणात सोसल्यामुळे त्यांच्या समस्या वाढतच आहेत.**(तक्ता क्रमांक ४.२१)**

१९. पुरुषप्रधान संस्कृतिचा बडगा ५६ (३१.८२ टक्के) स्त्रियांना सोसावा लागत आहे. स्त्री म्हणून अनेक समस्यांचा सामना करुन त्या आपले आयुष्य व्यतीत करताना दिसत आहेत. **(तक्ता क्रमांक ४.२२)**

२०. एकल स्त्रियांची मनोबल वाढवण्यासाठी ६७ (३८.०७ टक्के) निमशासकीय संस्थांनी मदत केली आहे. **(तक्ता क्रमांक ४.२३)**

२१. एकल स्त्रियांच्या कौटुंबिक स्थितीचे वर्णनमध्ये सगळयात जास्त १.५० भारांकीत सरासरी ही कोणत्याही कार्यक्रमामध्ये सहभाग घेता यावा याला तर प्रमाण विचलनामध्ये सगळयात जास्त २४. ४१६ एवढे आपल्या विषयी कोणही तपासणी करु नये याला आहे.**(तक्ता क्रमांक ४.२४)**

२२. एकटेपणा जगण्यापाठीमागील कारणमीमंसा सर्व कारणांमध्ये पुढील अभ्यासक्रम पूर्तता याचा भारांकीत सरासरी २.१० इतका आहे तर सर्वात जास्त प्रमाण विचलन १५.९४ हे बौद्धिक कामांना प्राधान्याचे आहे.

(तक्ता क्रमांक ४.२५)

२३. आपल्या चरितार्थासाठी १९.८९टक्क एकल स्त्रियांना जीवनाचा चरितार्थ नोकरी करुन आर्थिक तरतूद उभी करवी लागत आहे. १४१ (८०.११ टक्के) स्त्रिया नोकरी करत नाहीत. **(तक्ता क्रमांक ४.२६)**

२४. एकल स्त्रिया खाजगी संस्थामध्ये कार्यरत आहेत. खाजगी संस्थामध्ये नोकरी करणाऱ्या १५ (४२.८५ टक्के) ह प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसत आहे. **(तक्ता क्रमांक ४.२७)**

२५. कोणासोबत वेळ घालवायचा १२३ (६९.८८ टक्के) स्त्रियांना वेळ जरी असला तरी त्यांना ही समस्या आहे. कारण त्यांना सामाजिक ऋणानुबंध निर्माण होणारे असे कोणीही त्यांच्या आयुष्यात आलेले नाही. तसेच कुटूंब पण तेवढा आदरयुक्त वर्तणूक देत नाही. **(तक्ता क्रमांक ४.२९)**

२६. स्त्रियांच्या नवनविन ज्ञान, माहिती जिज्ञासेने वाढवण्यासाठी ५३ (३०.११ टक्के) करमणूक म्हणून टी.व्ही. पाहतात. कष्ट करुन येणा—या थकवा

घालवण्यासाठी मनातील मळभ काढण्यासाठी स्वत:च्या सोईनुसार व मानसिकतेनुसार प्रत्येकीला वेळेचा सद्उपयोग करण्यास योग्य वाटल्याचे दिसून येते. **(तक्ता क्रमांक ४.३०)**

२७. आर्थिक समस्या ५३ (३०.११ टक्के) स्त्रियांना जाणवते. त्यावेळी आर्थिक हातभार लावणारे अथवा सहाय्य करणारे कोणीतरी उभे राहावे असे वाटते. सर्व अपेक्षामध्ये आर्थिक अपेक्षा ही सर्वात जास्त जणींना आहे असे दिसून येते. **(तक्ता क्रमांक ४.३१)**

२८. कोणत्याही संस्थेचे सभासदत्व ११५ (६५.३४ टक्के) एकल स्त्रियांना नाही. त्यांना आपल्यासाठी अशा संस्था मार्फत काही सहाय्य केले जाते अथवा मदत केली जाते यांची महिती नाही. **(तक्ता क्रमांक ४.३३)**

२९. वार्षिक उत्पन्न २५००० रुपयांपेक्षा कमी असणा—या संख्या ८४ (४७.७ टक्के) आहे. ७५००१ ते १०,०००० एवढे जास्त उत्पन्न असणा—या ३ (१. ७० टक्के) एकल स्त्रिया आहेत. एकूण एकल स्त्रियांचे उत्पन्न हे दारिद्रय रेषेच्या खाली आहे. **(तक्ता क्रमांक ४.३४)**

३०. शेती व शेती पूरक व्यवसाय १२० (६८.१८ टक्के)एकल स्त्रिया करतात. भाजीपाला निर्मिती, विक्री, अन्नधान्य निर्मिती व विक्री, शेळी पालन, कुक्कुट पालन, पशुपालन दुग्ध व्यवसाय स्वत:साठी उत्पन्न प्राप्त करतात. **(तक्ता क्रमांक ४.३५)**

३१. मिळणारे उत्पन्न १४१ (८०.१२ टक्के))एकल स्त्रियाना त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पुरेसे प्राप्त होतेच असे नाही. मिळणारे सर्वांचे उत्पन्न हे

दारिद्रय रेषेखालील आहे. त्यामुळे त्यांना आर्थिक सहाय्याची गरज भासते. **(तक्ता क्रमांक ४.३६)**

३२. नातेवाईकांकडून मदत घेणाऱ्या ४१ (२३.२८टक्के) एकल स्त्रिया आहेत. **(तक्ता क्रमांक ४.३७)**

३३. बचत गटाच्या सदस्य १२१ (६८.७५ टक्के) एकल स्त्रिया आहेत. तसेच त्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, ऑडिटर, सदस्य अशा विविध पदावर कार्य करतात. **.(तक्ता क्रमांक ४.३८)**

३४. शेती ८८(५०.०० टक्के) एकल स्त्रिया करतात. तसेच शेतमजूर म्हणून शेतामध्ये काम करतात. **(तक्ता क्रमांक ४.३९)**

३५. मनरेगा योजनेचा लाभ ३२ (१८.१८टक्के) एकल स्त्रिया घेतात. **(तक्ता क्रमांक ४.४०)**

३६. एकल स्त्रियांच्या शारीरिक समस्यांमध्ये लैंगिक छळ याची भारांकीत सरासरी १.८८सर्वात जास्त आहे. प्रमाण विचलन ३०.०७ सगळयात जास्त शारिरीक ताणतणाव या समस्येचे आहे. **(तक्ता क्रमांक ४.४१)**

३७. एकल स्त्रियांच्या मानसिक समस्यांमध्ये नातेवाईकाकडून शोषण यांची भारांकीत सरासरी १.७६ इतरांपेक्षा जास्त आली. प्रमाण विचलन ४४.९२ हे सामाजिक कार्यात सहभाग नाही याचे सर्वात जास्त आले.

(तक्ता क्रमांक ४.४३)

३८. एकल स्त्रियांच्या आर्थिक समस्यांमध्ये भारांकीत सरासरी १.७६ ही सर्वात जास्त नातेवाईकाकडून शोषण या समस्येस आहे तर प्रमाण विचलन ३८. ७६ हे आर्थिक ताण या समस्येचे आहे. **(तक्ता क्रमांक ४.४४)**

३९. एकल स्त्रियांच्या निर्माण होणाऱ्या सर्व समस्यांवर उपाययोजनांमध्ये भारांकीत सरासरीमध्ये वर्तमानपत्रातील लिखानच सर्वात जास्त २.९४ आली आहे. प्रमाण विचलन १२३.४४ टि. व्ही. पाहणे यासाठी आले आहे.

`(तक्ता क्रमांक ४.४६)

५.३ उपाययोजना

स्त्रियांच्या समस्यांचा विचार केल्यास वर्षानुवर्ष या स्त्रिया अंधारातच जीवन जगत आहे. त्यांना न्याय हक्क मिळत नाही. ते मिळणे आवश्यक आहे एकल स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी खालील उपाययोजना करणे गरजेचे वाटते.

१. अशिक्षितपणा हे स्त्रियांपुढील समस्येचे प्रमुख कारण आहे. त्यामुळेच स्त्री साक्षरता वाढविण्याच्या दृष्टीकोणातून ग्रामीण भागात विशेष प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी प्रत्येक खेडेगावात शाळा, स्त्रीयाना ग्रामीण उद्योगशिक्षण, शिक्षित स्त्रीयांसाठी स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी, त्याच प्रमाणे स्त्री शिक्षण सक्तीचे करावे. खेडयातील मुलींना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शहरात अशा ग्रामीण मुलींसाठी वसतीगृहे असावीत व त्याचा खर्च शासनाने उचलावा.

२. शिकलेली स्त्री ही आदर्श समाज घडवू शकते असे नागरी व ग्रामीण भागातील स्त्री संघटनांनी अशिक्षित एकल स्त्रीयांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे.

३. स्त्रीयांना कौटुंबिक गुलामगिरीतून सोडवण्यासाठी तीला आर्थिक दृष्टया स्वावलंबी करणे आवश्यक आहे. शिवणकाम, भरतकाम, हस्त कौशल्याच्या वस्तू यासारखे प्रशिक्षण वर्ग ग्रामीण आणि शहरी भागातील एकल स्त्रीयांसाठी सरकारने सुरु केले पाहिजे.

४. नोक—यामधील सरकारने एकल स्त्रीयांना राखीव जागा ठेवणे शिक्षणाचा प्रसार वाढविण्याच्या दृष्टीने हा एक चांगला उपाय ठरु शकतो.

५. कायदेविषयक ज्ञान एकल स्त्रीयांना होण्यासाठी सरकारने टी.व्ही., इंटरनेट, मोबाईल यासारख्या प्रसारमाध्यमांचा योग्य वापर करावा.

६. नागरी भागातील महिला संघटनांनी ग्रामीण महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू शहरी भागात विकण्याची विक्री व्यवस्था उभारावी. त्यासाठी सरकारने पूर्ण सहकार्य केले पाहिजे. त्यामुळे ग्रामीण एकल स्त्रीयांच्या उद्योगशिलतेला वाव मिळेल. त्या आर्थिक दृष्टया स्वावलंबी होतील.

७. उद्योगप्रधान विशेष अभ्यासक्रम एकल स्त्रीयांसाठी सुरु करावीत व त्याची व्यवस्था ग्रामीण व शहरी भागात व्हावी.

८. आरोग्य विषयक जागृती करण्याच्या दृष्टीकोनातून स्वच्छता, प्राथमिक उपचार, लसीकरण यासारख्या कार्यक्रमात ग्रामीण एकल स्त्रीयांच्या सहभागी करुन घ्यावे.

९. ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेतील वातावरण संतुलीत राहाण्यासाठी पोषक वातावरण तयार करावे यासाठी एकल स्त्रीया व स्वयंसेवी संघटनानी पुढाकार घ्यावा.

१०. आधुनिक स्वयंपाक घरातील साधने ग्रामीण लोकांपर्यंत पोहचतील. ज्यामुळे ग्रामीण एकल स्त्रियांचा स्वयंपाक घरातील त्रास कमी होईल या दृष्टीने प्रयत्न करावे. त्यासाठी गोबर गॅस, निरधूर चुली सौर ऊर्जा कुकर यांचा वापर ग्रामीण भागात काढण्यासाठी सरकारने गरीबांसाठी १००टक्के अनुदान दान द्यावे. इंधनासाठी जी वृक्ष तोड होते ती होणार नाही. निसर्गसमतोलासाठी त्याचा उपयोग होईल.

११. ग्रामीण विकास कार्यक्रमातंर्गत ज्या योजना राबविल्या जातात. त्यात एकल स्त्रियांना सहभागी करुन घ्यावे. ग्रामीण भागात वृक्ष लागवड, वनसंवर्धन यासारखी कामे त्यांना द्यावी. त्यामुळे वनसंवर्धन योग्य त—हेने होऊन पर्यावरण समतोलासही मदत होईल.

१२. ग्रामीण भागात पाच हजार वस्ती असलेल्या गावात महिला विकास बॅकेची स्थापना करावी. त्या बॅकेमार्फत त्या जवळच्या लहान खेडयातील महिलांना स्वयंरोजगरासाठी कर्जपुरवठा करावा. त्या बॅकेवर स्थानिक महिलांचेच व्यवस्थापन मंडळ असावे. कर्ज घेऊन महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची खरंदी शासनाने करुन विक्री करावी. स्वयंरोजगारी व्यवसायाला चालना मिळेल व महिलांना आर्थिक कौटुंबिक, सामाजिक, स्थान प्राप्त होईल.

१३. ''समान—कार्य समान—वेतन'' या कायद्यान्वये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वेतन देण्याची तरतूद आहे. या कायद्याची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणे शक्य नाही त्यांना विविध प्रकारचे व्यावसायिक अभ्यासक्रम देणे महत्त्वाचे आहे.

१४. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक या सर्वच क्षेत्रात स्त्रिया मागे असल्यामुळे विकासाच्या योजनांचा फायदा घेण्याची त्यांची क्षमता मर्यादित असते. योजनांचा फायदा स्त्रियांना भरपूर मिळावा यासाठी योजनेचा आराखडा तयार करणे, अंमलबजावणी व मूल्यमापन या सर्व यंत्रणेत स्त्रियांची बरोबरीची भागेदारी असणे आवश्यक ठरते.

१५. एकल स्त्रियांना कुटुंबात व बाहेर अशा दोन्ही जबाबदा—या एकटीने पेलाव्या लागतात, हे लक्षात घेऊन सरकारी कागदपत्रे, पुरावे, दाखले तसेच विविध योजना यांचा लाभ कमी कष्टात घेता यावा, यादृष्टीने त्यांना विशेष ओळखपत्र, देण्यासंदर्भात शासन विचार करेल.

१६. एकल स्त्रीयाचा सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालयांस त्यांच्या अर्जांचा प्राधान्याने व संवेदनशीलतेने विचार व्हावा, यादृष्टीने अधिकारी कर्मचा—यांमध्ये त्यांच्या प्रशिक्षणावेळी जागृती निर्माण केली जाईल.

१७. कुटुंब प्रमुख म्हणून महिलेचे नाव नमूद करण्याची अनेक सरकारी कर्मचारी, अधिका—यांची मानसिकता नसते. एकल स्त्रीया अनेकदा संपत्ती व मालमत्ता यावरील अधिकार तिला गमवावा लागतो. हे लक्षात घेऊन कुटूंब प्रमुख महिला ही संकल्पना रुजविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी.

१८. पितृसत्ताक समाज व्यवस्थेमुळे सर्व वर्गवारीतील एकल महिला बाबत मातेचे नाव आडनाव व तिच्या जैविक आपत्यांची नावे, आडनावे यांच्यात फरक आढळून येतो. यास्तव त्यांना केवळ मनस्तापातून जावे लागते असे नाही, तर आपले अधिकार हक्क मिळवणे कठीण व गुंतागुंतीचे होते. हे लक्षात घेता त्यांना कोणतेही प्रमाणपत्र, दाखला, पुरावा व दावा लावण्याचा अधिकार या पासून वंचित ठेवले जाणार नाही. अशी उपाययोजना करावी.

१९. एकल स्त्रीया वाटयाला येणारी भेदाभेदीची वर्तवणूक नाहीशी व्हावी. यासाठी समाजात विशेष जागृतीसाठी मोहिमा, अभियान, सादरीकरणे, व्याख्याने, प्रसार माध्यमे, याद्वारे प्रयत्न केले जातील.

२०. एकल स्त्रीयाना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास मदत करण्यासाठी महिलांसाठीच्या उपलब्ध सर्व शासकीय योजनांचा लाभ त्यांना प्राधान्याने देण्यात येईल. रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या व्यवसायासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल.

२१. एकल महिलांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करुन देताना वयाची अट शिथिल करण्यात येईल.

२२. एकल स्त्रीया मालमत्तेसंदर्भात काही वाद असल्यास त्यांना कायदेशीर मदत मोफत दिली जावी.

२३. एकल महिलांसाठी मानसिक दृष्टया समुपदेशनाची गरज असल्यास, समुपदेशन केंद्रात ती सेवा मोफत देण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार विधी, आरोग्य मानसोपचार तज्ञ इत्यादींच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२४. एकल महिलांना समुपदेशन व कायदयांचे मार्गदर्शन मोफत करुन देण्यात यावे.

२५. केंद्र शासनाच्या धरतीवर अविवाहित, विधवा एकल स्त्रीयांना कुटूंब निवृत्ती वेतन देण्यात यावे.

२६. स्त्रियांना सरकारी योजना मिळविण्यासाठी त्यांच्याकडे ओळखपत्र नसल्यामुळे अडचणी येतात. यासाठी एकल स्त्रियांसाठी विशेष ओळखपत्र नोंदणी मोहीम सरकारने राबवावी.

२७. स्त्री अत्याचाराची प्रकरणे तातडीने सोडविण्यासाठी सरकारने न्यायालयीन प्रक्रिया सोपी—सुलभ करावी. तसेच एकल स्त्रियांसाठी स्वतंत्र पोलीस ठाण्यामध्ये स्वतंत्र कक्ष सुरू करावे.

२८. एकल स्त्रियांच्या रोजगारासाठी सरकारने विशेष योजना सुरू करावी. ' पोटगीच्या संदर्भात १३ व्या विधी आयोगाने केलेल्या सूचनांची त्वरित अंमलबजावणी करावी.

२९. केंद्र ते सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकल स्त्रियांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करावी.

३०. एकल स्त्रिया वन हक्क कायद्यातील सामूहिक वन हक्क आणि गायरान जमीन प्राधान्याने एकल स्त्रियांच्या नावे करून त्यांना शेती करण्यासाठी द्यावी.

५.४ उपसंहार

प्रश्न खूप आहेत, समस्या खूप आहेत आणि दिवसेंदिवस एकल स्त्रियांची संख्या वाढते आहे. ज्या आर्थिकदृष्टया सक्षम आहेत, ज्यांना सामाजिक स्तरावरही

प्रश्न नाहीत अशांची संख्या खूपच मर्यादित आहे. एकल स्त्रीला कोणत्या ना कोणत्या पातळीवरील प्रश्न भेडसावत असतातच. समाजाने तिच्याकडे निकोप नजरेने बघून जशी मदत करण्याची गरज आहे तशीच शासनानेही तिच्यासाठी विशेष धोरण आखणे गरजेचे आहे, तरच आपल्या समाजातल्या या स्त्रिया केवळ त्या एकटया आहेत म्हणून एकाकी पडणार नाहीत.

संदर्भसूची

संदर्भ

खंडागळे चंद्रकांत, (१९९८)'भारतीय समाज', प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

शरयू अनंतराम आणि उमा वंडसे (१९८७), भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

शरयू, वंडसे उमा, (१९९७) 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

बोबडे प्रकाश, (१९८८) 'भारतीय समाजरचना: पारंपारिक आणि आधुनिक' नागपूर प्रकाशन.

काचोळे दा. धों.,(१९१९) 'भारतीय सामाजिक विचारवंत', कैलाश पब्लिकशन, औरंगाबाद.

मंगल खिंवसरा (२००५), स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

महाराष्ट्र महिला संघटना (१९९०)

मानसी तारे आणि रेखा कशेळकर (२०११),संघर्ष सन्मानाने जगण्यासाठी, प्रेस्टिज दादर मुंबई.

विलास खोले (१९९७), स्त्रीपुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पूणे.

भारती मोरे (२०१५), एकल स्त्रिया, महाराष्ट्र टाइम्स, मुंबई २८ जुलै.

पांडे रेखा,(१९९०) 'वुमन इन इंडिया पास्ट अॅण्ड प्रेझेन्ट' नीलम उपाध्य चौक, पब्लिकेशन अलाहाबाद, इंडिया.

प्रशांतक कुमार, (१९६४) 'वैदिक साहित्य में नारी', वासुदेव प्रकाशन, दिल्ली .

प्रा. साधना झाडबुके (२०१६), महिला छेडछाड : समस्या आणि उपाय, प्रबोधन प्रकाशन ज्योती, (मासिक), समाजवादी प्रबोधिनी, वर्ष २७, अंक —३४४. इचलकरंजी. प्रा. साधना झाडबुके (२०१६), एकटीचे दु:ख, त्यावर उपाय काय? प्रबोधन प्रकाशन ज्योती (मासिक) समाजवादी प्रबोधिनी, वर्ष २७, अंक ३४९,इचलकरंजी, .

प्रा. सुधा काळदाते (१९८९), मराठवाडयातील स्त्रियांचे प्रश्न, योजना मसिक, नवी मुंबई.

प्रा. डॉ. प्रभावती कस्तुरे —वाडकर (२०१०), महाराष्ट्र शासनाचे महिलाविषयक धोरण : एक चिकित्सक अभ्यास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

प्रा. वर्षा गंगणे (२०१३), ग्रामीण विकासात स्त्री सक्षमीकरणाची भूमिका, आम्ही उपोजिका, वर्ष ७ वे, अंक २१३, सांगली.

प्रा. चंद्रकांत खंडागळे, (१९९८), भारतीय समाज, विशाल ऑफसेट, सांगली .

प्रा. आर. जी. रसाळ (१९९८), भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान, योजना मासिक, अंक १२, नवी मुंबई.

राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षण (२००३)

राष्ट्रीय महिला अहवाल (२०००)

Krishnakumari, N. S. (1987) Status of Single Women in India: A Study of Spinsters,Widows and Divorcees, New Delhi : Uppal Publishing House.

साळुंखे आ. ह., (डिसेंबर १९१८)‘ महाभारतातील स्त्रिया ’, प्रकाशक — राकेश आ. साळुंखे, ‘लोकायत’ १३, यशवंतनगर गेंडामाळ, सातारा.

साळुंखे आ. ह., (डिसेंबर १९१८)‘हिंदू संस्कृती आणि स्त्री’, प्रकाशक — राकेश आ. साळुंखे, ‘लोकायत’ १३, यशवंतनगर गेंडामाळ, सातारा.

साळुंखे आ. ह.,(डिसेंबर १९८९) ‘हिंदू संस्कृती आणि स्त्री’,मंजिरी—मकरंद सहनिवास, माहीम मुंबई.

सरोजिनी शारंगपाणी (१९९०),‘स्त्रियांचे हक्क आणि त्यांच्या मर्यादा’ विमल प्रकाशन, पूणे.

डॉ. कस्तुरे (१९९२) श्रमिक स्त्रियांच्या समस्या, योजना मासिक, एप्रिल १९९२, नवी मुंबई.

डॉ. नीलम गोऱ्हे (२००१), समाज आणि महिला, पद्मगंगा प्रकाशन, पूणे.

डॉ. लीला पाटील (१९९०), ‘भारतीय स्त्री जीवन’ मेहता पब्लिशिंग हाऊस, पूणे.

डॉ. लीला पाटील (२००८), महिलांसमोरील नवी आव्हाने, योजना मासिक, वर्ष ३६, अंक ३ , ऑक्टोंबर २००८, नवी मुंबई.

वासंती रामन (२००७), समकालीन राजकारणातील स्त्रियांचा प्रश्न मंजूषा गोसावी (संपादक), समकालीन भारतातील नागरी स्त्रिया डायमंड पब्लिकेशन्स पूणे,

Paranjpe, U. M. (1963) ''Are Spinsters a Social Problem'' in Hindustan Times,October, 13.

ना. रा. गाढे (१९९२), ग्रामीण महिलांच्या समस्या, एक दृष्टीक्षेप योजना, मासिक, अंक २५, नवी मुंबई.

आळतेकर ए. एस., (१९६२) 'द पोझीशन ऑफ वुमेन इन इंडिया सीव्हिलायझेशन,' प्रकाशक — सुंदरलाल जैन, मोतीलाल बंगला, जवाहरनगर, दिल्ली — ६.

अनंतराम शरयू, उमा वंडसे, (१९८७)'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान',पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,

ॲड. मनिषा तुळपुळे, (२०१५), समान हक्क समान न्याय, महाराष्ट्र टाइम्स,मुंबई १३ ऑगस्ट.

गीता साने (१९८६), भारतीय स्त्री जीवन, मौजे प्रकाशन मुंबई.

ग्रामीण गरीबी अहवाल (२००१)

परिशिष्टे

प्रश्नावली

प्रश्नावली

‘‘तासगाव तालुक्यातील एकल स्त्रियांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा एक चिकित्सक अभ्यास’’

१. नाव

२. कायमचा पत्ता

३. वय

४. धर्म

५. जात

६. वैवाहिक स्थिती

७. शैक्षणिक स्थिती साक्षर/निरक्षर

८. तुम्हास बहीण व भाऊ किती आहेत ?

९. आपण एकाकी जीवन जगावे लागत असल्याची कारणे कोणती?

१)समाजाद्धारे प्रोत्साहीत

२)समाजाकडून निराशा

३)निश्चित सांगू शकत नाही

१०.आपल्याकडे कोणते रेशन कार्ड आहे?

११.आपल्याकडे आधार कार्ड आहे का?

१२.आपल्याकडे निवडणूक ओळखपत्र आहे का?

१३.आपल्याकडे भ्रमणध्वनी आहे काय?

१४.एकटेपणा म्हणजे काय ?

१)अविवाहीत असल्याने

२)एकटे रहाणे

३)कुटुंबापासून अलिप्त रहाणे

१५.आपल्या कुटूंबाच्या मते आपण काय केले पाहीजे ?

१)एकटे रहा

२)लवकर लग्न करा

३)वय प्रतिबंध धार्मिक कारणामूळे

१६.तुम्ही एकटे का आहात?

१)निवडीनुसार

२) सक्तीने

३)दोन्ही

४)इतर कोणत्याही

१७.आपल्या मते, विवाह म्हणजे काय?

१) निवड

२)आवश्यकता

३) इतर कोणत्याही कारणाने

१८.तुमच्या एकटेपणाबद्दल समाधानी आहात का?

१)समाधानी

२) असमाधानी

३)तटस्थ

१९. तुमच्यासारख्या महिला गावामध्ये किती आहेत.

१)एक

२)दोन

३)तीन

४) तीनपेक्षा जास्त

५)नाहीत

२०. स्वत:च्या एकटेपणाविषयी माहिती

अ. न.	विधान	पर्याय		
		सहमत	असहमत	लागू नाही
१	माझ्या उत्पन्नाचा वापर माझ्यासाठीच करणार			
२	उच्च पदावर कार्यकारी पदावर जाऊ शकते			
३	मुलांचा सांभाळ करावयास नको			
४	अविवाहीत असल्याने मनाप्रमाणे जगणे			
५	कुटूंबाचे पालनपोषण करु शकत नाही कौटुंबिक जबाबदारी नको			
६	आरोग्य चांगल्याप्रकारे रहावे मुलांशिवाय			

सामाजिक स्थिती / सामाजिक

१. पूर्वीची कुटुंबपध्दती

१)एकत्र कुटुंबपध्दती

२)विभक्त कुटुंबपध्दती

२. कौटुंबिक पार्श्वभूमी

१)ग्रामीण

२)शहरी

३. राहण्यासाठी स्वत:चे घर आहे का? होय/नाही

४. स्वयंपाकासाठी कोणते इंधन वापरतात?

१)गॅस

२)पूल

३)स्टो

४)शेगडी

५. पिण्यासाठी पाणीपुरवठा मुबलक होतो का? होय/नाही

६. राहत्या परिसरामध्ये समस्या आहेत काय?

होय असल्यास कोणत्या प्रकारच्या समस्या आहेत?

१)आरोग्यविषयक सुविधाचा अभाव

२)स्वच्छ पाण्याचा अभाव

३)आरोग्य केंद्रांचा अभाव

४)वाहतूक व दळणवळणाच्या सुविधांचा अभाव

५)शैक्षणिक सुविधांचा अभाव

६)इतर समस्या

७. तुमच्या घरात कोणत्या वस्तू आहेत

८. सध्या आरोग्याची कोणती समस्या जाणवते का?

१

२

३

४

५

९. आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध होतात का? होय/नाही

होय असल्यास कोणत्या प्रकारच्या

१)खाजगी

२)सार्वजनिक (शासकीय)

१०.कुटुंब कर्ता म्हणून कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते?

१)आर्थिक जबाबदारी

२)दोन्ही जबाबदा—या

३)सामाजिक समस्या

४)आरोग्य समस्या

५)राजकीय समस्या

११.स्त्री म्हणून कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो?

१)शाररिक छळ

२)मानसिक छळ

३)पुरूषप्रधान संस्कृंतीचा बळी

४)वारसा हक्कापासून वंचित

५)अबोल/लाजाळूपणा फायदा घेतात

६)वर्तूणूकीवर आरोप/प्रत्यारोप

७)अप्रतिष्ठित वागणूक

१२.सामाजिक कार्यामध्ये सहभाग होतात का?

१३.कोणत्या सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते?

- समाजाकडून हिनतेची वागणूक दिली जाते.
- रूढी, परंपरेचे धार्मिक जखडण
- समाजाकडून सत्ता वंचित केले जाते
- पुरूष सत्ता अधिकार पध्दतीचा बडगाा

- कुटुंब कर्ता म्हणून नकार

१४.मनौधेर्य वाढविण्यासाठी कोणी साहाय केले का?

१)आईवडील

२)सासू—सासरे

३)मैत्रिणी

४)पाहुणे

५)शासन निमशासकीय संस्था

१५.तुम्ही घरगुती हिंसाना सामोरे गेला होता काय?

होय/नाही

१६.एकल स्त्रियांच्या कौटुंबिक आणि सामाजिक स्थितीचे वर्णन

अ. न.	विधान	पर्याय		
		सहमत	असहमत	लागू नाही
१	आपल्याविषयी कोणतीही तपासणी करु नये			
२	मनाप्रमाणे जगण्याची मुभा असावी			
३	कोणत्याही प्रकारचे बंधन असता कामा नये			
४	कोणत्याही कार्यक्रमामधे सहभाग घेता यावा			
५	मुक्तपणे बोलण्यासाठी			
६	कुटूंबामध्ये समान वागणूक मिळवण्यासाठी भावाप्रमाणे, पुरुषाप्रमाणे			

१७.एकटेपणा जगण्यापाठीमागील कारणमीमांसा

अ. न.	कारण	पर्याय		
		प्रमुख जबाबदार	काहीप्रमाणात जबाबदार	लागू नाही
१	उज्ज्वल करिअर पाठपुरावा करण्यासाठी			
२	घरगुती कामाऐवजी बौद्धिक कामांना प्राधान्य			
३	पुढील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी			
४	सामाजिक आणि धार्मिक हेतूने काही लोकांच्यासाठी जीवन समर्पित करण्यासाठी			
५	जगामधील सर्व सुखाचा उपभोग घेण्यासाठी			
६	संयुक्त कुटूंबपद्धत आवडत नाही			
७	मूलांची आवड नाही			
८	दुय्यम गौण स्थान नको आहे			
९	आर्थिक स्वातंत्र्य			
१०	कौटुंबिक कोणत्याही प्रकारचा वाद नको			
११	सामाजिक वाद विवाद नको			

१८.कौटुंबिक प्रतिष्ठा असलेली कारणे

अ. न.	कारण	पर्याय		
		प्रमुख जबाबदार	काही प्रमाणात जबाबदार	लागू नाही
१	वडीलांच्यावर हुंडाची जबाबदारी नको			
२	मूळ गाव सोडण्याची इच्छा नाही			
	अ. कौटुंबिक जबाबदारी			

	ब. कुटूंबाचे पालनपोषण करण्यास सक्षम नाही			
	क. कायमची नोकरी नियमित नोकरी			
३	योग्य जोडीदार न मिळाल्याची कारणे			
	अ. जात धर्म			
	ब. शिक्षण			
	क. आर्थिक स्थिती			
	ड. सुसंगत विचारांचा अभाव कमतरता			
४	घरातील कर्त्या माणसाची उणीव			
	अ. भाऊ नसल्यामुळे			
	ब. पुरुष नसल्यामुळे			
	क. भौतिक सेवासुविधांचा अभाव			
	ड. रोगांनी पिडीत			
	इ. वैचारिक मतभेद			
	ई. चांगले कुरुप असल्यामुळे			
	फ. इतर कोणत्याही कारणाने			

एकल महिलांची जीवनशैली आणि समाधानपातळी

१. तुम्ही नोकरी करता काय? होय/नाही

होय असल्यास कोणत्या प्रकारची

१. सरकारी

२. खाजगी

३. उद्योग

४. व्यावसायिक

५. इतर कोणत्या

२. नोकरीची वेळ

१. सकाळी ते सायंकाळ

२. दुपारी ते सायंकाळ

३. सकाळी ते रात्रीपर्यंत

४. रात्रीचे

५. लागू नाही

६. कार्यरत शिफ्ट

३. तुमचे घरगुती कार्य कोणद्वारे केले जाते?

१. स्वत:

२. इतर कौटुंबिक सदस्य

३. तुम्ही आणि इतर कौटुंबिक सदस्य

४. सेवक

४. तुमचा वेळ कोणाबरोबर व्यतित करता?

१. आई

२. बहीण

३. मैत्रिण

४. नाही.

५. वेळ कशा घालवता?

१. टी.व्ही.पाहणे

२.कॉम्प्युटरचा वापर

३. मोबाइल

४. वाचन

५. सहल

६. इतर कोणत्याही प्रकारे

६. तुमचे कुटूंब तुम्हास काय म्हणून ओळखते?

१. मदत करणारे

२. ओझे आर्थिक भार

३. जबाबदारी

४. दायित्व

५. नियमित कुटूंब सदस्य

६. लागू नाही

७. व्यावसायिक संस्थांचे सभासदत्व आहात काय?

१. होय

२. नाही

८. महिला कल्याणकारी संस्थेचे सभासदत्व तुम्ही आहात काय?

१. होय २. नाही

९. तुम्ही तुमच्या वर्तमान जीवनाविषयी समाधानी आहात का?

१. होय २. नाही ३. तटस्थ

१९. तुमच्या मते शिक्षणाच्या माध्यमातून समस्यांची सोडवणूक होईल असे वाटते का?

होय/नाही

होय असलयास कारणे विशद करा

१)समाजातील विषमता आणि जातीभेद कमी करणे?

२)कुटुंबातील स्त्री पुरूष भेदभाव

३)शाळा दूर आहे

४)गरिबी

आर्थिक स्थिती

१. तुमचा मासिक उत्पन्न किती आहे?

२. तुमच्या उत्पन्नचे मार्ग कोणते?

१)शेती

२)नोकरी

३)इतर

३. तुमच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी हे उत्पन्न पुरेसे आहे का?

होय/नाही

नाही असल्यास कोणत्या मार्गाचा अवलंब करता?

१)नातेवाईकांच्या कडून घेणे

२)शेजारच्या कडून घेणे

३)बॅकाच्याकडून कर्ज घेणे

४)इतर मार्गांचा अवलंब केला जातो

४. बचत गटाचे सभासद तुम्ही आहात का?

होय/नाही

होय असल्यास कधीपासून सभासद आहे?

५. आर्थिक पाठबळ कोणामार्फत मिळते?

१. वडील

२. आई

३. भाऊ

४. बहिण

५. इतर

६. रोजगाराचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे?

१)शेती/शेतमजुरी

२)उद्योग/व्यावसायिक/स्वयंरोजगार

३)संघटीत क्षेत्रातील रोजगार

४)असंघटीत क्षेत्रातील रोजगार

५)कौटुंबिक व्यवसाय

६)गृहिणी

७)बेकार

७. कोणत्या शासकीय योजनेचे लाभार्थी तुम्ही आहात का?

१)मनरेगा

२)इंदिरा आवास योजना

३)जवाहर रोजगार योजना

४)स्वर्ण जयंती रोजगार योजना

५)भाग्यलक्ष्मी योजना

६)इतर

एकल स्त्रियांच्या समस्या

१ शारीरिक समस्या

अ. न.	शारीरिक समस्या	तीव्रता		
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही

१	शारीरिक समस्या			
२	शारीरिक ताणतणाव			
३	आरोप विरोधाभास निर्माण केला जातो			
४	असमर्थपणा			
५	चांगल्या प्रकारची वागणूक			
६	लैंगिक छळ			

२. मानसिक समस्या

अ. न.	मानसिक समस्या	तीव्रता		
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही
१	अविवाहीत असल्याने भावनिक ताण जाणवतो			
२	असुरक्षितता			
३	अवस्थता			
४	नैराश्य निराशा			
५	एकटेपणा			
६	कनिष्ठ वागणूक			

३ सामाजिक समस्या

अ. न.	सामाजिक समस्या	तीव्रता		
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही
१	कौटुंबिक भावनेचा अभाव			
२	नातेवाईकांकडून शोषण			

३	सामाजिक कलंक			
४	सामाजिक बहिष्कार			
५	सामाजिक कार्यामध्ये सहभाग नाही			

४ आर्थिक समस्या

अ. न.	सामाजिक समस्या	तीव्रता		
		मोठया प्रमाणात	कमी प्रमाणात	मूळीच नाही
१	कौटुंबिक भावनेचा अभाव			
२	नातेवाईकांकडून शोषण			
३	सामाजिक कलंक			
४	सामाजिक बहिष्कार			
५	सामाजिक कार्यामध्ये सहभाग नाही			

समस्येवरती उपाययोजना

अ. न.	उपाय	वारंवारिता		
		अनेक वेळा	काही वेळा	मूळीच नाही
१	गाणी ऐकणे			
२	टी.व्ही. पाहणे			
३	वाचन			
४	घराची सजावट			

५	नातेवाईकांची भेट			
६	खेळ खेळणे			
७	इतराची मदत घेणे			
८	क्लब सामाजिक संस्था			
९	कामात मग्न होणे			
१०	धार्मिक उपक्रम			
११	सहलीला जाणे			
१२	वर्तमानपत्रासाठी लिखाण			
१३	हक्क मुभा			
१४	मित्रासोबत वेळ घालवने			
१५	छोटासा व्यवसाय सुरु करणे			
१६	वयोवृद्ध आणि मुळाशी संवाद साधणे.			

एकल स्त्रियांच्या भविष्यकालीन अपेक्षा

१. भविष्यामध्ये एकटेपणाच्या घटना वाढतील काय?

१. होय

२. नाही

३. तटस्थ

२. कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

३. सामाजिक संस्था तयार केल्या पाहीजेत काय?

१. होय

२. नाही

होय असल्यास कोणत्या प्रकारच्या

१. महिला क्लब

२. बचत गट

३. एकल महिला संघटना

४. आपण भविष्याबद्दल कोणता निर्णय घेतला आहे का?

५. एकल स्त्रियांच्या विकासासाठी तीन प्रमुख सूचना करा?

१

२

३